

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १५ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १५७ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचे सामने**

पंजाब किंग्ज वि. कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : मुल्लानपूर

## विचारपुष्प



भरतखंड, भारतवर्ष, आर्यावर्त वगैरे नावांतून एकच अर्थ प्रगट होतो. परंतु, त्या अर्थाच्या कल्पनेने आपण मात्र चमकून जातो. पिंजऱ्यात बंदिस्त असलेल्या पोपटासारखी आपली स्थिती झाली आहे. आज आपल्याला बुद्धिभ्रम झालेला आहे. आमच्या संस्कृतीचा नायनाट करण्याचा ज्यांनी विडा उचलला आहे, त्यांच्या गळ्यात भाऊ म्हणून मिठ्या मारण्याकरिता आपण उतावीळ झालो आहोत. हा सारा आपल्या मनोदौर्बल्याचा परिणाम आहे.

**- डॉ. केशव बळीराम हेडगेवार**
आद्य सरसंघचालक

# मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक

## पीएनबी घोटाळ्यातील आरोपी, भारतातही आणणार

**◆ मुंबई, १४ एप्रिल**

देशातील पंजाब नॅशनल बँक म्हणजेच पीएनबी घोटाळ्यातील फरार आरोपी आणि आर्थिक गुन्हेगार असलेल्या फरार हिरे व्यापारी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये पोलिसांनी अटक केली आहे. भारताने केलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीनंतर बेल्जियम पोलिसांनी मेहुलला अटक केली आहे.

केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय)च्या विनंतीनंतर ६५ वर्षीय चोक्सीला १२ एप्रिलला अटक करण्यात आली आहे आणि तो अजूनही तुरुंगात असल्याची माहिती पुढे आली आहे. मेहुल चोक्सीने पंजाब नॅशनल बँकेकडून १३, ५०० कोटी रुपयांचा कर्ज घोटाळा केला होता आणि अटक टाळण्यासाठी तो भारतातून बेल्जियमला पळून गेला होता. येथे तो त्याची पत्नी प्रीती चोक्सीसोबत अँटवर्पमध्ये राहत होता. मात्र, आता पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळत त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

पंजाब नॅशनल बँकेला १३ हजार ४०० कोटी रुपयांचा गंडा घालून मेहुल चोक्सी आणि घोटाळ्यातील मुख्य आरोपी असलेला त्याचा भाचा नीरव मोदी आपल्या कुटुंबासहसह देशातून पसार झाले होते. तपास यंत्रणेने सन २०१८च्या फरार आर्थिक गुन्हेगार कायद्यानुसार मेहुल चोक्सीला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केले आहे. अशातच आता मेहुल चोक्सीला अटक करताना, बेल्जियम पोलिसांनी मुंबई न्यायालयाने त्याच्याविरुद्ध जारी केलेल्या दोन अटक वॉरंटचा हवाला दिला असल्याची माहिती पुढे आली आहे. या अहवालात म्हटले आहे की, हे वॉरंट २३ मे २०१८ आणि १५ जून २०२१ रोजी जारी करण्यात आले होते. मेहुल चोक्सी प्रकृती बिघडली असल्याने आणि इतर कारणांमुळे जामीनसह तात्काळ सुटकाही मागू शकणार असल्याची शक्यता आहे.





### भारत-बेल्जियम यांच्यात आहे प्रत्यार्पण करार

भारत-बेल्जियम यांच्यात आहे प्रत्यार्पण करार आहे. मुंबई येथील विशेष न्यायालयाने २०१८ आणि २०२१ मध्ये मेहुल चोक्सीविरोधात अटक वॉरंट जारी केले होते. यासंदर्भातील कागदपत्रे प्रत्यार्पण करारातंर्गत बेल्जियम सरकारकडे सोपविण्यात आले. दरम्यान मेहुलला अटक केल्याची माहिती त्याचे वकील विजय अग्रवाल यांनी सांगितले आहे.

पीएनबीला १३,८५० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याच्या आरोपाखाली सीबीआय आणि ईडीने मेहुल चोक्सीवर खटला चालवत आहेत. चोक्सीचा पुतण्या नीरव मोदी हा देखील या प्रकरणात आरोपी आहे, जो लंडनमध्ये लपून बसला आहे आणि त्याच्या प्रत्यार्पणाचीही प्रतीक्षा आहे. मेहुलने अजूनतरी जामिनासाठी अर्ज केला नसून तो तुरूंगात आहे. दरम्यान, त्याला तुरूंगात ठेऊ नये, यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. तसेच त्याच्या प्रत्यार्पणालाही विरोध करणार असल्याचे मेहुलचे वकील विजय अग्रवाल यांनी सांगितले.

**भाचा निरव मोदी लंडनच्या तुरूंगात**

मेहुल चोक्सीचा भाचा निरव मोदी हा २०१९ पासून लंडन येथील तुरूंगात आहे. सीबीआयने या दोघांविरोधात आरोपपत्र दाखल केले आहेत. चोक्सीने गीतांजली जेम्स आणि अन्य कंपन्यांच्या मार्फत घोटाळा केला आहे. त्यानंतर हे दोघेही विदेशात पळून गेले. या दोघाविरोधात ईडीनेही प्रकरण दाखल केले आहे. ◂(वृत्तसंस्था)



सोलापूर : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलिस आयुक्त एम. राजकुमार व पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क चौकातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

## महत्त्वाचे

### एसबीआयकडून मुदत ठेवींवर व्याजकपात

**नवी दिल्ली** : देशातील सर्वांत मोठी बँक एसबीआयने मुदत ठेवींवरील (एफडी) व्याजदरात बदल जाहीर केले आहेत. १ ते ३ वर्षांच्या कालावधीसाठी व्याजदर १० बेसिस पॉईंट्सने कमी करण्यात आले आहेत. हे व्याजदर १५ एप्रिलपासून लागू केले जाणार आहेत. हे व्याजदर सामान्य ग्राहक आणि ज्येष्ठ नागरिक दोघांनाही लागू आहेत. या बदलासोबतच एसबीआयने त्यांची 'अमृत वृष्टी' एफडी योजनादेखील ४४४ दिवसांच्या कालावधीसाठी सुधारित दरांसह पुन्हा सुरू केली आहे.

### फॉक्सकॉनची उत्तरप्रदेशात ३०० एकर जमीन खरेदी

**लखनौ** : ॲपलसाठी आयफोन, आयपॅड आणि मॅकबुकसारखी उत्पादने असेम्बल करणारी कंपनी फॉक्सकॉन उत्तरप्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे ३०० एकर जमीन खरेदी करणार आहे. यमुना एक्सप्रेसवेजवळील या जमिनीवर कंपनी एक उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. हा फॉक्सकॉनचा उत्तर भारतातील पहिला प्रकल्प असेल आणि बंगळुरूमध्ये बांधलेल्या उत्पादन सुविधेपेक्षा मोठा असेल. असा अंदाज आहे की हा जगातील दुसरा सर्वांत मोठा प्रकल्प बनू शकेल. हा अहवाल अशा वेळी आला आहे जेव्हा तैवानची कंपनी आणि ॲपल चीनवर लादलेल्या शुल्कापासून वाचण्यासाठी भारतात पुरवठा साखळी बांधण्याचा विचार करत आहेत.

### चीनने मौल्यवान धातूंचा पुरवठा थांबवला

**बीजिंग** : अमेरिकेसोबतच्या वाढत्या व्यापार युद्धादरम्यान चीनने सात मौल्यवान धातू आणि चुंबकांच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. यात समेरियम, गॅडोलिनियम, टर्बियम, डिस्प्रोशिअम, ल्युटेटियम, स्कँडियम आणि यट्रियम यांचा समावेश होतो. यासोबतच, चीनने चीनच्या बंदरांवर कार, ड्रोन, रोबोट आणि क्षेपणास्त्रांसाठी आवश्यक मॅग्नेटची शिपमेंट देखील रोखली आहे.

# काँग्रेसने अनुसूचित जाती, जमाती, ओबीसींना दुय्यम दर्जाचे नागरिक बनवले

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आरोप

**◆ हिसार, १४ एप्रिल**

सत्तेत असताना काँग्रेसने अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना दुय्यम दर्जाचे नागरिक बनवले, असा घणाघाती हल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला सोमवारी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रचलेल्या संविधानाचा काँग्रेसकडून विध्वंस केला जात आहे, असे नरेंद्र मोदी यांनी येथील महाराज अग्रसेन विमानतळावरून अयोध्येला जाणाऱ्या विमानाला हिरवा झेंडा दाखवताना



आणि विमानतळावरीस नवीन टर्मिनल इमारतीच्या लोकार्पणासाठी झालेल्या कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

काँग्रेसला धोका जाणवतो, त्यावेळी हा या पक्षाने घटना चिरडली आहे, असा आरोप नरेंद्र मोदी यांनी १९७५ ते ७७ या कालावधीत लावलेल्या आणिबाणीकडे लक्ष वेधताना केला. संविधानाचा आत्मा समान नागरी संहिता असायला पाहिजे, ज्याला मी धर्मनिरपेक्ष नागरी संहिता म्हणतो. मात्र, काँग्रेसने त्याची अंमलबजावणी कधीच केली नाही.

भाजपा सरकारने उत्तराखंडात लावलेल्या समान नागरी कायद्याकडे लक्ष वेधताना नरेंद्र मोदी म्हणाले की, जे लोक घटनेची प्रत दाखवत फिरतात तेच याला विरोध करीत आहेत, हे देशाचे दुर्दैव आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींच्या आरक्षणाची तरतूद घटनेत आहे. पण, काँग्रेसने त्याची कधीच काळजी केली नाही, असा दावा मोदी यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)

### ग्रामीण भागांत १२ कोटी घरांना नळाची जोडणी

समाजातील वंचित घटकांची काँग्रेसच्या नेतृत्वाला काळजी असती, तर त्यांच्या सत्ताकाळात अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसीच्या घरांमध्ये पाणी पोहोचले असते, असा घणाघात नरेंद्र मोदी यांनी केला. मागील सहा वर्षांत आमच्या सरकारने ग्रामीण भागांतील १२ कोटी घरांना नळाची जोडणी दिली. ८० टक्के घरांना आता नळाचे पाणी मिळत आहे. उर्वरित घरांनाही ते उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

# पश्चिम बंगालमध्ये पुन्हा उफाळला हिंसाचार

## दक्षिण २४ परगण्यात पोलिस-आयएसएफमध्ये संघर्ष

**◆ कोलकाता, १४ एप्रिल**

पश्चिम बंगालमध्ये पुन्हा हिंसाचार भडकला आहे. येथील भांगल परिसरात मोठा संघर्ष झाला. इंडियन सेक्युलर फ्रन्टच्या (आयएसएफ) समर्थकांचा कोलकाता येथे जाणारा मार्च रोखण्यात आल्याने तणाव वाढला व पोलिसांसोबत त्यांचा संघर्ष झाला. पोलिसांनी अनियंत्रित जमावाला पांगवण्यासाठी बळाचा वापर केला. समाजकंटकांनी पोलिसांच्या वाहनासह कित्येक दुचाकींना आग लावली. यात आठ पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत.

वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात कोलकाता येथे निदर्शने करण्यासाठी येणाऱ्या आयएसएफ पक्षाचे समर्थक असलेल्या बसेस रस्त्यातच थांबवण्यात आल्या. वक्फ कायद्याच्या विरोधात बंगालमधील मालदा, मुर्शिदाबादसह कित्येक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि भाजपा परस्परांवर हिंसाचार भडकवण्याचा आरोप करीत आहेत.

तृणमूल काँग्रेस आणि भाजपाव्यतिरिक्त बंगालच्या विधानसभेत प्रतिनिधित्व असलेला आयएसएफ हा एकमेव पक्ष आहे. भांगरमधून येणारी आयएसएफच्या कार्यकर्त्यांची वाहने कोलकातातील रामलीला मैदानाकडे जाण्यापासून रोखण्यात आली. त्यामुळे भडकलेल्या आयएसएफ कार्यकर्त्यांनी बसंती एक्सप्रेस-वे रोखून धरला. ◂(वृत्तसंस्था)



सीमा सुरक्षा दलाच्या ईस्टर्न कमांडचे अतिरिक्त महासंचालक रवी गांधी यांनी सोमवारी मुर्शिदाबाद जिल्ह्यातील हिंसाग्रस्त भागाची पाहणी केली

# राणाची दररोज दहा तास चौकशी




**◆ नवी दिल्ली, १४ एप्रिल**

मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाची राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयए दररोज आठ ते दहा तास चौकशी करीत आहे. या हल्ल्यामागील व्यापक कट उलगडण्यासाठी त्याची कसून चौकशी केली जात असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी सोमवारी दिली.

एनआयएचे अधिकारी तहव्वूर राणाची दररोज वैद्यकीय तपासणी करीत आहेत. तसेच न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वकिलाला भेटण्याची परवानगीही त्याला दिली जात आहे. २००८ मध्ये लष्कर-ए-तोयबाने मुंबईवर केलेल्या भीषण हल्ल्याचा कट उलगडण्यासाठी राणाची दररोज आठ ते दहा तास चौकशी केली जात आहे. या चौकशीत तो सहकार्य करीत आहे. मुख्य तपास अधिकारी जया रॉय यांच्या नेतृत्वात एनआयए अधिकाऱ्यांचे पथक त्यांची चौकशी करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

आतापर्यंत तहव्वूर राणाने पेन, वही आणि कुराण या तीन वस्तू मागितल्या. त्या त्याला देण्यात आल्या. जेवणासाठी त्याच्याकडून कोणतीही विशिष्ट मागणी केली जात नाही. इतर आरोपींना देण्यात येते तेच जेवण राणाला दिले जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

# आज मिळणार नीट एमडी परीक्षेचे प्रवेशपत्र

## १९ एप्रिलला होणार परीक्षा

**नवी दिल्ली, १४ एप्रिल**

नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडीकल सायन्सेस लवकरच नीट एमडीएस २०२५ परीक्षेचे प्रवेशपत्र जारी करणार आहे. एनबीईएमएस उद्या हणजेच १५ एप्रिलला नीट एमडीएस प्रवेशपत्र जारी करणार आहे. प्रवेशपत्र अधिकृत वेबसाइटवर मिळणार आहे. हे प्रवेशपत्र मिळविण्यासाठी उमेदवारांना त्यांच्या ओळखपत्राचा वापर करून लॉगइन नरावे लागेल. नीट एमडीएस परीक्षा १९ एप्रिलला घेण्यात येणार आहे. नीट एमडीएस परीक्षा संगणक- आधारित परीक्षा पद्धतीने एकाच सत्रात घेतली जाईल. यामध्ये ४0 बहुपर्यायी प्रश्न असतील आणि प्रत्येक प्रश्नासाठी ४ उत्तर पर्याय असतील. परीक्षा फक्त इंग्रजीमध्ये घेतली जाईल.

# पंढरीची दिंडी निघाली लंडनला...

## आता लंडनमध्ये साकारणार श्रीविठ्ठलाचे मंदिर

### मंदिर समितीतर्फे पादुकांचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ एप्रिल-**

सध्या लंडनमध्ये स्थायिक झालेले अहिल्यानगर येथील श्रीविठ्ठलाचे भक्त अनिल एकनाथ खेडकर यांच्या संकल्पनेतून साता-समुद्रापार इंग्लंडची राजधानी लंडनमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे भव्यदिव मंदिर साकारले जाणार आहे. त्यासाठी येथील अठ्ठावीस युगापासून विटेवर उभारलेल्या श्रीविठ्ठलाचा चरणस्पर्श केलेल्या पादुकांसह दिंडीने सोमवारी लंडनकडे प्रस्थान ठेवले. हि आंतरराष्ट्रीय दिंडी २१ जूनला लंडनला पोचणार आहे.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते पादुकांचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, हभप ज्ञानेश्वर महाराज देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा व विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे तसेच अनिल खेडकर उपस्थित होते. लंडनमध्ये होणाऱ्या मंदिरामुळे महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल, वारी, संत परंपरा आता जगभरात जाणार आहे. येत्या काही वर्षात लंडन येथे भव्यदिव मंदिर अनिल खेडकर साकारणार आहेत. यानिमित्ताने १४ एप्रिल ते २१ जून दरम्यान पंढरपूर ते लंडन अशी आंतरराष्ट्रीय दिंडी निघाली आहे. याबाबत श्री.खेडकर म्हणाले, मी सात वर्षांपासून आळंदी ते पंढरपूर पायी वारी करतो. अमेरिका, यूरोप, लंडन येथे अनेक भारतीय मंदिरे आहेत. इस्कॉन, अक्षरधाम परदेशात आहेत पण जुनी संत साहित्य परंपरा असलेले पंढरपूरचे मंदिर तेथे नाही. त्यामुळे पंढीरीची वारी साता-समुद्रापार नेण्यासाठी हा उपक्रम आहे. वारीतील प्रेम, जिव्हाळा, सलोखा मी अनुभवला आहे. याचा लाभ जगभरात व्हावा ही इच्छा आहे. खरेतर दिंडीतील पादुका विमानातून लंडनला जाऊ शकतात पण लाखो भाविक जशी पायी वारी करतात, तशी नाही तर किमान वाहनातून सुमारे २२ देशातून १८ हजार किलोमीटरचा प्रवास करत ही दिंडी जात आहे. त्यासाठी सर्व देशांचा व्हिसा, वाहनांचे परमिट व इतर अनुषंगिक कायदेशीर तयारी त्यांनी केली आहे.

आज दि. १४ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथून ही दिंडी मार्गस्थ झाली. दि. १८ एप्रिल रोजी भारताच्या सीमेबाहेर ही दिंडी जाणार आहे. नेपाळ, चीन, रशिया, जर्मनी अशा २२ देशातून ७0 दिवसात १८ हजार किमी एवढा प्रवास करत कारने या पादुका घेऊन जाणार असल्याचे सांगण्यात आले असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



# पांढरीत युवक व युवतीची आत्महत्या


**तभा वृत्तसेवा**
**पांगरी, दि. १४ एप्रिल-**

पांढरी (ता. बार्शी) येथील एका युवकाने शेतातील झाडाला तर एका युवतीने घरातील लोखंडी पाईपला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना आज दि. १४ एप्रिल रोजी घडली. याबाबत पांढरी पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे. त्यानुसार आरती दिपक कसबे(वय १७) रा. पांढरी असे युवतीचे तर समर्थ रामदास लोंढे (वय २0) रा. पांढरी असे युवकाचे नाव आहे. युवतीने आपल्या घरातल्याच लोखंडी पाईपला अज्ञात कारणाने गळफास घेवून जीवन संपवले तर युवकाने मंदाकिनी रामचंद्र घावटे यांच्या शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेतला. सहाय्यक पोलीस निरीक्षक कोठावळे अधिक तपास करीत आहेत.

# सोलापुरात तापमानाचा पारा ४२.२ अंशावर

**सोलापूर दि. १४ एप्रिल-**

एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा उजाडताच सोलापूरसह राज्यातील तापमानाचा पारा देखील उंचावला आहे. राज्यातील उन्हाची दाहकता वाढतच असून आज (सोमवारी) सोलपूरसह राज्यात किमान तापमानाच्यापाऱ्यात वाढ झाली आहे. शहर व परिसरात उन्हाची तीव्रता वाढली असून या हंगामातील आतापर्यंतचे उच्चांकी कमाल तापमान सोमवारी १४ एप्रिल २०२५ रोजी किमान तापमान ४२.२ अंश सेल्सिअस नोंदले गेले आहे. दुपारी उन्हाचा चटका जाणवू लागल्याने रस्त्यावर भयान शांतता पसरली आहे. गेल्या ६ एप्रिल पासून सोलापूरचा तापमान ४0 अंशा वरच आहे.



गेल्या १३ मार्च २०२५ रोजी ४0.८ इतके किमान तापमान होते तर २९ मार्च रोजी ४१.४ इतके किमान तापमान होते. ३0 मार्च २०२५ रोजी ४१.१, तर ३१ मार्च रोजी ४0.८, तर १ एप्रिल २०२५ रोजी ४0.१, तसेच ६ एप्रिल रोजी ४१.४ इतके तापमान होते मात्र सोमवारी ७ एप्रिल रोजी यंदाच्या हंगामातील उच्चांकी म्हणजे ४२ अंशापर्यंत तापमानाची नोंद झाली. आता पारा ४२.२ अंशा पर्यंत गेला असून आता पर्यंतचा उच्चांक ठरला आहे. सकाळ पासूनच उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे. सोलापूरसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तापमानात वाढ होत असल्याचे दिसून येते. पुणे वेधशाळेने वर्तविलेल्या अंदाजानुसार पुन्हा अवकाळीचे ढग १५ एप्रिल दरम्यान येतील आणि सोलापूरसह राज्यातल्या काही भागातील वातावरणात पुन्हा बदल होऊन अवकाळीचे ढग दाटण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडहाट आणि सोसायट्याचा वारा यासह हलका पाऊसही होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

## महामानवास अभिवादन



### छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड

**सोलापूर :** संविधानामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण भारतीयांना स्वातंत्र्य, बंधुता, न्याय दिला म्हणून आज सर्व भारतीय म्हणून अभिमान बाळगतो. सर्व भारतीयांनाही संविधानाचे महत्व जाणून घेऊन आचरण करावे, असे मत छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान यांनी व्यक्त केले. पार्क चौक येथील डॉ. बाबासाहेबांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे राम गायकवाड, पोपट भोसले, मुस्लिम ब्रिगेडचे बशीर सय्यद, हारुण शेख, राजू हुंडेकरी, जावेद बद्दी, तन्वीर गुलजार, रिजवान पैलवान, कादर भागानगरी, कय्युम मोहळकर, वाहिद तांबोळी, हारिस शेख, बाबा शेख, नईम करनूल, खाशिम बेलीफ, गफूरभाई बागवान, रुस्तुम, मोहसीन सिंदगी, अफ्फान बागवान, जैद बागवान, अयान बागवान उपस्थित होते.



### राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी

**सोलापूर :** शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास शहर सरचिटणीस श्यामराव गांगर्डे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष संतोष पवार, हेमंत चौधरी, प्रमोद भोसले, अनिल उकरंडे, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम, प्रकाश जाधव, शकिल शेख, साजिद पटेल, किरण माशाळकर, अनिल बनसोडे, भास्कर आडकी, एम. एम.इटकळे, मार्तंड शिंगारे, आयुब शेख, सुरेखा घाडगे, बसवराज कोळी, प्रशासागर गायकवाड, वैभव गंगणे, सोमनाथ शिंदे, दत्तात्रय बनसोडे, श्रीकांत वाघमारे, सुरज खांडेकर, शुभम घनाते, निखिल नागणे उपस्थित होते.



### महाराष्ट्र नवनिर्माण सेना

**सोलापूर :**घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने पार्क चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.सदर प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, शहराध्यक्ष जैनोद्दीन शेख, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कोळी, रोजगार व स्वयंरोजगार जिल्हा संघटक गोविंद बंदपट्टे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



### संभाजी ब्रिगेड

**सोलापूर :** संभाजी ब्रिगेडच्या वतीने १४ एप्रिलच्या रात्री बारा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास १३४ व्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, जिल्हा संपर्कप्रमुख छत्रगुण माने, शहर अध्यक्ष शिरीष जगदाळे, शहर सचिव सिद्धाराम सवळे, शहर संघटक सतीश वावरे, शहर संघटक शेखर कंटेकर, दिलीप निंबाळकर, शहर उपाध्यक्ष रमेश भंडारे, राहुल बनसोडे, सिद्धार्थ राजगुरू आधी उपस्थित होते.



### उबाठा शिवसेना पक्ष

**सोलापूर :** उबाठा शिवसेना सोलापूर पक्षाच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पार्क चौक येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य दिव्य पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर, प्रताप चव्हाण, दत्ता माने, चंद्रकांत मानवी, रेवण बुकानुरे, संताजी भोळे, विजय पुकाळे, कामगार सेनेचे अध्यक्ष अजय खांडेकर, डॉ. शकिल अत्तार, दत्तात्रय सावंत, किरण दासरी, राजेंद्र कलकेरी उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकरांच्या विचारातूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती

## मुख्यमंत्री फडणवीस



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ एप्रिल -**

मुंबई ही महाराष्ट्राची आहे, असे ठणकावून सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. भाषावार प्रांतरचनेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती डॉ. आंबेडकरांच्या विचारातूनच झाली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले.

वडाळा पूर्व येथील कोरबे मि ठागर भागात डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार कॅप्टन तमिल सेलवन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईतील त्यांच्या कार्य कर्तृत्वाला उजाळा देण्यासाठी राज्य शासन इंदू मिल येथे त्यांचे भव्य स्मारक साकारत आहे. त्यांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. संविधानाच्या तत्त्वावर देशाचा कारभार सुरू आहे. या संविधानानेच देशाच्या महासत्तेचा मार्ग प्रशस्त केला आहे. बाबासाहेबांचा पुतळा हा संविधानशिवाय अपूर्ण असतो. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून शोषित, पीडित लोकांना न्याय देण्याचे काम केले. संविधानाने सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. संविधान निर्माण करताना त्यांची दूरदृष्टी आणि बुद्धीची प्रगल्भता लक्षात येते.

### अहिल्यानगर समाजकार्य महाविद्यालयात

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**अहिल्यानगर, दि.१४ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या संविधानाचे शिल्पकार नव्हते तर ते सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते. त्यांचे विचार आणि जीवनमूल्ये आजही समाजाला दिशा देणारे ठरतात. बाबासाहेबांचे विचार आणि जीवनमूल्ये जाणून घेत ती जीवनात आचारणात आणण्याचा प्रत्येकाने संकल्प करण्याची गरज असल्याचा सूर समाजकार्य म हाविद्यालयात आयोजित कार्यक्रम तून निघाला. शहरातील समाजकार्य महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तसेच सामाजिक समता सप्ताहाच्या समारोपानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस उपअधीक्षक अमोल भरती, सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, जिल्हा परिषदेचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे, महाविद्यालयाचे संचालक सुरेश पठारे, सम



ाजकल्याण निरीक्षक संगीता चितळे आदी उपस्थित होते. अमोल भारती म्हणाले, देशातील प्रत्येक व्यक्तीला शिकण्याचा, जगण्याचा आणि तसेच आपल्या अधिकारासाठी लढण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातूनच मिळाली. समाजातील दुर्बल घटकांसह प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच मिळाला असून त्यांचे विचार आपल्या सर्वांसाठी आजही प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले. श्री. कोकाटे म्हणाले, घटनेचे रक्षण करण्याबरोबरच स्वतःबरोबर दुसऱ्याच्या हक्कासाठी समाजातील प्रत्येकाने जागरुक असणे गरजेचे आहे. आपला विकास साधावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिक्षणाच्या संदेशाचे अनुकरण प्रत्येकाने करण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले. सुरेश पठारे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान हे अतिशय सहज आणि सोपे होते. समाजातील प्रत्येकाला आदरपूर्वक वागणूक मिळावी.

स्वातंत्र्यानंतर देशामध्ये सुराज्याची स्थापना आदर्श घटनेमुळेच होऊ शकली. त्यामुळेच आपला देश एकसंघ राहिला असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

# उपसभापती गोऱ्हे यांची अवैध बालगृहे तपासणीची मागणी

**मुंबई, दि. १४ एप्रिल-**

ठाणे जिल्हातील खडवली येथील 'पसायदान' नावाच्या संस्थेत लहान मुलांवर कथित लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणावरून महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात संबंधित संस्थेतील काही पदाधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे. बालकांच्या संरक्षणाची जबाबदारी आहे असा दावा करणाऱ्या संस्थेकडून घोर दुर्लक्ष झाल्याने पीडित मुलांवर मानसिक व शारीरिक अत्याचार झाले, असे उपसभापतींनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. उपसभापती गो-हे यांनी दोषींवर पोक्सो कायदा, जे जे ॲक्ट आणि आयपीसी अंतर्गत कठोर



कारवाई करावी, या प्रकरणी निष्णात वकिलांची नेमणूक करून न्यायप्रक्रियेला गती द्यावी उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी समिती गठीत करावी,संस्थेची धर्मादाय कायद्याच्या अनुसार नोंदणी रद्द करावी,राज्यभरात बेकायदेशीर बाल वसतिगृहांविरोधात मोहीम राबवावी, अशी मागणी केली आहे.उपसभापतींनी याआधीही अशा घटनांवर सातत्याने निवेदने दिली असून, तरीही शासनाकडून ठोस पावले उचलली न गेल्याची खंत व्यक्त केली आहे.

# आशिमा मेहरोत्रा यांचे दिल्लीत चित्र प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**दिल्ली, दि. १४ एप्रिल-**

कलाकार आशिमा मेहरोत्रा यांचे एकल चित्र प्रदर्शन मध्यमा-अ जर्नी ऑफ द सोल प्रेक्षकांना IFCS च्या गॅलरी 'इ' मध्ये एक खोल भावपूर्ण आणि चिंतनशील प्रवासासाठी आमंत्रित करत आहे. हे प्रदर्शन १२ एप्रिल पासून लोकांसाठी खुले आहे. 'मध्यमा' हा शब्द वैदिक तत्त्वज्ञानातून घेतला गेला आहे, जो कोणत्याही सर्जनशील अभिव्यक्तीपूर्वी आपल्यामध्ये उद्भवणाऱ्या मूक आणि अव्यक्त संवादाचा संदर्भ देतो. हे सूक्ष्म आणि न सांगणारे क्षण आशिमाच्या कलाकृतींचा आत्मा आहेत. हे प्रदर्शन कोणत्याही एका थीमपुरते मर्यादित नाही, तर विविध मूड आणि भावनिक रंगांचा सचित्र संगम आहे. प्रत्येक काम एक नवीन अनुभव, स्वतःचा एक नवीन स्तर उलगडून दाखवतो. सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला



### प्रदर्शनातील काही प्रमुख कलाकृती

'मेझ' (२०२५) - एक शक्तिशाली आणि स्व-संवादात्मक दृष्टी प्रतिबिंबित करणारे कार्य. 'नीलवर्णा' (२०२१) आणि नीलवर्णा २.० (२०२०) - निळ्या रंगांमध्ये आध्यात्मिक खोली आणि शांतीचा अनुभव घ्या. 'होली सिटी' (२०२२) - अध्यात्म आणि शहरीपणाचा संगम असलेल्या पवित्र शहराची प्रतिमा. 'विवत्सा' (२०२५) - जटिल मानवी भावनांचे, विशेषतः घृणा यांचे शक्तिशाली कलात्मक व्याख्या. 'मध्यमा' हे केवळ प्रदर्शन नाही, तर आत्म्याशी संवाद साधण्याची संधी आहे. हा अनुभव प्रेक्षकांना त्यांच्या आत पाहण्याची, अनुभवण्याची आणि त्यांच्या अस्तित्वाशी जोडण्याची प्रेरणा देतो.

आणि दक्षिण आफ्रिकेचे उच्चायुक्त अनिल सूकलाल आणि त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी IFCS चे अध्यक्ष विमल बिहारी दास, सदस्य संचालन आणि व्यवसाय विकास/ रेल्वे बोर्ड हितेंद्र मल्होत्रा, IRFC चे CMD मनोज कुमार दुबे आणि सुश्री नीरजा सरीन हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या म न्यवर उपस्थितीने कार्यक्रम अधिकच उल्लेखनीय झाला. आशिमा मेहरोत्रा या प्रशासकीय सेवा अधिकारी आहेत, ज्यांनी बालपणापासूनच कलेचा वापर आत्म-अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून केला आहे. त्याने वयाच्या पाचव्या वर्षी चित्र काढायला सुरुवात केली आणि शब्द वापरण्यापूर्वी रंगांशी संवाद साधायला शिकला. २०१९ मध्ये त्यांच्या भावाच्या अकाली निधनानंतर त्यांनी त्यांच्यातील कलाकाराला जिवंत केले आणि सार्वजनिक व्यासपीठावर आपली कला सादर केली. त्यांचे पहिले एकल प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी (मुंबई) येथे भरवण्यात आले. ज्याला देश-विदेशात दाद मिळाली. त्यांच्या एका कलाकृतीने न्यूयॉर्क कला स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावला आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना विशेष ओळख मिळवून दिली.

# सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित करणे हेच अभिवादन

### रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १४ एप्रिल-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सम रसतेचा आणि समतेचा संदेश आजही प्रासंगिक आहे. संविधान निर्मितीच्या वेळी त्यांनी राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक स्वातंत्र्याची गरज व्यक्त केली. आज खऱ्या अर्थाने संपूर्ण सम ाजाने त्यासाठी प्रयत्न करायला हवे. समाजात समरसता आणि एकोप्याचा भाव निर्माण करणे हेच त्यांना अभिवादन ठरेल, अशी भावना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी पुणे रेल्वे स्टेशन जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रा. स्व. संघाचे पुणे महानगर संघचालक रविंद्र वंजारवाडकर आणि रा.स्व. संघाचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. आंबेकर पुढे म्हणाले, तत्कालीन समाजापुढे अनेक अडचणी असतानाही डॉ. आंबेडकरांनी देश आणि सम ाजाच्या एकसंघतेसाठी प्रयत्न केले. भारतीय समाजातील विशेष करून हिंदू समाजातील एकता आणि आवश्यक त्या सुधारणांकरिता अतिशय ठोस प्रयत्न त्यांनी केले.

# राज्य शिक्षक संघटना सरचिटणीसपदी देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

शिक्षक सहकार संघटनेच्या राज्य सरचिटणीसपदी निलेश शशिकांत देशमुख यांची अन्नपूर्णा सांस्कृतिक भवन, अकलूज येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत फेरनिवड करण्यात आली.

यावेळी राज्याध्यक्ष संतोष पिट्टलवाड यांच्या हस्ते त्यांना राज्य सरचिटणीस पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी राज्य कार्याध्यक्ष दिपक परचंडे,राज्य उपाध्यक्ष मनोज कोरडे, उमेश नायकुडे,राहुल मस्रुरे, मनोज बनकर, राज्य कोषाध्यक्ष रमेश आलापुरे, राज्य संघटक विठ्ठल टेळे, नवनाथ मेढे, सुवर्णा गाडे आदी उपस्थित होते.



यावेळी देशमुख म्हणाले की, राज्यातील शाळांमध्ये सीबीएसईचा अभ्यासक्रम राबविण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाचे स्वागत आहे. सीबीएसई पद्धतीच्या गुणवत्तापूर्वक शिक्षण धोरणाचा अवलंब करताना शाळा व शिक्षकांवर लादलेला अशैक्षणिक कामाचा बोजा कमी करून सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाचे शिक्षकांना दर्जेदार प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. शाळांम ध्ये भौतिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. शाळा आणि शिक्षकांवर लादलेला अशैक्षणिक कामांचा बोजा कमी केला पाहिजे.

देशमुख यांची राज्य सरचिटणीस पदी फेरनिवड झाल्यानंतर त्यांचे महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णा गाडे, पुणे विभागीय अध्यक्ष रविराज खडाखडे, सोलापूर जिल्हाध्यक्ष रविंद्र जेटगी, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र पडदुणे, उपाध्यक्ष सुनील पवार, यांनी अभिनंदन केले.

# नदीजोड प्रकल्पाचे बाबासाहेब जनक : प्रा. सुहास उघडे

### मराठा सेवा संघाने आयोजित केलेल्या भीम गितांनी दणाणले जिल्हा परिषदेचे सभागृह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ समस्या मांडल्या नाही तर त्यावर उपाययोजना केल्या. पाण्याच्या नियोजनावर त्यांनी भर दिला. नदीजोड प्रकल्पाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत, असे मत व्याख्याते प्रा. सुहास उघडे यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हा समाज कल्याण विभागाचे वतीने आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन



शेळकंदे, शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मि रकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे अरूण क्षिरसागर, म ध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे अशोक इंदापुरे, शंतनु गायकवाड, मराठा सेवा संघाचे शाखाध्यक्ष अविनाश गोडसे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, अनिल जगताप, सूर्यकांत मोहिते, शिवानंद मगे, कास्ट्राईबचे राज्य उपाध्यक्ष गिरीष जाधव उपस्थित होते. कार्यक्रमासाठी उम ाकांत राजगुरू, भगवान चव्हाण, संजय कांबळे, रामदास गुरव, चेतन भोसले, नागनाथ धोत्रे, कल्याण श्रावस्ती, चंद्रकांत होळकर, योगेश कटकधोंड, कर्मचारी म हासंघांचे कार्याध्यक्ष दिनेश बनसोडे, सम ाज कल्याण विभागाचे अधिक्षक सचिन सोनकांबळे, विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे, स्वाती गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास अमृत कोकाटे, किशोर सावळे, समता सैनिक राजश्री कांबळे उपस्थित होते. कास्ट्राईब कर्मचारी संघटनेच्या वतीने मिठाईचे वाटप अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांच्या हस्ते करणेत आले. लेखक दत्ता गायकवाड लिखित चैत्यन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पुस्तक मराठा सेवा संघाचे वतीने वितरित करणेत आले.

जिल्हा परिषद वाहन चालक यांना निवारा व्यवस्था - अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर बोलताना म्हणाले, बाबासाहेब यांनी समतेची विचार दिला. या प्रसंगी त्यांनी सर्वांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषद वाहन चालक यांना निवारा व्यवस्था करावेत येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय तसेच गुणवंत कर्मचारी यांचे साठी पुरस्कार योजना सुरू करणेत येणार असल्याचे अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी सांगितले. जिल्हा परिषद कास्ट्राईब संघटनेने या मागण्या केल्या होत्या. सूत्रसंचालन कल्याण श्रीवस्ती व हेमलता होटकर यांनी केले.

### भिम गीतांनी दणाणले जिल्हा परिषदेचे सभागृह

दोनच राजे इथे गाजले.या गितांनी कार्यक्रमात बहार आणली. माऊलीची माया होता.माझा भिमराव! तसेच जन्मास आले भिमबाळ..! माझ्या भिमाच्या नावाचं कुंकू लावील रमाण..! किती शोभला असता भीम नोटांवर .. या भीमगितांनी जिल्हा परिषदेचे यशवंतराव चव्हाण सभागृह दणाणून गेले. मराठा सेवा संघाच्या वतीने स्वानंद परिवाराच्या पहाडी आवाजात भीमगितांचे सादरीकरण केले. गायक रुपेश क्षिरसागर, किरणकुमारी गायकवाड, महेश कोटीवाले, अरुंधती सलगर, सायली साठे, हेमलता होटकर, कालिंदा देशमुख, एकनाथ कुंभार या गायकांनी आपल्या पहाडी आवाजाने जयंती च्या कार्यक्रमात भीमगिते म्हणून जान आणली..! इतनी शक्ती हमे दे ना दाता .. हे गीत लक्ष्मी नागणसुरे यांनी गायले. मराठा सेवा संघटनेने दरवर्षी प्रमाणे भीमगीत सादर केल्याने सर्वांनी मराठा सेवा संघटनेचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डॉ. आंबेडकर यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी केले अभिवादन

**अहिल्यानगर दि.१४ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटीले उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया व आयुक्त डांगे यांनी डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचनही यावेळी करण्यात आले.

# आधुनिक काळात कुटुंब व्यवस्था धोक्यात

### सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे; चऱ्होली नगराचा वर्षप्रतिपदा उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पिंपरी चिंचवड, दि. १४ एप्रिल-**

एक हजार वर्षांच्या परकीय आक्रमणात अनेक राज्ये, मंदिरे आणि विद्यापीठे उध्वस्त झाली. परंतू, भारतीय जिवन मुल्यांचा आधार असलेल्या कुटुंब व्यवस्थेला आक्रमक हात लावू शकले नाहीत. आज मात्र आधुनिक युगात सर्व सुख सुविधा असतानाही भारतीय कुटुंबव्यवस्था डळमळीत होत असून, राष्ट्रहितासाठी ही धोक्याची घंटा आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी व्यक्त केले.




**पंचपरिवर्तनाचे आवाहन...**

समाजहितासाठी कुटुंब व्यवस्थेचे सुदृढीकरण, पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन, नागरिकांची कर्तव्ये, स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था, स्व-बोध आणि सामाजिक समरसतेचा संदेश सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी आपल्या उद्बोधनातून दिला.

पिंपरी चिंवड येथील संघाच्या चऱ्होली नगराच्या वर्षप्रतिपदा उत्सवात ते बोलत होते. डूडूळगाव येथील संत सावतामाळी मंदिर प्रांगणात पार पडलेल्या उत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून आळंदी शहर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सतीश चोरडिया, जिल्हा संघचालक विनोद बन्सल, नगर कार्यवाह नारायण बांगर उपस्थित होते.

कुटुंब टिकले तर राष्ट्र टिकेल, असे प्रतिपादन करताना सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे म्हणाले, नैतिक मुल्यांच्या आधारे उभी राहिलेली भारतीय कुटुंब व्यवस्था ही जगातील सर्वश्रेष्ठ प्रणाली आहे. संस्कार, संस्कृती, सेवाभाव आणि आत्मियता असलेले कुटुंबव्यवस्था राष्ट्रालाही सक्षम करते. आपल्या कुटुंबात 'मातृ-पितृ देवो भव:' या भावाचे आचरण व्हायला पाहिजे. आधुनिक युगात कुटुंब व्यवस्था टिकविण्यासाठी प्रत्येक सदस्याने प्रयत्न करायला हवेत. व्यक्तीगत आणि राष्ट्रीय चारित्र्याच्या विकासातून श्रेष्ठ भारत निर्माण होईल, असेही होसबाळे म्हणाले.

सतीश चोरडिया म्हणाले, राष्ट्रभक्ती आणि संस्कृतीच्या प्रचारासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अतुलनीय कार्य करत

**हिंदू समाजात जातीभेदाला स्थान नाही**

सर्वांमध्ये ईश्वरी अंश असल्याचे आपला धर्म सागतो. कोणत्याही धर्मग्रंथात जातीच्या आधारावर भेदभावाला स्थान नाही. संत आणि महापुरूषांनी तर जातीभेदाला विरोध केला. असे असतानाही समाजात जातीच्या आधारावर भेदभाव होत असेल, तर तो आपल्यासाठी कलंक आहे. हिंदू समाजाने आता जातीभेदाला दूर लोटले पाहिजे, असे परखड मत दत्तात्रेय होसबाळे यांनी व्यक्त केले. तसेच नागरिकांनी हक्कांबरोबरच कर्तव्याचेही पालन करायला हवे. भारताला श्रेष्ठ बनवायचे असेल तर समाजानेच पुढे यायला हवे, असे आवाहनही त्यांनी केले.

# पतंजली हे भविष्यात आपत्ती आणि संकटांना तोंड देण्यासाठी उपयुक्त ठरेल

## पंतजली विद्यापीठात 'हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन, आपत्ती औषध' या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी स्वामी रामदेव यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**हरिद्वार, दि. १४ एप्रिल-**

पतंजली हे केंद्र भविष्यात जागतिक स्तरावर आपत्ती आणि त्यातून उद्भवणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन पतंजली विद्यापीठाचे कुलपती आणि जगप्रसिद्ध योगी स्वामी रामदेव यांनी केले.

पतंजली विद्यापीठात 'हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्ती औषध' या विषयावर आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन समारंभात उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. या कार्यशाळेत चार देशांतील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. कार्यशाळेत स्पेन विद्यापीठाचे प्रा. रुबेन, जागतिक बँकेच्या डिझास्टर मेडिसिन ग्रुपचे अध्यक्ष इटलीहून प्रा. रॉबर्टो मुगावेरो, नॉर्वे विद्यापीठातील प्राध्यापक. बी. सिटौला आणि नेपाळ आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे शास्त्रज्ञ प्रा. बी. अधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी पतंजली विद्यापीठात 'डिझास्टर मेडिसिन, मॅनेजमेंट आणि क्लायमेट चेंज' या विषयावरील इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना आणि उद्घाटनही करण्यात आले. याशिवाय विद्यापीठात पेटंट सेलही स्थापन करण्यात आला.

स्वामी रामदेव म्हणाले, त्सुनामी असो, बिहार पूर असो किंवा केदारनाथ दुर्घटना असो, प्रत्येक आपत्तीमध्ये पतंजलीने मानवता आणि समाजसेवेसाठी नेहमीच अग्रणी भूमिका बजावली आहे. पतंजलीच्या सामर्थ्याचा, विचाराचा



आणि आत्म्याचा हा परिणाम आहे की प्रत्येक आपत्तीत मदत करणाऱ्यांमध्ये आपण प्रथम आहोत. भारतीय आणि सनातन संस्कृतीतून आपत्ती व्यवस्थापन शिकण्यावरही त्यांनी भर दिला.

या कार्यशाळेचे मुख्य संयोजक आणि पतंजली विद्यापीठाचे दूरस्थ शिक्षण संचालक प्रा. सत्येंद्र मित्तल यांनी कार्यशाळेच्या उद्देशावर प्रकाश टाकून हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या आपत्ती आणि त्या सोडवण्यासाठी भविष्यातील योजनांची सविस्तर माहिती दिली. प्रो. मित्तल म्हणाले की, ही कार्यशाळा डीआरए इन्क्लाकॉन, मॅकाफेरी, मेगा प्लास्ट, टेक फॅब आणि यूसीओएसटी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे.

**आपत्ती व्यवस्थापन आणि लोककल्याणासाठी पुढाकार**

यावेळी पतंजली विद्यापीठाचे कुलगुरू तथा आयुर्वेद शिरोमणी आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, हे इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स आगामी काळात जागतिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापन आणि लोककल्याणासाठी पद्धतशीर पुढाकार घेईल. पतंजलीने यापूर्वी केदारनाथ दुर्घटना, नेपाळ भूकंप आणि बिहार पूर यांसारख्या आपत्तींमध्ये अग्रणी भूमिका बजावून मानवतावादी कार्य केले आहे.

**एक प्रभावी उपक्रम : आचार्य बाळकृष्ण**

आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन आणि लोककल्याणाच्या क्षेत्रात भारताच्या प्राचीन परंपरा नेहमीच मार्गदर्शक ठरल्या आहेत. पतंजली विद्यापीठात स्थापन करण्यात आलेले हे इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स जागतिक स्तरावर आपत्ती आणि शोकांतिकेला सामोरे जाण्यासाठी केवळ संशोधन आणि उपाय विकसित करणार नाही, तर भारतीय सनातन संस्कृतीच्या मूल्यांना पुनर्संचयित करण्याच्या दिशेने एक प्रभावी उपक्रम ठरेल, असेही ते म्हणाले. जागतिक आपत्ती औषध आणि व्यवस्थापनासाठी आणि संशोधन, प्रशिक्षण आणि सहकार्याच्या दिशेने भविष्यातील धोरणे विकसित करण्यासाठी ही कार्यशाळा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे आणि उत्तराखंड राज्य विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषदेचे (यूसीओएसटी) महासंचालक डॉ. दुर्गेश पंत म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन हे भारतीय संस्कृतीच्या परिसंस्थेमध्ये एकात्मिक आहे.

**तंत्रज्ञान आणि सकारात्मक विचार यांची सांगड**

तंत्रज्ञान आणि सकारात्मक विचार यांची सांगड घालून आपत्ती आणि त्यातून उद्भवणाऱ्या शोकांतिका यांचा प्रभावीपणे सामना करण्याची गरज प्रतिपादित केली. ते म्हणाले की योग आणि आयुर्वेदाचा समन्वय मानसिक आणि शारीरिक आघात (आपत्तीनंतरचा आघात) कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण घटक सिद्ध होऊ शकतो. पतंजली विद्यापीठाने स्थापन केलेले हे इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स हे आपत्ती चिकित्सा आणि व्यवस्थापन क्षेत्रातील वैज्ञानिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनाची सांगड घालण्याचा अनोखा प्रयत्न असल्याचेही डॉ. पंत म्हणाले.

**दक्षिण आशियातील पहिली संस्था**

यावेळी जागतिक बँकेचे भारतातील प्रतिनिधी डॉ. आशुतोष मोहंती म्हणाले की, पतंजली विद्यापीठ ही दक्षिण आशियातील पहिली संस्था आहे जिथे आपत्ती चिकित्सा क्षेत्रात गंभीर आणि संघटित पुढाकार घेण्यात आला आहे. पतंजली विद्यापीठाच्या या उपक्रमाचे कौतुक करताना त्यांनी जाहीर केले की, जागतिक बँक आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्ती वैद्यक क्षेत्रात विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, फेलोशिप, पीएचडी संशोधन आणि विद्यार्थी देवाणघेवाण कार्यक्रमांमध्ये सहभागाची संधी उपलब्ध करून देईल.

**जनतेचा सहभाग अत्यंत महत्वाचा**

यावेळी उत्तराखंडचे अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक समीर सिन्हा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आपत्ती व्यवस्थापनात जनतेचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे, जेणेकरून आपत्तीमुळे उद्भवणाऱ्या शोकांतिका कमी करता येतील. त्यांनी आपत्ती व्यवस्थापनासाठी समुदायाचा सहभाग हा मूलभूत पाया असल्याचे वर्णन केले. इंडो-तिबेट बॉर्डर पोलिस मधील दीपक कुमार पांडे यांनीही आपत्ती व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित केले, ते म्हणाले की पद्धतशीर प्रशिक्षण, द्रुत प्रतिसाद आणि स्थानिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर याद्वारे कोणत्याही आपत्तीची तीव्रता प्रभावीपणे नियंत्रित केली जाऊ शकते.




## अग्रलेख...

# बंगालचे गौडबंगाल!

ब्रिटिश राजवटीच्या विरोधातील रणशिंग फुंकून संपूर्ण देशाला स्वातंत्र्याच्या सूर्योदयाची दिशा दाखविणाऱ्या पश्चिम बंगालच्या राजकारणाने स्वातंत्र्यानंतर, विशेषतः, गेल्या सुमारे सहा दशकांत वेगळाच मार्ग निवडल्याचे इतिहासावरून दिसते. सन १९७१ मध्ये, म्हणजे इंदिरा गांधींनी देशावर आणिबाणी लादण्याच्या चार वर्षे अगोदर, काँग्रेसचे नेता सिद्धार्थ शंकर रे यांनी राष्ट्रीय राजकारणातून पुन्हा पश्चिम बंगालच्या राजकारणाकडे मोहरा वळविला आणि त्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारच्या काळात या राज्यात राजकीय हत्याकांडांनी कळस गाठला. या इतिहासाने जुन्या इतिहासाचे सारे विक्रम तर मोडलेच, पण सत्ता आणि हिंसक संघर्ष यांनी हातात हात घालून चालावे अशा परंपरेचा नवा पायंडाही त्या काळात पडला. देशाच्या फाळणीनंतर पश्चिम बंगालचे राजकारण सातत्याने हिंसाचाराच्या आगीत धगधगत राहिलेच होते. १९७९ मधील सुंदरबनमधील बांगलादेशी हिंदू निर्वासितांचे हत्याकांड हा त्या इतिहासातील एक सर्वांत काळा अध्याय होता. साठच्या दशकात नक्षलबारीच्या हिंसक कारवायांनी या इतिहासाला हे वळण दिले. खरे तर तेव्हापासूनच, सत्तासंघर्षाच्या त्या इतिहासाने मागे वळून पाहिलेच नाही. आजच्या घडीला, तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांच्या सरकारच्या काळातील हिंसाचाराने तोच कित्ता वारंवार गिरविला आहे आणि प्रत्येक नव्या हिंसाचाराने अगोदरच्या घटनांना मागे टाकण्याचा जणू चंग बांधला केला आहे. मोदी सरकारने संसदेत मांडलेले वक्फ कायदा सुधारणा विधेयक बहुमताने संमत झाल्यानंतर ते कायद्याच्या रूपाने संपूर्ण देशात लागू होईल आणि त्याची अंमलबजावणी करणे सर्वांस बंधनकारक राहील अशी स्पष्टोक्ती गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेतच केलेली असतानाही, पश्चिम बंगालमध्ये या कायद्याची अंमलबजावणी करणार नाही असा थेट संघर्षाचा पवित्रा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी घेतला आहे. शिवाय, या कायद्यास आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी व सर्वोच्च न्यायालयाची भूमिकाही अद्याप स्पष्ट झालेली नसताना कायदा झुगारून विरोधी आंदोलकांना एक प्रकारे नैतिक पाठबळ देऊन ममता बॅनर्जी यांनी राज्यातील कायदा सुव्यवस्था स्थिती चिघळविण्याच्या प्रयत्नांस खतपाणी घातले आहे.

संसदेत हे विधेयक मांडले गेले, तेव्हा लोकसभा आणि राज्यसभेतही चर्चेदरम्यान त्यास विरोध झाला. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले तेव्हा त्याचा विरोध आणखी प्रखर झाला, पण त्याला केंद्राच्या विरोधापुरती का होईना, विरोधकांची पठडीबाज वैचारिक बैठक होती. विरोधाची हिंसक आग मात्र, ममता बॅनर्जी यांची सत्ता असलेल्या पश्चिम बंगालमध्ये भडकली. लोकशाहीमध्ये विरोधाचा अधिकार सर्वमान्य असतो. आंदोलनांचा अधिकारही स्वीकारला गेलेला आहे. पण न्यायालयाचा निर्णय येण्याआधीच कायदा हातात घेऊन वक्फ कायद्याची राज्यात अंमलबजावणीच न करण्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या भूमिकेमुळे राज्यातील हिंसक विरोधास पाठबळ मिळाले आहे. खरे तर, कायद्याच्या विरोधातील आंदोलनाने असे बेकायदा संघर्षाचे रूप धारण करू नये यासाठी राज्यकर्त्यांकडून संयमाची आणि पुरेशा खबरदारीचीही अपेक्षा असते. ममता बॅनर्जी यांनी तशी खबरदारी घेतलेली दिसत नाहीच, पण संयम दाखविणे टाळून कायद्याच्या विरोधात संघर्षाची भूमिका घेतली आहे. मुर्शिदाबादेत वक्फ कायद्याच्या विरोधात सुरू झालेल्या हिंसाचाराने संयमाचे सारे बांध तोडले असून दंगलखोरांनी पाण्याच्या टाक्यांमध्ये विष मिसळल्याच्या भीतीने अनेक हिंदू कुटुंबांनी घरेदारे सोडून पलायन करण्यास सुरुवात केली आहे. तेथील स्थिती तणावपूर्ण आहे आणि दंगली आटोक्यात आणण्यासाठी सीमा सुरक्षा दलांच्या जवानांची कुमक आयात करावी लागली आहे. हजारो पोलिस कर्मचाऱ्यांनी डोळ्यात तेल घालून गस्त सुरू केली आहे आणि धार्मिक तणावामुळे परिस्थिती अधिकच चिघळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वक्फ कायदा सुधारणा विधेयक संसदेत मांडले जात असतानाच पश्चिम बंगालमध्ये त्याविरोधातील आंदोलनांची तयारी सुरू झाली होती आणि ८ एप्रिलला या आंदोलनाने हिंसक वळण घेतले. म्हणजे, जवळपास एक आठवड्यापासून हे राज्य हिंसाचाराने धगधगत आहे. वक्फ कायद्यास विरोध करण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या हिंसक दंगलखोरांनी तीन निष्पापांचा बळी घेतला आहे, पोलिसांवर हल्ले केले, सरकारी मामलत्तांची नासधूस केली आहे आणि कायदा सुव्यवस्था धाब्यावर बसविली आहे. असे अराजक राज्यात माजलेले असताना, संसदेने संमत केलेला कायदा राज्यात लागू केला जाणार नाही अशी आडमुठी भूमिका घेत विरोधी आंदोलनांची ताकद वाढविणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्या राजकारणाने हिंसाचाराच्या इतिहासाला अधिक प्रखरपणे वर्तमानाच्या टप्प्यावर आणून ठेवले आहे यात शंका नाही.

राज्याची कायदा सुव्यवस्था स्थिती कायम राखणे, सामाजिक सलोखा बिघडणार नाही याची काळजी घेणे ही राज्य सरकारची जबाबदारी असते. या कायद्याच्या विरोधातील लढाई आपण सर्वांनी मिळून लढायची आहे, अशी या टप्प्यावर ममता बॅनर्जी यांनी घेतलेली भूमिका आणि कोणत्याही स्थितीत कोलकात्याचा कारभार ठप्प करण्याची ममता सरकारमधील एका मंत्र्यानेच घेतलेली भूमिका म्हणजे जबाबदारी खुंटीवर ठेवून कायदा सुव्यवस्था स्थितीला वाऱ्यावर सोडण्यासारखेच आहे. संसदेने संमत केलेला कायदा राज्यात लागू केला जाणार नाही ही एका राज्याच्या मुख्यमंत्र्याची भूमिका केंद्रातील सरकारच्या विरोधाचा विखार किती खोलवर भिनला आहे याची प्रचीती देणारा आहे. या अराजकामागे आणखी एका घटनेचा संदर्भ असू शकतो का हेही या निमित्ताने तपासून पाहावयास हवे. कारण, कोणत्याही एखाद्या बाबीमुळे जेव्हा सरकारची जनमानसातील प्रतिमा संकटात येते, तेव्हा जनतेचे लक्ष अन्यत्र वळवून मूळ घटनेचा विसर पडावा असे काही राजकारण अनेकदा जन्माला घातले जाते. पश्चिम बंगालमधील स्कूल सेवा आयोगाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या शिक्षक भरतीमध्ये उमेदवारांकडून पैसै घेतले गेल्याच्या आरोपावर शिक्कामोर्तब करून सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सुमारे २६ हजार शिक्षकांची नियुक्ती रद्द करण्यावर शिक्कामोर्तब केले आहे. या घोटाळ्यामुळे राज्यात तीव्र सामाजिक अस्वस्थता पसरली आहे. वक्फ कायदा विरोधी आंदोलनामुळे या घोटाळ्याची चर्चा मागे पडेल असेही बोलले जात आहे. जवळपास २६ हजार शिक्षकांवर अचानक बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळल्यामुळे जनतेत असंतोष आहे. बेरोजगारीचा प्रश्न हा कोणत्याही अन्य समस्येहून अधिक चिंताजनक असतो. साहजिकच, त्यातून उमटणाऱ्या सामाजिक आक्रोशास तोंड देण्याची वेळ ममता सरकारवर आली असती, तर ते अधिक अडचणीचे ठरले असते. वक्फ कायदाविरोधी आंदोलनामुळे त्या संकटाचे सावट तात्पुरते टळेल हा राजकीय फायदा ममता सरकारला मिळू शकतो.

पश्चिम बंगालचे राजकारण सत्ता, हिंसक संघर्ष आणि धार्मिक वादाभोवती फिरत राहिले आहे. वक्फ कायदा विरोधी आंदोलनांतून पुन्हा एकदा धार्मिक ध्रुवीकरण साधून आगामी विधानसभेत मतपेढीचे राजकारण करण्याचा एक आयता मुद्दाही ममता बॅनर्जीना मिळाला असावा. ममता बॅनर्जी यांनी आपली आडमुठी भूमिका कायम ठेवली तर राज्याच्या सामाजिक स्वास्थ्याचा विचार करून व अशा हिंसक अनाचारामुळे होणाऱ्या अराजकात समाज होरपळणार नाही याची जाणीव ठेवून केंद्र सरकारने ठोस भूमिका घेतली पाहिजे. अन्यथा, कुरघोडीच्या व विरोधाच्या राजकारणात सामान्य जनता निष्कारण भरडली जाईल. ज्या सामाजिक हिताच्या जाणिवेने कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला व संसदेने त्यास संमती दिली, त्या जाणिवेलाच मूठमाती मिळणे क्लेशदायक आहे. केंद्र सरकारने पश्चिम बंगालातील आंदोलनाचे गौडबंगाल उघड करून त्यावर योग्य तो इलाज करायलाच हवा. कारण, केवळ केंद्र सरकारला विरोध करायचा म्हणून जनतेच्या भावनांना वेठीस धरण्याचे राजकारण केवळ एखाद्या राज्याच्या नव्हे, तर संपूर्ण देशाच्या सामाजिक स्वास्थ्याकरिता आव्हान ठरू शकते.

## आंतरराष्ट्रीय

# व्यापारयुद्ध आणि चीन, युरोपवरील परिणाम

प्रा. जयसिंग यादव

'जोखीम कमी करा, वैविध्य आणा आणि व्यवसाय धोरण बदला' हा एके काळी जागतिक व्यापारावरील चीनच्या वाढत्या वर्चस्वाचा मुकाबला करण्यासाठी वापरला जाणारा मंत्र होता. तो आता अमेरिकेला लागू केला जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्क लादून ऑस्ट्रेलियापासून ब्राझीलपर्यंतच्या वित्तीय बाजारात खळबळ उडवून दिली. त्यांनी चिनी बनावटीच्या वस्तूंवरील शुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. व्हाईट हाऊसने स्पष्ट केले की चिनी उत्पादकांना अमेरिकेत आयातीवर एकूण १४५ टक्के शुल्क भरावे लागेल. कारण नवीन १२५ टक्के शुल्क वर्षाच्या सुरुवातीला लादलेल्या २० टक्क्यांव्यतिरिक्त आहे. बऱ्याच चिनी वस्तू, खास करून अमेरिकी बाजारपेठेसाठी बनवल्या जात असल्याने, चीनला ती उत्पादने देशांतर्गत ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात अडचणी येतील, अशी चिंता अर्थतज्ज्ञांना वाटते. अशा परिस्थितीमध्ये चीन आपल्या निर्यात धोरणाचा पुनर्विचार करीत आहे; जेणेकरून तो अमेरिकेत कमी झालेल्या निर्यातीचा धक्का दूर करण्यासाठी इतर जागतिक भागीदारांना प्राधान्य देऊ शकेल. लंडन येथील 'एनोडो इकॉनॉमिक्स'च्या संस्थापक आणि मुख्य अर्थशास्त्रज्ञ डायना चोयलेवा यांच्या मते चीन आपल्या प्रादेशिक शेजाऱ्यांना निर्यात वाढवण्याचा प्रयत्न करेल. त्यापैकी काही जणांशी त्याचे ऐतिहासिकदृष्ट्या तणावपूर्ण संबंध आहेत. चीन जुन्या शत्रूंसोबत संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. सहा वर्षांमध्ये प्रथमच जपान आणि दक्षिण कोरियाशी चीनचा आर्थिक संवाद नुकताच पुन्हा सुरू झाला आहे. हे सूचित करते की, या प्रदेशातील प्रमुख शक्ती अमेरिकेच्या अनिश्चिततेला प्रतिसाद म्हणून त्यांच्या संबंधांचा पुनर्विचार करत आहेत.

दक्षिण कोरियाने अमेरिकेच्या शुल्कवाढीला 'संयुक्त प्रतिसाद' देण्याचा चिनी सरकारी माध्यमांचा दावा नाकारला असला, तरी अनेक वर्षांच्या तणावपूर्ण संबंधांनंतर केवळ त्रिपक्षीय आर्थिक सहकार्य पुन्हा सुरू करणे हे धोरणात्मक बदलाचे संकेत देते. गेल्या दोन दशकांमध्ये चीन आणि आग्नेय आशियाने त्यांचे व्यापारी संबंध लक्षणीयरीत्या मजबूत केले आहेत. चीन सरकारच्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये चीन आणि 'एशियन' देशांमधील एकूण व्यापार सुमारे ८७२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आहे. चिनी कंपन्यांची अमेरिकेला होणारी निर्यात बंद झाल्यामुळे हा आकडा आणखी वाढणार आहे. चिनी उत्पादक आग्नेय आशियामध्ये अशा संधी शोधतील, ज्यात त्यांनी पूर्वी जास्त वेळ, मेहनत आणि पैसा गुंतवला नाही. कारण त्यांच्याकडे एक किफायतशीर अमेरिकी बाजारपेठ होती, जी त्यांची सर्व उत्पादने वापरत असे. अमेरिकेने पुकारलेल्या व्यापारयुद्धाला युरोपनेही त्याच भाषेत उत्तर दिले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्कवाढीला नव्वद दिवसांची स्थगिती दिल्याने युरोपीय महासंघानेही नव्याने लादलेल्या शुल्काला नव्वद दिवसांची स्थगिती दिली. याचा अर्थ अमेरिका आणि युरोप सध्या तरी जशास तसे उत्तर देण्याच्या मन:स्थितीत आहेत. 'टॅरिफ वॉर'मुळे अमेरिकेने जगातील अनेक मित्र गमावले आहेत, असा त्याचा अर्थ आहे. युरोपलाही आपल्या व्यापारात विविधता आणण्याची गरज आहे. अमेरिकेने लादलेले नवीन परस्पर शुल्क ९० दिवसांसाठी रोखून ठेवले असले तरी ४१६ अब्ज किमतीच्या युरोपीय महासंघामधील निर्यातीवर अमेरिका अजूनही २० टक्के शुल्क भरत आहे.



अमेरिकी संरक्षणवादाचा मुकाबला करण्यासाठी युरोपीय महासंघ 'इंडो-पॅसिफिक' आणि 'ग्लोबल साऊथ'मधील देशांपर्यंत पोहोचण्याची योजना आखत आहे. या आठवड्यात व्हिएतनामच्या तीन दिवसांच्या भेटीदरम्यान स्पॅनिश पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी युरोपला नवी बाजारपेठ शोधण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, त्यांचे सरकार युरोपला आग्नेय आशियाशी अधिक व्यापारासाठी खुले करण्यासाठी वचनबद्ध आहे. तथापि, 'युरोपियन पॉलिसी सेंटर' (ईपीसी) मधील धोरण विश्लेषक वर्ग फोकमन यांनी इशारा दिला की युरोपला इतर बाजारपेठांमधून ट्रान्स ॲटलांटिक निर्यातीची भरपाई करणे कठीण जाईल. कारण अमेरिकेची अर्थव्यवस्था मोठी आणि श्रीमंत आहे. नवीन व्यापार सौद्यांना युरोपीय महासंघाच्या सदस्यांमध्ये खूप विरोध केला. यामध्ये त्यांनी दक्षिण अमेरिकन प्रादेशिक ब्लॉक मर्कोसूर सोबत युरोपीय महासंघाच्या व्यापार कराराच्या वेळी ब्राझील आणि अर्जेंटिनासाठी कृषी क्षेत्र उघडण्याच्या फ्रान्सच्या सावधगिरीवर भर दिला. या कराराच्या वाटाघाटी करण्यासाठी २५ वर्षे लागली आणि अद्याप त्याला मान्यता मिळणे बाकी आहे. आज गरज असूनही नवीन सौद्यांची अंमलबजावणी करणे कदाचित खूप कठीण जाईल. वॉशिंग्टनस्थीत 'सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक ॲण्ड इंटरनॅशनल स्टडीज' (सीएसआयएस) या थिंक टँकने प्रकाशित केलेल्या एका टिप्पणीत म्हटले आहे की, अमेरिकेने चीनवर लादलेल्या टॅरिफमुळे चीन आता युरोपीय महासंघाला आपला माल पाठवण्यास सुरुवात करेल. यामुळे युरोपियन उत्पादकांवर आणखी दबाव येईल. यातून व्यापार वाचवण्यासाठी संरक्षणवादी उपायांची मागणी होऊ शकते.

युरोपीय महासंघाला बऱ्याच काळापासून चिंता आहे की, चीनचे सरकार त्यांच्या उत्पादकांना मोठ्या प्रमाणात अनुदान देते. यामुळे ते युरोपियन बाजारपेठेत अत्यंत स्वस्त किमतीत वस्तू विकतात. म्हणजेच ते युरोपियन बाजारपेठेत स्वस्त माल डम्प करू शकतात. स्वस्तात उपलब्ध असलेले मनुष्यबळ आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासह या अनुदानांमुळे युरोपीय कंपन्यांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. यामुळे अनेक कंपन्या बंद पडू शकतात. अनेकांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. सरकारी सबसिडी, टॅक्स ब्रेक आणि स्वस्त कर्जांमुळे 'बीवायडी', 'निओ'सारखे चिनी ब्रँण्ड आता युरोपियन बाजारपेठेत आक्रमकपणे प्रवेश करत आहेत आणि तिथल्या स्पर्धकांना मागे टाकत आहेत. युरोपमधील ऑटोमोबाईल उद्योग सध्या मोठ्या बदलाच्या काळातून जात आहे. यामुळे अनेक कारखाने बंद होण्याचा धोका आहे. काही कारखाने लहान होत आहेत आणि हजारो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत.

युरोपियन औद्योगिक धोरणाचे अभ्यासक फोकमन यांना शंका आहे की युरोपियन महासंघ निषेध न करता व्यापार विकृती स्वीकारेल. युरोपीय महासंघाने सूचित केले आहे की, ते आयातीवर बारीक लक्ष ठेवतील. चीन किंवा इतर ठिकाणाहून आयातीमध्ये तीव्र वाढ झाली, तर त्यावर ते अंकुश आणतील. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी युरोपीय महासंघ मध्य आशियाकडे नजर ठेवून आहे. २०२३ मध्ये युरोपीय महासंघाने कोणत्याही कमोडिटीची आयात अचानक खूप वाढल्यास युरोपियन उद्योगाला धोका आहे का हे तपासण्यावर पाळत ठेवण्यासाठी कार्य दल तयार करण्याची योजना जाहीर केली.

ही प्रारंभिक प्रणाली चीनशी संबंधित जोखीम कमी करण्यासाठी तयार करण्यात आली होती. ही 'टास्क फोर्स' युरोपीय महासंघाला जलद पावले उचलण्यास मदत करू शकते. उदाहरणार्थ, स्वस्त वस्तूंची तपासणी (ॲण्टी-डम्पिंग तपासणी), अतिरिक्त शुल्क लादणे किंवा काही काळ आयातीवर बंदी घालणे. तथापि, ट्रम्प यांच्याप्रमाणे संरक्षणवादी धोरणांचा अवलंब केल्यामुळे युरोपीय महासंघाला टीकेला सामोरे जावे लागू शकते. असे वागणे युरोपीय महासंघाच्या दीर्घकाळ चाललेल्या मुक्त व्यापार तत्त्वज्ञानातून बाहेर पडण्यासाखे असेल. त्यामुळे जागतिक व्यापार संघटनेचे नियम कमकुवत होऊ शकतात आणि जगभरातील व्यापार तणाव वाढू शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# असोसिएटेडचे भूत पुन्हा मानगुटीवर

काँग्रेसची पनोती जणू काही पाचवीला पुजली असावी. ती अजूनही संपण्याचे नाव घेत नाही. काँग्रेसच्या कार्यकाळामध्ये अनेक घोटाळे गाजले. राजीव गांधी पंतप्रधान असताना तर बोफोर्स तोफांचा घोटाळा देशातच नव्हे तर जगभर गाजला. असंच एक प्रकरण 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड' या काँग्रेसच्या एका कंपनीचे. हेही प्रकरण त्याच मालिकेतले. सध्या हा घोटाळा देशभर गाजत आहे. त्यामुळे सोनिया गांधी आणि राहुल गांधी पुन्हा एकदा चर्चेमध्ये आले असून, अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने पाठविलेल्या नोटीसमुळे देशभरात उत्सुकता वाढली आहे. काँग्रेस पक्षाच्या नियंत्रणामध्ये असलेल्या असोसिएटेड जर्नल्स लि. म्हणजे एजेएलच्या ६६१ कोटींच्या मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी ईडीने नोटीस बजावली आहे.

एजेएलची स्थापना १९३७ मध्ये करण्यात आली. तेव्हा या कंपनीच्या भागधारकांची संख्या जवळपास एक हजार एवढी होती. त्यापैकी बहुतांश भागधारक हे काँग्रेस पक्षाचे सदस्यच होते, हे विशेष. त्यानंतर एका वर्षाने १९३८ मध्ये पं. जवाहरलाल नेहरू असताना 'नॅशनल हेरॉल्ड' हे वृत्तपत्र सुरू झाले. परंतु, २००८ मध्ये यूपीएची सत्ता केंद्रामध्ये असताना नॅशनल हेरॉल्डने प्रथम ९० कोटी रुपयांच्या नुकसानीची नोंद केली. यावेळी काँग्रेस पक्षाने उपरोक्त कंपनीला ९० कोटी रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी या बाबीस विरोध झाला. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार कोणत्याही राजकीय पक्षाला कोणालाही कर्ज देण्याचा अधिकार नाही. मात्र, काँग्रेस पक्षाने सर्व संकेत पायदळी तुडवून कायद्याचे उल्लंघन केले. त्यानंतर दोन वर्षांनी २०१० साली 'यंग इंडियन लिमिटेड' या नावाची एक नवीन कंपनी तयार करण्यात आली. या कंपनीच्या भागधारकांमध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मोतीलाल व्होरा यांचा समावेश होता. सोनिया गांधी आणि राहुल गांधी या दोघांकडे या कंपनीचे ७६ टक्के शेअर्स होते. तर उर्वरित शेअर्स मोतीलाल व्होरा यांच्याकडे होते. त्यानंतर 'यंग इंडियन लिमिटेड'ने अधिक पैसे उभे करण्यासाठी एक फर्म स्थापन केली. त्याची नोंदणी कोलकाता येथे करण्यात आली. त्यानंतर या फर्मने ५० लाख रुपये उभे केले. त्यानंतर ही रक्कम एजेएलला देण्यात आली आणि त्याचे सर्व शेअर्स 'यंग इंडिया लिमिटेड'ला हस्तांतरित करण्यात आले.



दरम्यान काँग्रेस पक्षाने एजेएलला दिलेले ९० कोटी रुपयांचे कर्जही माफ केले. या कंपनी हस्तांतरणाच्या व्यवहारामध्ये 'मनी लॉण्ड्रिंग' झाल्याचा ईडीचा आरोप असून, या प्रकरणामध्ये मागे सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची ईडीने चौकशीही केली होती. सन २०१२ मध्ये सुब्रमण्यम स्वामी यांनी या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयामध्ये खटलाही दाखल केला होता. स्वामी यांनी दाखल केलेल्या दाव्यामध्ये काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी कोट्यवधी रुपयांची मालमत्ता बळकावल्याचा आरोप केला आहे. भारतामध्ये असोसिएट जर्नल्सजी करोडो रुपयांची संपत्ती असून, राजधानी दिल्लीमध्ये हेरॉल्ड हाऊस, मुंबईतील वांद्रे परिसरत इमारत व लखनौमध्येही या कंपनीची मालमत्ता आहे. काँग्रेस पक्षाचा इतिहास बघता उपरोक्त कंपनीच्या हस्तांतरणामध्ये घोटाळे झालेच नसतील, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरेल. केंद्रामध्ये भाजपाचे सरकार असल्यामुळे आपल्या सवयीनुसार काँग्रेस पक्ष भाजपावर खापर फोडून सामान्य जनतेमध्ये भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न निश्चितच करेल. परंतु, वारंवार खोटं कितीही रेटून बोललं तरीही ते सत्य कधीच होत नाही. या देशावर जवळपास ६० वर्षे राज्य करूनही काँग्रेसची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. जग बदलत असले तरी काँग्रेस अजूनही बदलायला तयार नाही. विरोधकांना निव्वळ शिव्या देऊन सत्ता हस्तगत करण्याचे दिवस लयाला गेलेत. आपल्या कर्तृत्वाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेच्या मनामध्ये एक विशिष्ट स्थान निर्माण केले आहे. उपरोक्त प्रकरणामध्ये पुन्हा एकदा त्यामध्ये नरेंद्र मोदी यांना ओढून काँग्रेस पक्ष आपला जुना राग आलापणार आहे, हे निश्चित. परंतु, जनतेलाही सर्व काही कळून चुकले आहे. त्यामुळे काँग्रेसचा सर्व आटापिटा याहीवेळी वाया जाणार आहे.

९८८१७१७८५६

# मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

**तृतिय सरसंघचालक प.पू.श्री.मधुकर दत्तात्रेय देवरस तथा बाळासाहेब देवरस सन १९४३ मधील प्रसंग. पुण्याच्या संघ शिक्षा वर्गात बाळासाहेबांचा परिचय करून देताना श्री.गोळवलकर गुरुजींनी स्वयंसेवकांना उद्देशून म्हटले, तुमच्यापैकी अनेक स्वयंसेवक असे असतील, की ज्यांनी डॉक्टरांना पाहिले नसेल. त्यांनी बाळासाहेबांकडे पहावं. डॉक्टर कसे होते हे त्यांच्याकडे पाहिल्यावर कळेल. अशीच एक दुसरी सन १९४५ मधील घटना आहे, नागपूर येथील रेशीमबाग संघस्थानावर एका उत्सवासाठी गाळवळकर गुरुजी टांग्यातून चालले होते. तीन - चार स्वयंसेवकांबरोबर बाळासाहेब त्या कार्यक्रमासाठी पायी जात असलेले गुरुजींना रस्त्यात दिसले. टांग्यात आपल्या शेजारी बसलेल्या कृष्णराव मोहरीर यांना गुरुजी म्हणाले, खरे सरसंघचालक तर पायी चालले आहेत आणि नकली सरसंघचालक टांग्यातून. या दोन प्रसंगांचा विचार करता बाळासाहेब देवरस यांची संघ कामातील सुरुवातीपासूनची समर्पण वृत्ती लक्षात येते व यातूनच संघाला तृतिय सरसंघचालक मिळाले.**

११ डिसेंबर रोजी नागपूर येथे बाळासाहेबांचा जन्म झाला. बाळासाहेबांचे वडील महसूल खात्यात शासकीय अधिकारी होते, त्यामुळे वेगवेगळ्या गावांमध्ये बाळासाहेबांना वडिलांबरोबर जावे लागले. बाळासाहेबांची आई धर्मपरायण होती, त्यामुळे सर्व मुलांवर उत्तम धार्मिक संस्कार झाले. पाच भाऊ व चार बहिणी अशा नऊ भावंडांमध्ये बाळासाहेब यांचा चौथा क्रमांक होता. त्यांच्या पाठीवरचा भाऊ म्हणजेच भाऊराव देवरास यांनी देखील संघ कामांमध्ये अनेक मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. एकाच कुटुंबातील दोन भावांनी संघ कामासाठी आपले अवघे आयुष्य दिले आहे. नागपूर या ठिकाणी डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ मध्ये संघाची स्थापना केली, त्याच वर्षी या दोन भावंडांची मुंज झाली होती. एक प्रकारे नव्या गोष्टी शिकण्यासाठी ही दोन भावंडे तयार झाली होती व त्यांनी शाळेबरोबरच संघाच्या शाखेवरही प्रवेश केलेला होता.

संघाच्या कामामध्ये बाळासाहेब अगदी बाल असल्यापासून दाखल झाले व लवकरच या कामात रमले. डॉ.हेडगेवार यांचा ज्या स्वयंसेवकांना सहवास लाभला, यापैकी एक असणाऱ्या बाळासाहेबांनी डॉ. हेडगेवार यांच्याकडून अनेक गोष्टी शिकून घेतल्या. संस्कृत आणि दर्शनशास्त्र हे विषय घेऊन बाळासाहेब बी.ए. झाले, त्याच वर्षी त्यांनी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. संघाच्या कामांमध्ये अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. नागपूर येथील इतवारी शाखेचे काम सर्वात मागे होते, नेमकी याच शाखेची जबाबदारी बाळासाहेबांनी घेतली व आपल्या कुशल नेतृत्वाने त्यांनी इतवारी शाखेच्या कामाला गती दिली. थोड्याच कालावधीमध्ये नागपूरमधील इतवारी शाखेचे काम सर्वात चांगले ठरले. इतवारी हा भाग त्यावेळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता, त्यामुळेच बाळासाहेबांनी या शाखेचा उत्तम विस्तार केला. अनेक नवनवीन उपक्रम - कार्यक्रम या शाखेमध्ये त्यांनी घेतले. पुढच्या काळामध्ये संघाच्या अनेक जबाबदाऱ्या त्यांच्याकडे चालून आल्या व या सर्व जबाबदाऱ्या बाळासाहेबांनी अत्यंत समर्पण भावनेने व प्रामाणिकपणाने पार पाडल्या.

डॉ.हेडगेवार यांच्याबरोबरच द्वितीय सरसंघचालक श्री.गोळवळकर गुरुजी यांचा बाळासाहेबांना दीर्घ असा सहवास लाभला. गुरुजी सरसंघचालक असताना बाळासाहेबांकडे अखिल भारतीय स्तरावरील अनेक जबाबदाऱ्या आल्या. ते सरकार्यवाह म्हणून देखील कार्यरत राहिले. प्रथमपासूनच बाळासाहेबांकडे भावी सरसंघचालक म्हणून गुरुजी पहात होते व आपला शेवटचा श्वास घेत असताना ५ जून १९७३ मध्ये गुरुजींनी बाळासाहेबांना सरसंघचालक म्हणून नियुक्त केले. सरसंघचालक ही जबाबदारी आल्यानंतर बाळासाहेबांना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. विशेषतः त्यानंतर लगेचच आलेल्या आणीबाणीमध्ये संघ व बाळासाहेब यांना मोठा त्रास सहन करावा लागला. आणीबाणीमध्ये ओघानेच संघावर देखील बंदी लादण्यात आली. संघाच्या हजारो - लाखो स्वयंसेवकांनी आणीबाणीच्या विरोधात संघर्ष केला, अशा स्वयंसेवकांना तुरुंगामध्ये टाकण्यात आले. बाळासाहेबांना देखील अटक करण्यात आली व पुण्याच्या येरवडा येथील कारागृहात ठेवण्यात आले. संघावर आलेली बंदी व झालेला कारावास या गोष्टीमुळे बाळासाहेब थोडे देखील डगमगले नाहीत. उलट त्यांनी संघ स्वयंसेवक व त्यांच्या कुटुंबीयांचे पालकत्व स्वतःकडे घेऊन सर्वांना आधार देण्याचे काम केले. आणीबाणी संपल्यानंतर विसरून जा, माफ करा असा स्वयंसेवकांना संदेश देऊन कोणताही संघर्ष होऊ दिला नाही.

हिंदुत्व व हिंदुत्ववादी संघटनांच्याविरुद्ध या कालखंडात मोठे वातावरण तयार करण्यात आले, सरकार पुरस्कृत काही गोष्टीही करण्यात आल्या. पंजाब मधील खलिस्तानी चळवळही याच कालखंडात निर्माण झाली. साहजिकच हिंदू समाजाचे संघटन करणे ही गोष्ट अशक्यप्राय झालेली होती. संघ व हिंदुत्वाचा विचार हा अवहेलनेचा - चेष्टेचा विषय झालेला होता. अल्पसंख्यांकांच्या नावाखाली एका विशिष्ट समुदायाचे लांगुलचालन करण्यासाठी सरकार व काँग्रेस अनेक हिंदू विरोधी गोष्टी करत होते, सरकारला जाब विचारणारी विरोधी पक्षांची सक्षमता देखील नव्हती. अशा कालखंडामध्ये हिंदुत्वाचा विचार जिवंत ठेवण्यासाठी बाळासाहेबांनी स्वयंसेवकांना सातत्याने मार्गदर्शन केले, प्रेरणा दिली व स्वतः अखंडपणे प्रवास करून संघाचे काम सर्वव्यापी व सर्वस्पर्शी बनविण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडामध्ये सन १९८९ साली डॉ.हेडगेवार यांची जन्मशताब्दी आली. या निमित्ताने सेवा विषयामध्ये संघाने विशेष लक्ष घातले. बाळासाहेबांच्या दूरदृष्टीतून व मार्गदर्शनातून हजारो सेवा प्रकल्प उभारले गेले व या प्रकल्पातून समाजाला मोठी मदत लाभली.

एकीकडे एका विशिष्ट समुदायाचे लांगुलचालन होत असतानाच दुसरीकडे अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमीच्या संदर्भाने सरकार सातत्याने आडकाठी निर्माण करत होती, अशा परिस्थितीमध्ये राम जन्मभूमीच्या मुक्ती आंदोलनाला योग्य मार्गदर्शन करण्याचे व दिशा देण्याचे काम बाळासाहेबांनी केले. अनेक नव्या क्षेत्रामध्ये स्वयंसेवकांना पाठवून कामाला सुरुवात केली. अस्पृश्यता ही गोष्ट वाईट नसेल तर जगात कोणतीच गोष्ट वाईट नाही असा विचार पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत मांडून बाळासाहेबांनी अस्पृश्यतेचा स्पष्ट शब्दात धिक्कार केला. बाळासाहेबांच्याच कालखंडामध्ये समरसता या नव्या विषयाला सुरुवात झाली. हिंदू समाजाचे संघटन करत असताना अस्पृश्यता, भेदाभेद व जातीयता या गोष्टींना कोणताच थारा असू शकत नाही ही गोष्ट बाळासाहेबांनी वारंवार मांडली व स्वयंसेवकांना समरसता निर्माण करण्यासाठी प्रवृत्त केले. संघाचे काम वेगवेगळ्या ज्ञाती व जात प्रवर्गामध्ये पोहोचविण्याचे काम बाळासाहेबांनी केले. वेगवेगळ्या प्रकारच्या आंदोलनाला दिशा देण्याचे काम बाळासाहेबांनी केले. डॉ.हेडगेवार व श्री.गोळवळकर गुरुजी यांनी पुढील सरसंघचालक कोण होणार याचे इच्छापत्र लिहून ठेवले होते व या दोघांच्या देहावसनानंतर संघाला या इच्छापत्रानुसार नवीन सरसंघचालक मिळाले. परंतु अत्यंत निस्वार्थ - निरपेक्ष भावनेने आयुष्य संघासाठी अर्पण केलेल्या बाळासाहेबांना आपल्या शारीरिक दुर्बलतेची जाणीव होताच नवीन सरसंघचालक नेमण्याची पूर्वपरंपरा त्यांनी बाजूला ठेवून ११ मार्च १९९४ मध्ये श्री.राजेन्द्रसिंह बलवंतसिंह ठाकूर यांच्याकडे चतुर्थ सरसंघचालकपदाची जबाबदारी सोपविली व स्वतः निवृत्ती स्वीकारली. आपले सारे आयुष्यच देश व संघ कार्यासाठी वाहणाऱ्या बाळासाहेबांना पद - प्रतिष्ठेचा मोह नव्हता, त्यामुळेच मी आता दुर्बल झालो आहे, माझ्याकडून आता काम होत नाही हे लक्षात घेऊन त्यांनी सरसंघचालक पदाचा त्याग केला व अखेरच्या श्वासापर्यंत ते मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहिले. १७ जून १९९६ मध्ये पुणे या ठिकाणी त्यांचे देहावसन झाले. विशेष गोष्ट म्हणजे ते अत्यंत आजारी असल्याच्या क्षणीच भारताच्या पंतप्रधानपदावर अटलबिहारी वाजपेयी सारख्या एका स्वयंसेवकाने शपथ घेतली, दूरदर्शनवरून हा सोहळा बाळासाहेबांनी पाहिला. एक संघ स्वयंसेवक, एक प्रचारक भारताच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाला याचा बाळासाहेबांना खूपच आनंद झाला होता. असे हजारो - लाखो स्वयंसेवक बाळासाहेबांनी निर्माण केले, ज्या स्वयंसेवकांनी समाजाची व देशाची सेवा केली. बाळासाहेबांनी आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत असे स्वयंसेवक निर्माण केले, ज्या स्वयंसेवकांच्या कार्यातून आजचा आधुनिक भारत घडतो आहे. बाळासाहेबांनी एक संत वृत्तीचे जीवन जगून या देशातील लाखो - कोट्यावधी स्वयंसेवकांना, हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना कायम प्रेरणा देण्याचे काम केले व आजही करत आहेत.

**- डॉ.सचिन लादे, पंढरपूर**

## अति झालं अन् हसू आलं

एखाद्या राजकीय, सामाजिक धोरणावर प्रतिक्रिया देताना, त्या धोरणाचे कारण, त्याचे फायदे-नुकसान, सामाजिक आणि आर्थिक परिणाम पावर सखोल अभ्यास असणे आवश्यक आहे. पण काही राजकीय मंडळी, पक्षाचे प्रवक्ते माईकवा दांडा समोर आला की त्यांना कोणत्याही विषयावर प्रतिक्रिया दिल्याशिवाय राहवत नाही. एक मात्र खरे की यामुळे ही मंडळी सातत्याने प्रसिद्धी माध्यमाच्या झोतात राहतात. बरे एकतर या सगळ्या मंडळींचा प्रतिक्रिया देताना आविर्भाव असा असो असतो की त्या विषयावरील सर्वज्ञ त्यांनाच आहे. हीच बाब विरोधी पक्षातील प्रामुख्याने उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राउत, आदित्य ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, रोहित पवार, काँग्रेस पक्षाचे विजय वडेटीवार यांच्या बाबतीत झाली आहे. ही मंडळी दररोज ऊठसूठ कोणत्याही विषयावर मराठी वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींनी काहीही विचारले की, आपली प्रतिक्रिया देताना दिसतात. या प्रतिक्रिया देण्याच्या धुंदीत या मंडळींना आपण ज्या पक्षाचे नेतृत्व करतो त्या पक्षाचे किती मोठे नुकसान करत असतो, याची पुसटशी कल्पना नसते, पण एक मात्र खरे की, पांचा मात्र प्रसिद्धी माध्यमांत राहण्याचा अट्टहास पूर्ण होतो.

**- अविनाश देशपांडे/९२८४६७९६२३**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. बाबासाहेबांना अभिवादन



### एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळा

**सोलापूर :** एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष नॅब संस्थेचे सन्माननीय सदस्य माणिक यादव तर प्रमुख पाहुणे उप-कोषागार अधिकारी वसीम बागवान होते. कार्यक्रमास नॅब संस्थेचे उपाध्यक्ष अंकुश कदम व कार्यशाळेची अधीक्षक रामचंद्र कुलकर्णी, रियाज मुल्ला व आकांक्षा भंडारे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रस्तावना आकांक्षा भंडारे यांनी केली. शिवशरण गडदुरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर गाणे गायले. दीपांजली केसकर व हर्षद पुंडगे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण माणिक यादव यांनी केले. सूत्रसंचालन शिवकुमार पाटील तर आभार शिवशरण गडदुरे यांनी केले. कार्यक्रमास श्रीनिवास समदूर्ले व शुभम वांझरे यांची उपस्थिती होती.



### कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय

**सोलापूर :** कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे प्रमुख विश्वस्त जयकुमार माने यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक दादाराव डांगे यांनी बाबासाहेबांचे जीवन व कार्य याविषयी आपले विचार व्यक्त केले. प्रशालेचे मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड यांनी बाबासाहेबां विषयी आपले विचार व्यक्त केले. प्रास्तावित वसंत गुंगे यांनी केले. कार्यक्रमास राष्ट्र विकास प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मंगला नाईकनवरे उपस्थित होत्या.



### प्रशांत गायकवाड मित्र परिवार

**सोलापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रशांत गायकवाड मित्र परिवाराच्यावतीने गेल्या १८ वर्षापासून भीम अनुयायांना पाणपोईची सोय करण्यात येते. यंदाच्या वर्षीही हजारो भीम अनुयायांना पाणी बॉटलचे वाटप खासदार प्रणिती ताई शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, शिक्षण अधिकारी कादर शेख, समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, राष्ट्रवादी युवक प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, युवासेना प्रमुख सागर शितोळे, सुमित वाघमोडे, कार्यक्रमाचे संयोजक प्रशांत गायकवाड आदींची उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पाणी बॉटलचे वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा संयोजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळीअरुण क्षीरसागर, सचिन घोडके, गिरीश जाधव, उमाकांत राजगुरू , संजय कांबळे, पद्मसिंह शिंदे उपस्थित होते.



### पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय

**सोलापूर :** पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयामध्ये भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले प्रस्तावना करताना पांडुरंग दिड्डी अध्यक्ष म्हणाले की ब्रिटिश सरकारच्या प्रांतीय मंत्रिमंडळात ते कामगार मंत्री होते त्यामुळे त्यांचे बरेच वास्तव्य दिल्लीमध्ये असायचे त्यावेळी बाबासाहेबांनी या देशाच्या उभारणीत मोठे योगदान दिले मंत्री पदावर असताना त्यांनी देशावर दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेतले. आभार कार्यवाह अरविंद चिन्नी यांनी मानले. यावेळी बाबासाहेबांना अभिवादन करताना संस्थेचे गणपत कुरापाटी, वासुदेव इप्पलपल्ली तसेच अभ्यासिकेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी संस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.



### महावितरण कार्यालय

**सोलापूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालय येथे साजरी करण्यात आली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर शहर ई उपविभाग अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे, मेहबुब बागवान, निलकंठ कांबळे, अनिलकुमार बनसोडे, धुळाप्पा टेळे, अमोल धायगुडे, गुंडप्पा बनसोडे, प्रदीप मुलादे, संभाजी रुपनर, मल्लिनाथ मुन्नोळी, चंद्रकला शिंदे, हिना बागवान उपस्थित होते.

# शहरात वाढतेय मुजोर रिक्षाचालकांची दादागिरी..!

## गतिरोधक चुकवण्यासाठी दुचाकीस्वराला मारला कट; हैदराबाद रोडवरील घटना

■ वाहतूक शाखेसह आर. टी. ओ विभागाने सातत्याने कारवाई करण्याची गरज

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल**

सोलापूर स्मार्ट सिटीत गेल्या काही दिवसांपासून दिवसेंदिवस मुजोर रिक्षाचालकांची दादागिरी वाढत आहे. प्रवासी दिसताक्षणी मागचा पुढचा कोणताही काही विचार न करता, जागेवर ब्रेक लावून रिक्षा थांबवणे..! रस्त्याच्या कडेला घोळखा करून रिक्षा थांबवणे. वाहनधारकांनी विचारले असता अर्वाच्य भाषेत बोलणे... अशा घटना वारंवार घडत आहेत. अशीच एक घटना आज हैदराबाद रोडवर बाजार समितीच्या दुसऱ्या प्रवेशद्वारासमोर घडली. रस्त्यातील गतिरोधक चुकवण्यासाठी भरधाव रिक्षाचालकाने अचानक आपली लेन बदलून दुसऱ्या लेनमध्ये येऊन दुचाकीस्वराला कट मारण्याचा प्रयत्न केला. चोर तो चोर वर शिरजोर असे करत रस्त्याच्या मधोमध रिक्षा थांबवून हुज्जत घालणाऱ्या मुजोर रिक्षाचालकांवर लगाम घालणे गरजेचे बनले आहे.



**सोलापूर : गतिरोधक चुकवण्यासाठी रिक्षा चालकाने भरधाव वेगाने लेन बदलून दुचाकीस्वाराला कट मारला आणि रस्त्याच्या मधोमध रिक्षा थांबून हुज्जत घातल्याचे हे हैद्राबाद रोडवर टिपलेले छायाचित्र.**

दरम्यान, वाहनधारकांनी वेग मर्यादा पाळावी व होणाऱ्या संभाव्य अपघातावर आळा घालण्यासाठी गतिरोधक तयार करण्यात आलेले आहेत. मात्र हे गतिरोधक चुकवण्यासाठी आपली लेन बदलून भरधाव रिक्षाने ईतर वाहनधारकांना कट मारणे, अरेरावीची भाषा करत दादागिरी करणे हे कितपत योग्य आहे ? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर हे चित्र नेहमी दिसून येते. त्याच पद्धतीने गजबजलेल्या आणि मार्केटच्या ठिकाणी देखील रिक्षाचालकांचा उद्दामपणा दिसून येतो. या मुजोर रिक्षाचालकांची मुजोरी वाढत आहे. याकडे वाहतूक विभागाच्या पोलिसांनी तसेच आर. टी. ओ विभागाने कारवाई करणे गरजेचे बनले आहे. अन्यथा अशा रिक्षाचालकांची मुजोरी आणखीन वाढणार आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात नेहमी वाहतुकीचे नियम पायदळी तुडवले जातात. त्यामध्ये रिक्षाचालकांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. रॉंग साईडने वाहतूक करणे. भरधाव रिक्षा चालवून अपघातास कारणीभूत ठरणे अशा घटनांना खतपाणी घातले जात आहे. सातरस्ता येथे सर्रासपणे विरुद्ध दिशेने वाहन चालवले जाते. विनापरवाना रिक्षाचालकांवर आरटीओने कारवाई करण्याची मोहीम सुरू करावी. कारण रिक्षा चालकांनी वाहतुकीचे नियम पाळून व्यवसाय करणे आवश्यक असताना, अरेरावी करण्यात धन्यता मानत आहेत. अशा मुजोर रिक्षाचालकांवर लगाम घालणे आवश्यक आहे.

### गतिरोधक कशासाठी चुकवण्यासाठी का ?

सोलापूर शहरातील विविध रस्त्यांवर बेलगाम धावणाऱ्या वाहनांना लगाम घालण्यासाठी वाहतूक शाखा व महापालिका प्रशासन यांच्या संयुक्तिने रस्त्यावर गतिरोधक तयार केले जातात. परंतु हल्लीच्या काळात रिक्षाचालक सर्रासपणे गतिरोधक चुकवण्यासाठी रस्त्याच्या दुसऱ्या लेनवर जाऊन रिक्षा चालवतात. आता परिस्थितीत भरधाव वेगाने येणाऱ्या रिक्षांमुळे वाहतूक कोंडी निर्माण होत. काही प्रसंगी अपघाताचा धोका बळावतो. या दुर्दैवी घटना टाळण्यासाठी गतिरोधक बनवले जातात. मात्र काही मुजोर रिक्षाचालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करण्यात धन्यता मानत आहेत. तेव्हा सर्व सामान्यांना रस्त्यावर गतिरोधक कशासाठी चुकवण्यासाठी का ? हा प्रश्न नागरिकांना व वाहनधारकांना सतावत आहे.

### त्या रिक्षाचालकांकडे नाही बॅच बिल्ला आणि गणवेश

शहरातील विनापरवाना रिक्षाचालकांकडे बॅच बिल्ला तसेच गणवेश नसल्याचे दिसून आले आहे. आजच्या या घटनेत देखील हीच परिस्थिती होती. अरेरावी करणाऱ्या रिक्षाचालकाच्या अंगावर गणवेश नव्हताच.. त्याच पद्धतीने बॅचबिल्ला देखील दिसून आला नाही. अशा निर्ढावलेल्या रिक्षाचालकांकडून नेहमीच धोका संभवतो आहे. भरधाव वेगाने रिक्षाचालवून व क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी रिक्षामध्ये बसवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ चालवलेला आहे. अशा मुजोर रिक्षाचालकांमुळे अपघात होण्याची शक्यता आहे.

## महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.आंबेडकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल -**

सोलापूर महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील त्यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील कार्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर बुधवार पेठ येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार या ठिकाणी आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त मनिषा मगर,नगर अभियंता सारिका अकुलवार,माजी गटनेते आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी,चंद्रकांत सोनावणे, विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, हिदायत मुजवार, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, पशु वैधकीय अधिकारी डॉ. सतीश चौगुले, उद्यान प्रमुख किरण जगदाळे उपस्थित होते.







**सोलापूर : काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पार्क चौकातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.**

## सोलापूर उपविभागात १९१ तक्रारी अर्जांचा निपटारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल -**

शासन सेवा जनतेच्या दारी अर्ज निपटारा मोहिमेअंतर्गत सोलापूर उपविभागातील चारही पोलीस ठाण्याकडील १९१ तक्रारी अर्जांचा निपटारा करण्यात यश आले आहे.

ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यास नागरिकांच्या विविध प्रकारचे तक्रारी अर्ज प्राप्त होतात. त्या तक्रारी अर्जांचा निपटारा करण्याकरीता तक्रारी अर्जातील संबंधित अर्जदार व गैरअर्जदार यांना पोलीस ठाण्यास बोलावून त्यांची गाऱ्हाणी ऐकून तक्रारी अर्जांचा निपटारा करण्याकरिता आठवडयाच्या प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिन साजरा करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिले आहेत.

त्यानुसार सोलापूर उपविभागातील सोलापूर तालुका, मोहोळ, मंद्रूप व कामती या पोलीस ठाण्यास महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसीय सुशासन मिशन अंतर्गत नागरिकांच्या प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जांचा जलद व न्यायालयीन निपटारा करण्याकरीता उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या नेतृत्वाखाली चारही पोलीस ठाण्यात एक दिवस विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

या विशेष मोहिमेअंतर्गत तालुक्याचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे, मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे, कामतीचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार, मंद्रूपचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी सहभाग घेतला. या मोहिमेअंतर्गत तक्रारी अर्जांचा निपटरा करण्याकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कायदेविषयक सल्लागार ॲड. रेवण पाटील यांनी योगदान दिले. राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमतं चारही पोलीस ठाण्यातीलइ एकूण १९१ तक्रारी अर्जांचे त्वरीत आणि शांततापूर्ण निपटारा करण्यात आला. त्यामध्ये जमीन, मालमत्ता वाद, कौटुंबिक तक्रारी, सार्वजनिक स्थानावरील वाद, शाळा-कॉलेजसंदर्भातील समस्या आणि इतर नागरी हक्कांश निगडीत तक्रारी अर्जांचा समावेश होता.

### उपक्रमांची साखळी राबविणार...

ग्रामीण पोलिसांचे हे कार्य जनतेच्या सेवेसाठी कार्यरत प्रशासन या तत्वाची साक्ष देते. पुढील १०० दिवसांत अशाच उपक्रमांची साखळी राबविण्यात येणार असून नागरिकांनी सहकार्य करून आपले प्रश्न उपविभागीय पोलीस ठाण्याकडील संबंधीत पोलीस ठाण्यात मोकळेपणाने मांडावेत, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांनी केले आहे.


अुत्तम सेवा | मंगळवार दि. १५ एप्रिल २०२५ | **नोकरीच्या शोधात**

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | | | |
| १ | राज्यसेवा पूर्व परिक्षा (१२७ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | १७/०४/२५ |
| २ | वनसेवा पूर्व परिक्षा (१४४ पदे) | पदवी (विज्ञान) उत्तीर्ण स्त्री/पुरुष | ४३ पर्यंत | |
| ३ | स्थापत्य अभियांत्रिकी (११४ पदे) | पदवी (स्थापत्य) उत्तीर्ण स्त्री/पुरुष | ३८ पर्यंत | |
| **२)** | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| १ | असि. लोको पायलट (९९७० पदे) | पदवी/पदविका (मेकॅ/इले/इलेक्ट्रॉ / ऑटो) अभियांत्रिकी उत्तीर्ण किंवा ITI (इले / फिटर / इन्स्ट्रू / टर्नर /रेडिओ /इलेक्ट्रॉ/मोटार/वायरमन/ट्रॅक्टर/ डिझेल/मशिनीस्ट/ए. सी.) उत्तीर्ण | ३० पर्यंत | ११/०५/२५ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **३)** | **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या.** | | | |
| १ | निम्न श्रेणी लिपीक (२६० पदे) | B.Com व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ०२/०५/२५ |
| २ | सहा. अभियंता (१३४ पदे) | B.E व (सिव्हील) उत्तीर्ण असावे | | |
| ३ | उच्च श्रेणी लिपीक (३७ पदे) | B.Com व MS-CIT उत्तीर्ण तसेच लेखा परीक्षा उत्तीर्ण असावे | ५७ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा | १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. | www.uttamseva.org


## सोलापूर महानगरपालिका

इंद्रभुवन आंबेडकर चौक रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००२
कामगार कल्याण व जनसंपर्क कार्यालय ई मेल - smclwpro@gmail.com

### जाहीर आवाहन

सोलापूर शहरातील सर्व संवगातील दिव्यांग लाभार्थ्यांना सोलापूर म.न.पा. कडील कामगार कल्याण व जनसंपर्क कार्यालयाकडुन उदरनिर्वाह भत्ता दरमहा अदा केला जातो. तरी या जाहीर आवाहनाद्वारे सोलापूर शहरातील उदरनिर्वाह भत्ता घेणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांना कळविण्यात येते की, दि.१५/०४/२०२५ ते १५/०५/२०२५ आखेर हयातीचे दाखले खालील विहीत नमुन्यामध्ये सोलापूर महानगरपालिकेमध्ये ऑफलाईन तसेच lwpro.solapurcorporation.org या संकेत स्थळावर जमा करण्याची दक्षता घेण्यात यावी.

हयातीचे दाखले कार्यालयातील वेळेत कामगार कल्याण कार्यालय सो.म.पा. येथे स्वीकारले जातील. ज्या लाभार्थ्यांचे दि. १५/०५/२०२५ पर्यंत मुदतीत हयातीचे दाखले प्राप्त होणार नाहीत त्या लाभार्थ्यांचे हयातीचा दाखलाचा विचार केला जाणार नाही याची गांर्भीयाने नोंद घेण्यात यावी.

सदर हयाचीचा दाखला खालीलपैकी सक्षम अधिकारी यांचेकडुन साक्षांकित करुन घ्यावा.
**१) राजपत्रित अधिकारी, २) बँक मॅनेंजर ३) प्राथमिक / हायस्कूल मुख्याध्यापक,**

**उपआयुक्त-२**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

### हायातीचा दाखला नमुना
### हयातीचा दाखला

दाखला देण्यात येतो की,
श्री/श्रीमती/सौ-नाव -----------------------------------------------------
राहणार ------------------------------------------------------- सोलापूर
दिव्यांगाचे प्रकार :----------------------------- टक्केवारी:--------%
इतर शासकीय योजनेचा लाभ घेता का? होय किंवा नाही
घेत असल्यास कोणत्या शासकीय योजनेचा लाभ घेता ------------------------------
मो.नं.:---------------
दिनांक :- **सही व शिक्का**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### अक्षर पटेलला १२ लाखांचा दंड

**नवी दिल्ली :** आयपीएल सामन्यात मुंबई इंडियन्सकडून झालेल्या १२ धावांच्या पराभवादरम्यान दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलला संथ गतीने षटके टाकल्याबद्दल १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. मुंबई इंडियन्सने २० षटकांत ५ बाद २०५ धावा केल्या, तर प्रत्युत्तर देताना दिल्ली कॅटिपल्स १९ षटकांत १९३ धावांवर बाद झाला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्धच्या २९ व्या सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलला दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएलच्या संथ गतीसाठीच्या आचारसंहितेच्या कलम २.२२ अंतर्गत या हंगामातील त्याच्या संघाचा हा पहिलाच गुन्हा असल्यामुळे पटेलला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, असे बीसीसीआयने म्हटले आहे.

या स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सचा हा पहिलाच पराभव असला तरी, अक्षरने संघर्ष सुरूच ठेवला, पाच सामन्यांमध्ये त्याला बळी मिळाला नाही व फलंदाजीत त्याला केवळ ६७ धावा करता आल्या.

# कोलकाता, पंजाब पुढे जाण्यास उत्सुक

◆ **मुल्लानपूर, १४ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामात मंगळवारी येथे गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्ज यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. हे दोन्ही संघ अव्वल चार क्रमांकात स्थान मिळवण्यास उत्सुक असतील.

सध्या आयपीएलच्या गुणतालिकेत कोलकाता नाईट रायडर्स व पंजाब किंग्जचे प्रत्येकी ६ गुण असून ते अनुक्रमे पाचव्या व सहाव्या स्थानावर आहे.

गुजरात टायटन्स, दिल्ली कॅपिटल्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, लखनौ सुपर जायण्ट्सने प्रत्येकी ८ गुण असून सरस धावगतीच्या आधारे ते पहिल्या ते चौथ्या स्थानावर आहेत. मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स व सनरायझर्स हैदराबादचे प्रत्येकी ४ गुण असून ते अनुक्रमे सातव्या, आठव्या व नवव्या स्थानावर आहे. पाच वेळचा विजेता चेन्नई सुपर किंग्जचे केवळ दोन गुणांसह तळाच्या स्थानी आहे.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्ज संघ काहीसा दबावाखाली आहे. हैदराबाद येथील गत सामन्यात पंजाबने सनरायझर्स हैदराबादसमोर २४६ धावांचे आव्हान ठेवले होते, परंतु अभिषेक शर्माने अवघ्या ५५ चेंडूत १४१ धावांची तुफानी खेळी केल्यामुळे पंजाब किंग्जला पचवण्यास कठीण पराभव पत्करावा लागला. २४५ धावा इतक्या मोठ्या धावसंख्येवर उतरल्यानंतरही संघ पराभूत होणे दुर्मिळ आहे, त्यामुळेच पंजाब किंग्ज काहीसा दडपणाखाली आहे.

एक दिलासादायक बाब म्हणजे गत सामन्यात पंजाबच्या अव्वल चार फलंदाजांनी- कर्णधार श्रेयस अय्यर (३६ चेंडूत ८२ धावा), सलामीवीर प्रियांश आर्य (३६), प्रभसिमरन सिंग (४२) व नेहल वढेराने (२७) जबरदस्त



अजिंक्य रहाणे



श्रेयस अय्यर

फलंदाजी केली, आता मंगळवारी, पंजाब आपल्या घरच्या मैदानावर मुल्लानपूर येथे केकेआरविरुद्धच्या सामन्यातही त्यांच्याकडून अशीच भरीव कामगिरीची अपेक्षा आहे. येथील खेळपट्टी फलंदाजांसाठी देखील अनुकूल आहे. त्यामुळे ग्लेन मॅक्सवेल व मार्कस स्टोयनिससुद्धा उत्तम कामगिरी करतील अशी अपेक्षा आहे. मुल्लानपूर येथील दोन सामन्यांमध्ये प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने २०० पेक्षा जास्त धावा केल्या.

मात्र पंजाब किंग्जच्या गोलंदाजी विभागाला आत्मविश्वासाने झुंज द्यावी लागणार आहे. गत सामन्यात युझवेंद्र चहल व ग्लेन मॅक्सवेल या दोन फिरकीपटूंनी सात षटकांत ९६ धावा दिल्या. अर्शदीप सिंग, मार्को जॅन्सेन, यश ठाकूर व लॉकी फर्ग्युसनलाही आपली जबाबदारी कुशलतेने पार पाडावी लागेल.

दुसरीकडे कोलकाता नाईट रायडर्सचा आत्मविश्वास बळावलेला असेल, कारण त्यांनी चेन्नई येथे गत सामन्यात सीएसकेवर ८ गडी राखून विजय नोंदवला. केकेआरच्या दोन फिरकीपटूंनी आपल्या कामगिरीत सुधारणा करत चेन्नईला ९ बाद १०३ धावांवर रोखले.यात फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती व सुनील नरेनने अचूक मारा केला. या दोघेही सपाट खेळपट्टी व संथ फिरकीला अनुकूल खेळपट्टीवर धोकादायक ठरू शकतात. याशिवाय त्यांच्या साथीला वैभव अरोरा, मोईन अली व हर्षित राणा असतील.

पंजाब किंग्जची फलंदाजी कर्णधार श्रेयस अय्यर (२५० धावा) याच्यावर अवलंबून आहे. त्याने आतापर्यंत पाच सामन्यात तीन अर्धशतके झळकावली आहेत. प्रियांश आर्य (१९४ धावा) हा हंगामातील सर्वोत्तम शोध ठरला आहे. नेहल वढेरा (१४१ धावा), प्रभसिमरन सिंग (१३३ धावा) व फिनिशर शशांक सिंग (१०८ धावा) सद्धा संघाला बरीच मजबूती देतात.

(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**पंजाब किंग्ज वि. कोलकाता नाईट रायडर्स**
**स्थळ :** महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर
**वेळ : सायंकाळी ७.३० वाजतापासून**
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# मनिका, श्रीजाची विजयी सलामी

## आयटीटीएफ विश्वचषक



◆ **मकाओ, १४ एप्रिल**

चीनमधील मकाओ येथे सुरु असलेल्या आयटीटीएफ विश्वचषक २०२५ प्रथम चरणाच्या टेबल टेनिस स्पर्धेत सोमवारी भारताची ऑलिम्पिकपटू मनिका बत्रा व श्रीजा अकुलाने आपापल्या गटातील सलामीचे सामने जिंकले.

गट १६ मध्ये जागतिक क्रमवारीत ३० व्या स्थानावर असलेल्या मानिकाने न्यू कॅलेडोनियाच्या मायलिस गिरेटचा ४-० (११-१, ११-२, ११-६, ११-४) असा पराभव करून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. आता मनिकाला आपल्या शेवटच्या गट साखळी सामन्यात २३ व्या विश्वमानांकित ब्राझीलच्या ब्रुना ताकाहाशीविरुद्ध झुंज द्यावी लागणार आहे.

गट ९ मध्य, जागतिक क्रमवारीत ३४ व्या स्थानावर असलेल्या श्रीजाने ऑस्ट्रेलियाच्या कॉन्स्टँटिन सिसहोगिओसचा ३-१ (११-९, ११-४, ११-८, ६-११) पराभव केला. तिचा पुढील सामना रोमानियाच्या बर्नाडिट झोक्सविरुद्ध होणार आहे. (वृत्तसंस्था)


## दक्षिण आफ्रिका गोल्फ : दीक्षा अव्वल १० मध्ये

**केपटाऊन :** येथे सुरु असलेल्या दक्षिण आफ्रिका महिला ओपन गोल्फ स्पर्धेत भारताच्या दीक्षा डागरने ४-अंडर ६८ सह अव्वल १० खेळाडूंमध्ये व सर्वोत्तम फेरीत स्थान मिळवले. दीक्षाने ७२-७१-६९-६८ च्या फेरीत यशस्वी कामगिरी केली व आठवड्यासाठी एकूण ८-अंडर २८० गुण मिळवले. जोबर्गमधील टी-९ नंतर दीक्षाने दक्षिण आफ्रिकेतील स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा अव्वल १० मध्ये स्थान मिळविले. (वृत्तसंस्था)

### अमेरिका, जपान बिली जीन किंग चषक अंतिमसाठी पात्र

**ब्रातिस्लावा :** हेली बॅप्टिस्ट व बर्नार्डा पेराने सरळ सेटमध्ये विजय मिळवत यजमान स्लोवाकियावर २-१ असा विजय मिळवत अमेरिकेला बिली जीन किंग चषक फायनलमध्ये स्थान मिळवून दिले. बॅप्टिस्टने रेनाटा जम्रिकोवाचा ६-३, ६-४ असा पराभव केला आणि पेराने गट क सामन्यात स्लोवाकियाच्या रेबेका स्रामकोवाचा ७-६ (२), ७-५ असा पराभव केला. या विजयामुळे मी खूप भारावून गेली आहे, खूप आनंदी आहे, असे पेरा म्हणाली. मला संघासोबत खेळताना खूप मजा आली, सर्व खेळाडू फॉर्मात आहे व मला सर्वांकडून खूप पाठिंबा मिळाला, असेही ती म्हणाली. शनिवारी डेन्मार्कला ३-० ने हरवणाऱ्या अमेरिकेने गट क मध्ये अव्वल स्थान पटकावले. जपानने गट अ मध्ये निर्णायक दुहेरी सामन्यात एना शिबाहारा आणि शुको आओयामाने कॅनेडियन कायला क्रॉस आणि रेबेका मारिनोचा ६-३, ५-७, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला. बिली जीन किंग चषक फायनल सप्टेंबरमध्ये शेन्झेन येथे खेळला जाईल. जपान सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश करेल. १९९६ मध्ये ते उपांत्य फेरीत पोहोचले होते.

### मुष्टियोद्धा जॉर्ज फोरमन यांचे निधन



**ह्युस्टन :** दिग्गज हेवीवेट मुष्टियुद्ध विजेता व आयकॉनिक पिचमन जॉर्ज फोरमन यांचे २१ मार्च रोजी ७६ व्या वर्षी निधन झाले. मुष्टियुद्ध जगतात प्रसिद्ध यश व प्रिय ग्रिलमास्टर म्हणून निवृत्तीनंतरच्या कारकिर्दीनंतरही, फोरमन यांनी आपले शेवटचे वर्ष गंभीरपणे त्रासदायक गैरवापराच्या आरोपांशी झुंजत घालवले. फोरमनने १९९४ मध्ये पराभूत करून ४५ व्या वर्षी हेवीवेट विजेतेपद जिंकणारा सर्वात वयस्कर पुरुष झाला होता. सोमवारी वर्थम थिएटर सेंटर येथे फोरमनचे कुटुंब आणि ह्युस्टन शहर त्यांना श्रद्धांजली वाहणार आहे. मार्शल, टेक्सास येथे जन्मलेले फोरमन शहराच्या ऐतिहासिकदृष्ट्या कृष्णवर्णीय वस्त्यांपैकी एक असलेल्या ह्यूस्टनच्या पाचव्या वॉर्डमध्ये लहानाचे मोठे झाले. त्यांनी १९६८ मध्ये ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता म्हणून मुष्टियुद्ध कारकिर्दीची सुरुवात केली आणि पुढच्या वर्षी ते व्यावसायिक मुष्टियोद्धा झाले. १९७३ मध्ये जो फ्रेझियरला हरवून फोरमन जगाचा हेवीवेट विजेता झाला. परंतु पुढच्या वर्षी झैरे येथील प्रसिद्ध लढतीत मुहम्मद अलीने फोरमनला हरवून जेतेपद पटकावले.

### श्री क्षेत्र तीर्थ येथे रामलिंगेश्वर यात्रे निमित्त उद्या कुस्ती स्पर्धा

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

श्री प्रभु रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेला तीर्थ (ता. द. सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर यात्रा सोमवारपासून सुरू झाली असून १६ एप्रिल रोजी कुस्ती स्पर्धा यात्रा पंच कमिटी वतीने आयोजित केली आहे. कुस्ती स्पर्धेतील शेवटची कुस्ती कै. धानप्पा फताटे स्मृती श्रीराम केसरी किताब व रोख २ हजार ५०० रुपये अ‍ॅड. राजेंद्र फताटे यांचे वतीने देण्यात येईल. विजयी मल्लास अ‍ॅड. संजय गायकवाड, जि.प.सदस्य प्रा. प्रभुलिंग वळसंगे यांचे हस्ते पारितोषिक देण्यात येणार आहे. इच्छुक मल्लानी कुस्ती स्पर्धेत सहभाग घ्यावा.

# महिला हॉकी संघात पाच नवीन खेळाडूंना संधी

## ऑस्ट्रेलिया दौरा २६ एप्रिलपासून

◆ **नवी दिल्ली, १४ एप्रिल**

आगामी २६ एप्रिल ते ४ मे दरम्यान होणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या पाच सामन्यांच्या दौऱ्यासाठी हॉकी इंडियाने सोमवारी २६ सदस्यीय महिला संघाची घोषणा केली. या महिला संघात पाच नवीन खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. भारत पहिल्या दोन सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलिया अ संघाशी सामना करेल, त्यानंतर वरिष्ठ ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध तीन सामने होतील. हे पाचही सामने पर्थ हॉकी स्टेडियमवर खेळवले जातील.

जूनमध्ये होणाऱ्या एफआयएच प्रो-लीग २०२४-२५ च्या युरोपियन टप्प्यापूर्वी हा दौरा एक महत्त्वाचा तयारीचा कार्यक्रम असेल. ज्योती सिंग, सुजाता कुजूर, अजमिना कुजूर, पूजा यादव आणि महिमा टेटे या पाच खेळाडूंना वरिष्ठ संघात बोलावण्यात आले आहे. त्या त्यांच्या वरिष्ठ संघात पदार्पण करण्यास उत्सुक असतील.



कर्णधार सलीमा टेटे



उपकर्णधार नवनीत कौर

अनुभवी व नवीन खेळाडूंचे मिश्रण असलेल्या या संघाचे नेतृत्व गतिमान मिडफिल्डर सलीमा टेटे करणार असून अनुभवी आक्रमक खेळाडू नवनीत कौर उपकर्णधार म्हणून काम पाहतील.

अनुभवी गोलरक्षक सविता व तरुण प्रतिभावान बिचू देवी खरीबाम दोन्ही पदांवर जबाबदाऱ्या पार पाडतील, त्यामुळे बचावाची शेवटची फळी मजबूत होईल.

बचाव फळीत अनुभवी व युवा प्रतिभावान खेळाडूंचे मिश्रण आहे, यात ज्योती सिंग, इशिका चौधरी, सुशीला चानू पुखम्बम, सुजाता कुजूर, सुमन देवी थौडम, ज्योती, अजमिना कुजूर आणि साक्षी राणा यांचा समावेश आहे.

मध्यवर्ती क्षेत्रात, कर्णधार टेटे वैष्णवी विठ्ठल फाळके, नेहा, शर्मिला देवी, मनीषा चौहान, सुनीलिता टोप्पो, महिमा टेटे, पूजा यादव आणि लालरेमसियामी यांच्या मदतीने केंद्राचे नेतृत्व करेल. नवनीत कौर, दीपिका, ऋताजा दादासो पिसाळ, मुमताज खान, बलजीत कौर, दीपिका सोरेंग आणि ब्युटी डुंगडुंग यांच्यासह आक्रमक फळी तीक्ष्ण व मजबूत दिसते.

याशिवाय बंसारी सोलंकी (गोलरक्षक), अंजना दुंडुंग व लालथंतलुआंगी (बचावपटू), साक्षी शुक्ला आणि खैदेम शिलेमा चानू (मध्यक्षेत्र), दीपी मोनिका टोप्पो आणि सोनमला (आक्रमक) राखीव खेळाडू म्हणून निवडण्यात आले आहे.

हा दौरा आमच्यासाठी उच्च-स्तरीय स्पर्धेविरुद्ध आमचे कौशल्य आणि रणनीती तपासण्याची एक महत्त्वाची संधी आहे. आम्ही एक संतुलित संघ निवडला आहे. हा संघ अनुभव आणि ताज्या उर्जेची सांगड घालतो, असे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग म्हणाले.

(वृत्तसंस्था)

# धीरजला कांस्य, पुरुष संघाला रौप्यपदक

## तिरंदाजी विश्वचषक प्रथम चरण

◆ **ऑर्बनडेल, १४ एप्रिल**

अमेरिकेच्या ऑर्बनडेल येथे आयोजित प्रथम चरणाच्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताने चार पदकांसह आपली मोहीम संपवली. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी भारताने पुरुषांच्या रिकर्व्ह सांघिक स्पर्धेत रौप्यपदक व वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात उदयोन्मुख स्टार धीरज बोम्मदेवराने कांस्यपदक जिंकले.

सेनादलाचा २३ वर्षीय तिरंदाज धीरज याने जबरदस्त धैर्य व संयम दाखवत कांस्यपदक जिंकले. त्याने २-४ च्या पराभवानंतर स्पेनच्या आंद्रेस टेमिनो मेडियलचा पाच-सेट्सच्या संघर्षपूर्ण सामन्यात ६-४ असा पराभव केला.

त्याआधी, तो अनुभवी तरुणदीप राय व अतनु दास यांच्यासह भारतीय त्रिकुटाचा भाग होता व या पुरुष संघाला सांघिक अंतिम फेरीत चीनकडून १-५ असा पराभव पत्करावा लागला होता आणि त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत भारताची पदकांची संख्या चार झाली आहे. भारताने कम्पाऊंड मिश्र संघात सुवर्ण,



रौप्यपदक जिंकणारा भारतीय पुरुष तिरंदाजी संघ

कम्पाऊंड पुरुष संघात कांस्य, रिकर्व्ह पुरुष संघात रौप्य व रिकर्व्ह पुरुष वैयक्तिक प्रकारात धीरजने कांस्यपदक मिळविले. भारताच्या मोहिमेत अभिषेक वर्माने थोडक्यात पदक गमावले, कम्पाऊंड पुरुष वैयक्तिक विभागात चौथे स्थान मिळवले. कांस्यपदकाच्या सामन्यात धीरज व मेडीएलने पहिला सेट २८-२८ असा बरोबरीत राखला. त्यानंतर स्पेनच्या खेळाडूने दुसऱ्या सेटमध्ये दोन १० सेकंदांसह २९-२८ अशी आघाडी घेतली, तर धीरजला केवळ एकच सेट जिंकता आला आणि ३-१ अशी आघाडी घेतली.

तिसरा सेट पुन्हा २९-२९ असा बरोबरीत सुटला, त्यामुळे धीरजवर दबाव निर्माण झाला. पण तरुण भारतीय खेळाडूने चौथ्या सेटमध्ये शानदार प्रत्युत्तर देत २९-२८ असा विजय संपादन केला व ४-४ अशी बरोबरी मिळविली. निर्णायक सेटमध्ये, धीरज दबावाखाली होता व त्याने तीन अचूक १० एस लक्ष्य



कांस्यपदकाचा मानकरी धीरज बोम्मदेवरा

साधत कांस्यपदक जिंकले.

यापूर्वी उपांत्य फेरीत तो चौथा विश्वमानांकित व पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या जर्मनीच्या फ्लोरियन उन्रुहकडून १-७ असा पराभूत झाला होता. (वृत्तसंस्था)

# जागतिक बुद्धिबळ क्षेत्रात भारतीय महिलाही आघाडीवर : नितीन नारंग



स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्वलन करताना नितीन नारंग व परिणिता फुके

◆ **पुणे, १४ एप्रिल**

जागतिक बुद्धिबळ क्षेत्रामध्ये भारतीय महिलांनी देखील चमकदार कामगिरी केली आहे. पुण्यात होत असलेल्या फिडे महिला ग्रॅण्ड प्रिक्स बुद्धिबळ स्पर्धेत सुद्धा भारतीय महिला नक्कीच वर्चस्व गाजवतील, अशी आशा अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाचे अध्यक्ष नितीन नारंग यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित फिडे महिला ग्रॅण्ड प्रिक्स(ग्रां-प्री) बुद्धिबळ स्पर्धेच्या पाचव्या टप्प्यातील स्पर्धेचे उद्घाटन नितीन नारंग व स्पर्धा संयोजन समितीच्या अध्यक्षा परिणिता फुके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, कार्याध्यक्ष सिद्धार्थ मयूर, खजिनदार विलास म्हात्रे, एमसीएचे मानद सचिव व स्पर्धा संचालक निरंजन गोडबोले, मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्कार विजेते ग्रॅण्ड मास्टर अभिजीत कुंटे व चीफ आर्बिटर इव्हान सायरोवही आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सध्याची जागतिक रॅपिड विजेती व ऑलिम्पियाड सुवर्णपदक विजेती भारताची ग्रॅण्डमास्टर कोनेरु हम्पी, ग्रॅण्डमास्टर हरिका द्रोणावल्ली व ग्रॅण्डमास्टर आर. वैशाली, आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख यांच्यासह चीनची ग्रॅण्डमास्टर झू जीनर, रशियाची आंतरराष्ट्रीय मास्टर पोलिना शुव्हालोहा, पोलंडची आंतरराष्ट्रीय मास्टर एलिना कॅशलीनस्काया, बल्गेरियाची आंतरराष्ट्रीय मास्टर सालिनोव्हा न्यूरघ्युन, मंगोलियाची आंतरराष्ट्रीय मास्टर बॅट खुयाक व जॉर्जियाची आंतरराष्ट्रीय मास्टर मेलिना सॅलोम या खेळाडूंचा सत्कार देखील करण्यात आला.

(वृत्तसंस्था)

# ईस्पोर्ट्स विश्वचषक बुद्धिबळात निहाल, अरविंद भाग घेणार

◆ **मुंबई, १४ एप्रिल**

भारताचे अव्वल क्रमांकाचे ग्रॅण्डमास्टर निहाल सरीन व अरविंद चिदम्बरम् हे एस८यूएलच्या बुद्धिबळ यादीत नाव असल्यामुळे ईस्पोर्ट्स विश्वचषक २०२५ स्पर्धेत भाग घेणार आहे, असे फ्रॅन्चायझीने म्हटले आहे.

या वर्षीच्या ईडब्ल्यूसीच्या आवृत्तीत पदार्पण करणाऱ्या बुद्धिबळात अंदाजे १२.९ कोटी रुपयांचे बक्षीस असेल. ग्रॅण्डमास्टर मॅग्नस कार्लसन जागतिक सदिच्छादूत म्हणून सहभागी होणार आहे. केरळमधील त्रिशूर येथील २० वर्षीय बुद्धिबळपटू निहाल सरीनला जागतिक बुद्धिबळ सर्किटमधील सर्वात हुशार तरुण प्रतिभावान खेळाडूंपैकी एक मानले जाते. त्याने वयाच्या सहाव्या वर्षी खेळायला सुरुवात केली आणि डर्बनमध्ये १० वर्षांखालील जागतिक युवा बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत जिंकले. २०२२ मध्ये चेस डॉट कॉम ग्लोबल स्पर्धेत तो उपविजेता ठरला. अलीकडेच, त्याने प्रेसिडेंट्स कप २०२४ जिंकला व ताश्कंद ओपनमध्ये विजेतेपद पटकावले. निहाल सध्या भारतात ८ व्या आणि जगात ४० व्या क्रमांकावर आहे, त्याचे रेटिंग २६८७ आहे.

मदुराईतील तिरुनगर येथील २५ वर्षीय चिथंबरम यांनी वयाच्या सातव्या वर्षी त्यांच्या आजोबांच्या मार्गदर्शनाखाली बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली आणि अवघ्या १२ व्या वर्षी भारतीय अंडर-१९ अजिंक्यपद जिंकून त्यांनी जलद गतीने क्रमवारीत प्रगती केली.

या फॉरमॅटमध्ये जलद १०+० वेळेचे नियंत्रण असेल, जिथे प्रत्येक खेळाडूला प्रत्येक गेममध्ये १० मिनिटे वेळ असेल आणि कोणतीही अतिरिक्त वेळ मिळणार नाही. खेळाडू फेब्रुवारी आणि मे महिन्यात होणाऱ्या चॅम्पियन्स चेस टूरच्या स्पर्धांमधून पात्र ठरतील, तर रियाधमध्ये होणाऱ्या लास्ट चान्स पात्रता फेरीद्वारे अंतिम चार स्पर्धक निश्चित केले जातील. (वृत्तसंस्था)

# साऊथ सोलापूर ओल्ड, खाजा बंदेनवाज क्रिकेट अकादमीचे विजय

## रेल्वेची ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : प्रथमेश देगावकर व मिर्झा वसीम बैग सामनावीर




**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयुटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धेत सोमवारी प्रथमेश देगावकरच्या ८८ धावांच्या जोरावर साऊथ सोलापूर ओल्ड संघाने स्मॅशर्स थंडरवर १२६ धावांनी दणदणीत विजय मिळविला. प्रथमेश सामनावीर ठरला.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात खाजा बंदेनवाज क्रिकेट अकादमीने उस्मानाबाद क्रिकेट क्लबला १०६ धावांनी हरविले. शानदार शतक झळकाविणारा मिर्झा वसीम बैग सामन्याचा मानकरी ठरला. हे पुरस्कार रणजीपटू रोहित जाधव व सोहेल मुनशी यांच्या हस्ते देण्यात आले. हे पुरस्कार सुदेश व सुनील मालप हे देत आहेत. पंच म्हणून चिराग शाह, सुहैल शेख व प्रवीण किनकर तर गुणलेखक म्हणून नितीन गायकवाड व नागेश सुरगीहळ्ळी यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक : साऊथ सोलापूर ओल्ड:** १६ षटकांत ३ बाद १९७ (प्रथमेश देगावकर ८८, मुरली कार्तिक ४८, अमोल अंगडी २३, इरफान पटेल, अल्मोईज पटेल व समर्थ बिराजदार प्रत्येकी १ बळी) वि. वि. **स्मॅशर्स थंडर:** १६ षटकांत ९ बाद ७१ (अल्मोईज पटेल १२, अतुल पवार व अशोक डोंबाळे २ बळी, विश्वनाथ मुंढे, अमोल अंगडी व मुरली कार्तिक प्रत्येकी १ बळी.

**के.बी.एन.सी.ए. :** २० षटकांत ५ बाद १७७ (मिर्झा वसीम बैग ११७, सईद जहागीरदार २२, जावेद शेख व वीरेंद्र जाधव २ बळी, शाकीब शेख १ बळी) वि. वि. **उस्मानाबाद :** १२.१ षटकांत सर्व बाद ७१ (जावेद शेख २५, शाकीब शेख १५, जकवान हबीब व जाहिद पठाण ३ बळी, टी. सलमान २ बळी). **आजचे सामने** १) अभिसिध्द वि. एचकेसीसी २) टाइम्स११(ब) वि. सेंट्रल रेल्वे(ब).

## महत्वाचे...



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कर्मवीर पाटील विद्यालयात व्याख्यान

**पंढरपूर, दि. १४ एप्रिल-**

पंढरपूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती राष्ट्रीय सेवा योजना, प्राध्यापक प्रबोधिनी व समारंभ समिती यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक प्रवास या विषयावर प्रा. डॉ. अमर कांबळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधित ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले. याचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने होते. प्रास्ताविक प्रा. प्रबोधिनीचे चेअरमन डॉ. उमेश साळुंखे यांनी केले, तर प्रमुख वक्त्यांचा परिचय समारंभ समितीचे चेअरमन डॉ. दत्तात्रय डांगे यांनी करून दिला. कार्यक्रमास कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत उपस्थित होते. प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या बालपणातील संस्कार, शैक्षणिक संघर्ष, आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी उचललेल्या पावलांचा आढावा घेतला. त्यांनी डॉ. आंबेडकरांचे कार्य हे समाज, शिक्षण, कायदे, अर्थकारण, राज्यघटना, स्त्री सक्षमीकरण आणि कृषी-औद्योगिक धोरण यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी स्वाती मनगिणी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजीत जाधव, ओंकार नेहतराव, अमोल माने, तानाजी खरात, अशोक भडकुंबे यांनी परिश्रम घेतले.



### मोडनिंब येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**मोडनिंब, दि. १४ एप्रिल-**

मोडनिंब (ता.माढा) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी धम्मवंदना करण्यात आली. यानंतर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.ग्रामपंचायत, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक संघटना आणि जयंती उत्सव मंडळांनी एकत्र येत अभिवादन केले. लहानथोर, युवक, महिला, विद्यार्थी यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. जवळपास ७५ युवक-युवतींची लेझीम कसरत या फेरीतील सहभाग्यांनी शानदार लेझीम प्रदर्शन सादर केले. कार्यक्रमानंतर विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी सरपंच लक्ष्मी पाटील, निशिगंधा कोल्हे, कैलास तोडकरी, नागनाथ ओहोळ, सुनील ओहोळ, बालाजी पाटील, अमर ओहोळ, प्रशांत गिड्डे, कुरण गिड्डे, अनिल सावंत, संतोष पाटील, गौतम ओहोळ, उदय जाधव, सदाशिव पाटोळे, संजय लोखंडे बालाजी वाघमारे, संजीव शिंदे, प्रमोद गाडे, अतुल गाडे उपस्थित होते.



### माढा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**माढा, दि. १४ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माढा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मकरंद लंकेश्वर मित्र मंडळांच्या वतीने तर निळा झेंडा चौक येथे बीबीएस मित्र मंडळाच्या वतीने बाबासाहेबांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आयोजित अभिवादन कार्यक्रमांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, माता रमाई, अहिल्याबाई होळकर, संत रवीदास महाराज, आदी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार धनाजी साठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, दादासाहेब साठे, उपनगराध्यक्ष कल्पना जगदाळे, माजी उपसरपंच राजाभाऊ चवरे, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार नाना भांगे, नगरसेवक शहाजी साठे, आजिनाथ माळी, विकास साठे, नितीन साठे, विरोधी पक्ष नेते राजू गोटे, गुरुराज कानडे, नगरपंचायतीच्या सभापती शबाना बागवान, मोहिनी नेटके, रेशमा लंकेश्वर, रेणुका थोरात, वंदना लंकेश्वर, सुनिता राऊत, मकरंद लंकेश्वर उपस्थित होते. यावेळी नगरपंचायत सभापती रेश्मा लंकेश्वर आणि अध्यक्ष सुधीर लंकेश्वर आणि बीबीएस मित्र मंडळाच्या वतीने निळा झेंडा चौकात निळ्या झेंड्याचे ध्वजारोहण माजी आमदार धनाजी साठे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अण्णाराव खंडागळे यांनी बुद्ध वंदना गायली. शहरामध्ये माढा नगरपंचायत, राजरत्न नगर येथे मध्यवर्ती मंडळ, वादळ ग्रुप,बाबासाहेब आंबेडकर वाचनालय आदी ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. सूत्रसंचालन दत्तात्रय चवरे आदींनी केले होते.

## निधन वृत्त...



### शरणाप्पा ढंगापुरे

**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**

यत्नाळ (ता.दक्षिण सोलापूर) येथील शरणाप्पा बसवंतराव ढंगापुरे (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे.



### मद्रम्मा यलदंडी

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

मद्रम्मा राजय्या यलदंडी (वय- ८५) यांचे आज सोमवार दि. १४ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. पद्मशाली शांतीधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. येथील सतरंजीचे व्यापारी विश्वनाथ यलदंडी यांच्या त्या मातोश्री होत.

# जिल्ह्यात २ हजार २७५ शाळांमध्ये नाही सीसीटीव्ही यंत्रणा

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह, फक्त ५०२ शाळांतच सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

जिल्ह्यातील २ हजार ७७७ शाळांपैकी केवळ ५०२ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत तर २ हजार २७५ शाळांमध्ये कॅमेरे नसल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी पालकांतून होत आहे.

राज्यातील अनेक शाळांत लैंगिक शोषणाचे प्रकार घडले आहेत. ते रोखणेसह सुरक्षेसाठी शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक शाळांमध्ये सीसीटीव्ही नाहीत. त्यामुळे शाळा आणि परिसरातील बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बदलापूरमधील अत्याचार घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी राज्यशासन जागे झाले आहे.



> जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७७७ शाळा आहेत. त्यातील ५०२ शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. तर जवळपास सर्वच खासगी शाळेत कॅमेरे आहेत. शासनाकडून जसा निधी येत आहे तसे जिल्हा परिषदेच्या शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत.
> **-कादर शेख, शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जिल्हा परीषद , सोलापूर**

ऑगस्ट महिन्यात सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर राज्यातील सर्व शाळेत सीसीटीव्ही न लावणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करण्याचे आदेश राज्य सरकारने २६ सप्टेंबर २०२४ रोजी दिले. आदेश देऊन सहा महिने झाले तरी अद्यापही हजारो शाळा सीसीटीव्हीविना आहेत. बदलापूरमध्ये मुलींवरील अत्याचाराप्रकरणी पालक आणि रहिवाशांच्या उद्रेकानंतर खासगी शाळांमध्येही एक महिन्याच्या आत सीसीटीव्ही लावण्याचे आदेश दिले होते. शिवाय सोलापूर शहरातही एका नामवंत शाळेमध्ये शिपायाचे दुष्कृत्य उघडकीस आले आहे. स्वच्छता कर्मचारी, शिपाई व शिक्षक यांच्या वासनेला चिमुकल्या मुली बळी पडत आहेत. अनेक मुलींना जीव गमवावा लागला आहे. वारंवार राज्यात अशा घटना घडत असताना शासन कठोर पावले उचलत आहे. मात्र निधीअभावी व खासगी शाळांमध्ये अनुदानाअभावी सीसीटीव्ही लावण्याकडे गांभीर्याने विचार करण्यात येत नसल्याचे सांगण्यात येते. सीसीटीव्ही असल्यास विद्यार्थीनींची सुरक्षितता असते. शिवाय दुष्कृत्य करणाऱ्यांवर जरब असते. पुराव्यामुळे त्यांना शिक्षा करण्यास मदत होते. शासनाने सर्वच शाळांना सीसीटीव्ही सक्तीचे केले आहे. मात्र, त्या आदेशांकडे अनेक शाळांनी दुर्लक्ष केल्याचे चित्र पाहण्यास येत आहे.

> सीसीटीव्हीमुळे गैरप्रकार उघडकीस येण्यास मदत होते. समाजात शाळांबद्दल नकारात्मक भावना तयार होत आहे. त्यामुळे शाळेच्या सकारात्मकतेसाठी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेत सीसीटीव्ही लावणे आवश्यक आहे. सरकारच्या निर्णयाचे स्वागत आहे. मात्र सर्व शाळांनी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.
> **- वागेश शास्त्री, मुख्याध्यापक, उध्दवराज प्राथमिक शाळा, सोलापूर**

### शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आवश्यक

> अनेक शाळांमध्ये शिपाई व स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार व विनयभंगाची घटना घडल्या आहेत. त्यामुळे शाळांमध्ये विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे आवश्यक आहेत. शासनाने त्वरीत निधी उफलब्ध करून सर्व शाळांमध्ये कॅमेरे लावण्यासाठी आदेश द्यावेत.
> **- शिवशंकर राठोड, अध्यक्ष, कास्ट्राईब शिक्षक संघटना**

# आमदार निधीतील कामांचे नातेपुतेत पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

### डॉ. आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला नातेपुते झाले प्रकाशमय

**नातेपुते,दि.१४ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रयत्नातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नातेपुतेसाठी पुणे-पंढरपूर रस्त्यावर उभारलेल्या आधुनिक स्ट्रीट लाइटचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी माजी आमदार राम सातपुते, शरद मोरे, राजूशेठ पांढरे, नगराध्यक्षा अनिता लांडगे, मुख्याधिकारी डॉ. कल्याण हुलगे, शिवसेनेचे सतीश सपकाळ, नगरसेवक भानुदास राऊत, दिपक काळे, संजय देशमुख, शशिकांत बरडकर, ज्ञानेश्वर उराडे, अमित चांगण, हनुमंत ढालपे, हणमंतराव सुळ, देविदास चांगण, राहुल पद्मन, प्रविण काळे, विनोद रणदिवे, शशि कल्याणी, हनुमंत कर्चे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी आमदार रामभाऊ सातपुते म्हणाले, मी माझ्या कारकिर्दीत माळशिरस तालुक्यातील गावांना कोणताही दुजाभाव न करता कमीत कमी एक कोटी रुपयांचा भरीव निधी दिला. नातेपुते शहरात रस्ते, गटारींसह, सभामंडप, मंदिर जीर्णोद्धारासाठी २७ कोटी रुपयांचा निधी दिला. अत्याधुनिक स्ट्रीट लाईट २ कोटी ६५ लाख रुपयांचा विशेष निधी मंजूर करून आणला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त या स्ट्रिटलाईटचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होत आहे ही आनंदाची बाब आहे.

# पिंपळगावला अधिकाऱ्यांचे गाव म्हणून नावारूपास आणू

### जन्मभूमी प्रतिष्ठानचे नानासाहेब धस यांनी दिले अभिवचन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ एप्रिल**



पिंपळगावमधील स्पर्धा परीक्षांमध्ये करिअर करु इच्छिणाऱ्या तसेच पोलीस व सैन्यदलामध्ये भरतीसाठी इच्छुक युवकांना पुणेसारख्या महानगरामध्ये प्रशिक्षण मिळवून देण्याचे सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याची ग्वाही जन्मभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस यांनी दिली. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने ग्रामपंचायतीला पैलवान सचिन धस यांच्या हस्ते सरपंच तुळजाराम वायकर, उपसरपंच अण्णासाहेब धस, ग्राम विकास अधिकारी लोखंडे यांना भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रत भेट देऊन मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर, जयराम सुतार, विजयसिंह पाटील, शरद जगदाळे, तानाजी पवार, धनु वाघमोडे, दादा कसबे, बापू लगड, शिवा भोळे, बप्पा बनसोडे, अण्णासाहेब पाटील आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी भारतीय राज्यघटनेतील आदर्श आचार प्रणाली प्रमाणे वागण्याचे आवाहन केले. प्रतिष्ठानतर्फे हे गाव आदर्श गाव व अधिकाऱ्यांचे गाव म्हणून नावारुपास येण्यासाठी ग्रामीण युवकांना सुविधा पुरवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

त्याचप्रमाणे गावातील पुरातन शिवमंदिराच्या सभामंडपाची उभारणी तसेच सामाजिक, धार्मिक एकात्मता वाढवून गावात शांतता व एकोपा निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करत असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित गावकऱ्यांना अल्पोपाराची व्यवस्था करण्यात आली होती, या कार्यक्रमाचे प्रस्तावित राहुल धस यांनी तर आभार प्रदर्शन अमरदीप धस यांनी केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरज चंदनशिवे, सोहेल शेख, राम गरड, सागर भोळे यांनी परिश्रम घेतले.

# विशेष कार्यकारी अधिकारी राजेश मोरे यांचा अन्नछत्र मंडळात सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १४ एप्रिल-**

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांचे विशेष कार्यकारी अधिकारी राजेश मोरे यांचा विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाच्या परिसरात तंत्र, मंत्र, यंत्र सर्वत्र पहायला मिळणारे राज्यातील एकमेव धार्मिक स्थळ असल्याचे मत श्री. मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.



यावेळी सैपन जमादार, सत्तार शेख, शब्बीर मजावर, न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी, गोटू माने, योगेश कटारे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, बाळासाहेब घाडगे, नामा भोसले, कुमार सलबत्ते, पिंटू हळ्ळूरे, संभाजीराव पवार, गोविंदराव शिंदे, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, सिद्धाराम कल्याणी आदी उपस्थित होते.

# कर्माचा स्विकार हाच जीवनाचा श्रेष्ठ मार्ग

## हभप डॉ. जयवंत महाराज बोधले : तीन दिवसीय प्रवचनमालेस सुरूवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**

कोणतेही कर्म श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते त्याचा न घाबरता स्विकार हाच जीवनाचा श्रेष्ठ मार्ग असल्याचे प्रतिपादन हभप डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी आज येथे केले.



येथील सद्गुरू बोधराज सेवा प्रतिष्ठानच्यावतीने डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात संत माणकोजी महाराज बोधले यांचे विद्यमान वंशज श्रीगुरु हभप डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे 'कर्मयोग' विषयावर तीन दिवसीय प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. आज पहिल्या दिवसाचे पुष्प गुंफताना डॉ. बोधले बोलत होते. ते पुढे म्हणाले, 'भगवान श्रीकृष्णाने अर्जूनाला श्रमदभगवतगीतेतून मुख्यत्वे कर्माचाच उपदेश केला आहे. धर्माची तू मूर्ती । पापपुण्य तुझे हाती ।। असे श्रीसंत तुकाराम महाराजांनी देवाला संबोधन केल्याचे सांगून कर्म करताना पापपुण्याचा विचार न करता त्याचा स्विकारच करावा असे त्यांनी सांगितले. अग्नीपासून धूर, घटापासून माती, पाण्यापासून ओलावा जसा दूर करता येत नाही तसे प्रत्येकाला कर्मापासून दूर जाता येत नाही. त्यामुळे प्रत्येकाने कर्माचा स्विकारच केला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

दरम्यान या प्रवचन मालेचा शुभारंभ अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे, हभप रमेश महाराज शिवापुरकर, भाजपचे नेते शहाजीभाऊ पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन, संत पूजन व ग्रंथ पूजनाने झाला. यावेळी हभप अनिल महाराज देठे, हभप किसन बापू कापसे, हभप प्रकाश महाराज पवार, हभप निवृत्ती महाराज माने, हभप संजय महाराज पवार, हभप श्रीकांत महाराज चुंगे, शिवदास चटके, हभप गणेश महाराज शिंदे, हभप माऊली महाराज जरग, सद्गुरु बोधराज सेवा प्रतिष्ठान व समस्त सोलापुरकर भाविक व श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

# कुंभेजच्या चित्रकाराच्या चित्रांचे दुबईत प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१४ एप्रिल**

कुंभेज तालुका करमाळा येथील चित्रकार निवास गोवर्धन कन्हेरे यांच्या चित्रांचे प्रदर्शन दुबई येथील आंतरराष्ट्रीय वर्ल्ड आर्ट दुबई या आर्टफेअर मध्ये होत असून देशातील मोजक्या चित्रकारांच्या कलाकृतीमधील करमाळा तालुक्यातील एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाच्या कलाकृतींचा आंतरराष्ट्रीय स्तरावर समावेश होत असल्याने कन्हेरे यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे

दुबई वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे सतरा ते वीस एप्रिल दरम्यान होणाऱ्या वर्ल्ड आर्ट दुबई आर्ट फेअर मध्ये जगभरातील कलाकार आणि आर्ट गॅलरी सहभागी होत आहेत. या आर्ट फेअर मुंबई मधील बियॉन्ड आर्ट गॅलरी सहभागी होत आहे , बियॉन्ड गॅलरी मालक विभुराज कपूर यांनी या प्रदर्शनासाठी भारतातील मोजक्या चित्रकारांची निवड केली आहे त्यामध्ये नावास कन्हेरे यांच्या अमूर्त चित्रांचा समावेश आहे. करमाळा तालुक्यातील कुंभेज या छोट्याशा गावातील सामान्य शेतकऱ्याच्या पोटी जन्मलेल्या निवास कनेरे यांना लहानपणापासून चित्रकलेची आवड होती . नंतर त्यांनी चित्रकला विषयात पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून चित्रकला शिक्षक म्हणून काही काळ करमाळा येथे नोकरी केली परंतु त्यांचे मन नोकरीत रमले नाही त्यांनी पुन्हा मुंबई येथील जे. जे .स्कूल ऑफ आर्ट येथून ललीत कला प्रकारात पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. यानंतर त्यांनी या कलेसाठी झोकून देऊन काम सुरू केले. अमूर्त चित्र (स्ट्रेक पेंटिंग) या प्रकारामध्ये त्यांनी आजपर्यंत अप्रतिम कलाकृती तयार केल्या. त्यांना आपल्या देशात व परदेशातही मोठा प्रतिसाद मिळाला. देशातील व प्रदेशातील अनेक लोक त्यांच्या चित्रासाठी हजारो रुपये मोजण्यासाठी तयार असतात. यापूर्वी आपल्या देशातील मुंबई येथील प्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये त्यांना चित्रप्रदर्शनामध्ये सहभागी होण्याचा अनेक वेळा मान मिळाला आहे. आता देशाबाहेरील महत्वाच्या चित्र प्रदर्शनामध्ये सहभागी होण्याची मिळालेली संधी मिळाली आहे त्यांनी तयार केलेल्या पाच कलाकृतीचा समावेश या प्रदर्शनात होणार आहे.



> आपल्या कलाकृतींना प्रसिद्ध अशा आर्ट गॅलरी व इव्हेंट मध्ये सहभागी होण्याची संधी मिळावी असे सर्वच कलाकारांचे स्वप्न असते तसेच ते माझे होते देशाबाहेरील दुबई येथील नामांकित आर्ट फेयर मध्ये माझ्या कलाकृतीला संधी मिळत असल्याचा आनंद होत असून निश्चितच मनाला समाधान मोठे वाटत आहे. यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचेच मनापासून आभार मानतो.
> **- चित्रकार निवास कान्हेरे**

# मराठा सेवा संघाच्या बार्शी अध्यक्षपदी संतोष मोळवणे

**बार्शी, दि. १४ एप्रिल-**

मराठा सेवा संघाच्या बार्शी तालुक्याच्या पदाधिकारी निवडी नुकत्याच झालेल्या बैठकीत जाहीर झाल्या. यात बार्शी तालुका अध्यक्षपदी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता संतोष मोळवणे, कार्याध्यक्षपदी शिवाजी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. कल्याण घळके आणि सहसचिवपदी सोनल चोबे यांची निवड करण्यात आली. मराठा सेवा संघाचे पुणे विभागाचे अध्यक्ष प्रशांत पाटील, सोलापूर जिल्हा अध्यक्ष प्रा.जी. के. देशमूख, पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नव्या पदाधिकारी निवडी जाहीर झाल्या. यावेळी मराठा सेवा संघाचे जेष्ठ पदाधिकारी प्रा. किरण गाढवे, सूरज ढमढेरे, रावसाहेब यादव, विनायक घोडके, महेश देशमुख आदी उपस्थित होते. निवडीनंतर नुतन पदाधिकारी यांचा सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.



# गुळपोळी येथे महामानव डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १४ एप्रिल**

गुळपोळी (ता.बार्शी) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे गुलाब शेख, किरण खुरंगळे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांचा पुस्तक व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष भैरवनाथ चौधरी, उपाध्यक्ष रणजीत चौधरी, किरण खुरंगळे, अथर्व चौधरी, आधिरा चौधरी, दिपाली चौधरी, सेजल चौधरी, रंजना खुरंगळे, कमलेश चौधरी, पाडुरंग चौधरी, इतर मान्यवर व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रस्तावना अध्यक्ष चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन दिपाली चौधरी तर अभार प्रदर्शन रणजीत चौधरी यांनी केले.

# बाजार समितीसाठी भाजप-काँग्रेसची युती

## निवडणूक बिनविरोध होणार का हे अर्ज माघारीनंर होणार स्पष्ट; दिलजमाईला यश

बाजार समितीचा ठरला खरा फार्मूला

आ.कल्याणशेट्टी, कोठे, माने, हसापुरे, शिवदारे, शेळके, पवार, महागावकर आले एका छताखाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल-**

गेल्या अनेक दिवसांपासून बाजार समितीचे भिजत पडलेले घोंगडे अखेर वाळवत घातले जात आहे. गतवर्षीप्रमाणे यावर्षी देखील भाजप आणि काँग्रेस पक्षातील नेत्यांनी एकत्रित येत पॅनल तयार करून बाजार समितीची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार बाजार समितीचा नवा फॉर्मुला ठरला असून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, काँग्रेसचे नेते सुरेश हसापुरे, शहाजी पवार, राजशेखर शिवदारे, बाळासाहेब शेळके, अविनाश महागावकर, श्रीशैल नरोळे, हरीश पाटील हे सर्व नेते एकत्रित आले आहेत.



दरम्यान, सोमवारी शासकीय विश्रामगृहावर एकत्रित येऊन पत्रकार परिषद घेऊन केली. आमदार कल्याणशेट्टी यांनी ही निवडणूक आम्ही सर्वत्र एकत्र येऊन लढविणार असल्याचे घोषित केले. निवडणुकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अंतिम निर्णय घेतील. बुधवार दि. १६ एप्रिल रोजी आमच्या पॅनलची घोषणा होईल असेही ते म्हणाले. आमदार सुभाष देशमुख यांच्याशी चर्चा झाली आहे, मतदारसंघाची राजकीय परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे एकत्र येण्याशिवाय पर्याय दिसत नाही असे आमचे मत आहे. बापू सोबत यावेत, ही इच्छा आहे. त्यांनी यावे असे मी आवाहन करतो. असेही कल्याणशेट्टी यांनी यावेळी सांगितले. दिलीप माने म्हणाले, आम्ही सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक करतोय, बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करतोय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आम्हाला गरज आहे. म्हणून हा निर्णय घेतला.

सुरेश हसापुरे म्हणाले, गेल्या बाजार समितीच्या निवडणुकीत विजयकुमार देशमुख होतेच ना. डी सी सी बँक, मार्केट कमिटी या निवडणुका पक्षीय सोडून लढवल्या जातात म्हणून आम्ही एकत्र आलोय. त्यात काही नवीन नाही. गतवर्षी प्रमाणे यावर्षी देखील निवडणूक लढवणार आहे. गतवर्षी विजयकुमार देशमुख हे भाजप काँग्रेसचे दुवा झाले होते. यंदाच्या वर्षी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिनकल्याण शेट्टी हे दुवा झालेले आहेत.

### सर्वच भाजपचे कार्यकर्ते असतील तर मी यायला तयार

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले आहे की आता नेत्यांच्या निवडणुका संपल्या आहेत. कार्यकर्त्यांच्या निवडणुका सुरू आहेत. नेत्यांनी कार्यकर्त्यांसाठी आता परिश्रम घ्यावे. त्यानुसार मी भाजपच्या कार्यकर्त्यांसाठी लढणार आहे. मला बाजार समितीच्या निवडणुकीत यावे म्हणून आवाहन केले आहे तेथे जर सर्वच भाजपचे कार्यकर्ते असतील तर मी यायला तयार आहे.

**- आ. सुभाष देशमुख**

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यामार्फत माजी आमदार दिलीप माने यांनी लावलेली फिल्डिंग अखेर कामाला..

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी जे जे शक्य होईल ते ते करा, परंतु ही निवडणूक जिंकलीच पाहिजे. असे आदेश प्राप्त झाल्यानंतर भाजप आमदारांनी गतवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील एकत्रित निवडणूक लढवण्यासाठी चंग बांधला होता. त्याला पालकमंत्री जयकुमार गोरे यांची सहकार्याची भूमिका लाभली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मदतीमुळेच हे नवे पॅनल तयार झाल्याचे चर्चा ऐकण्यास मिळत आहे. कारण सर्वप्रथम आमदार सचिन कल्याणशेट्टी या नव्या पॅनलसाठी तयार नव्हते. मात्र जयकुमार गोरे यांच्यामार्फत माजी आमदार दिलीप माने यांनी लावलेली फिल्डिंग अखेर कामाला आलेली आहे. गोरे यांच्या शब्दाला कल्याणशेट्टी यांनी नाकारलेले नाही. शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आदेशाला शिरसंवाद मानून एकत्रित निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

## महत्वाचे...



### कुंभारीजवळ एसटी बस जळून खाक

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

सोलापूर ते अक्कलकोट महामार्गावरील कुंभारी टोल नाक्याजवळ सोमवारी सायंकाळी अचानकपणे गाणगापूरहून कुर्डूवाडीकडे जाणाऱ्या एमएच २० बीएल ४२१५ क्रमांकाच्या एस टी बसमध्ये इंजिनमध्ये बिघाड होऊन आग लागली. या आगीमध्ये संपूर्ण एस टी बस जळून खाक झाली. यावेळी एस टी चालकाने प्रसंगावधान राखून प्रवाशांना खाली उतरविल्याने यामध्ये कोणतीही जिवितहानी झालेली नाही.

### एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेचे ८९ हजारांचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेने ८९ हजार रुपयांचे दागिने दोन महिला चोरट्यांनी चोरून नेले. याबाबत प्राची उर्फ दिपाली सचिन सुर्वे (वय ४२, रा. सपना बंगला, नवी पेठ, पुणे) या महिलेच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राची सुर्वे या १२ एप्रिल रोजी दुपारी मोडलिंब ते सोलापूर अशा एस टी बसने सोलापूरात आल्या. त्यावेळी प्रवासादरम्यान दोन महिला चोरट्यांनी सुर्वे यांची सोन्याची दागिने असलेली बॅगमधील पर्स चोरून नेली. या पर्समध्ये २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र आणि २.५ ग्रॅमची सोन्याची अंगठी, ३ ग्रॅमचे झुमके असा ऐवज होता. पोलिस नाईक भिमदे पुढील तपास करीत आहेत.

### शिवाजी चौकातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

शहरातील शिवाजी चौकातून चोरट्याने ६० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत भिमसेन अर्जुन दांडेकर (वय ३०, रा. तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ फेब्रुवारी रोजी भिमसेन दांडेकर याने त्यांची एमएच १३ डीडब्ल्यू १७९४ क्रमांकाची दुचाकी ही शिवाजी चौकात हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेली. पोलिस नाईक चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

### मंत्रालयातील कर्मचाऱ्याचा १ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मोबाईल लंपास

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

मुंबई येथील मंत्रालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा सोलापुरातील रेल्वे स्टेशनसमोर एस टी बसमध्ये चढताना चोरट्याने १ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेली. याबाबत मनोज भिमराव व्हनखंडे (वय ३८, रा. नाथ नगर, घर नं. १४, देगाव रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ एप्रिल रोजी सकाळी मनोज व्हनखंडे हे मुंबई येथून कोईबंतुर एक्स्प्रेसने सोलापूर रेल्वे स्टेशन येथे आले. तिथून जत येथे बहिणीकडे जाण्यासाठी ते जत येथे जाणाऱ्या एस टी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने व्हनखंडे यांच्या खिशातून १ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. सदर बझार पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### लष्कर परिसरातून कत्तलीसाठी आणलेले गोवंश पकडले

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

शहरातील लष्कर परिसरातून कत्तलीसाठी आणलेले गोवंश पकडून एकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोलिस शिपाई धर्मराज एकनाथ भोये यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अशपाक बशीर कुरेशी (वय ३५, रा. कुरेशी गल्ली, लष्कर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बझार पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी १४ एप्रिल रोजी सकाळी कुरेशी गल्लीतील अशपाक कुरेशी याच्या घरावर छापा टाकला. त्यावेळी कुरेशी याच्या घराच्या खोलीमध्ये ७ लहान-मोठी गोवंशी जनावरे व दुसऱ्या खोलीमध्ये २ मोठ्या गोवंशी जनावरे अशी ३ लाख ७० हजार रुपये किंमतीची ९ गोवंशी जनावरे कत्तलीसाठी आणण्यात आल्यानंतर पकडण्यात आली. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस कर्मचारी भोये पुढील तपास करीत आहेत.

# शहर व जिल्ह्यात दोघांचा आत्महत्येचा प्रयत्न

## अक्कलकोट तालुक्यातील आळगे व कुमठा नाका येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल**

अक्कलकोट तालुक्यातील आळगे येथे एका तरुणाने अज्ञात कारणावरुन घरातील फॅनच्या हूकला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. रविवारी रात्री ८:३० च्या सुमारास राहत्या घरी हा प्रकार घडला. भीमाशंकर पंडित मांग (वय ३४, रा. आळगे) असे या तरुणाचे नाव आहे. गळफासावरुन उतरवून तरुणास खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी रात्री भाऊ परशुराम याने दाखल केले. तो बेशुद्ध असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सिव्हील पोलीस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

दुसऱ्या घटनेत कुमठा नाका परिसरातील पंचशील नगरात अज्ञात कारणातून तरुणाने स्वतःच्या गळ्यावर व हातावर चाकूने वार करून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार सोमवारी मध्यरात्री १२:३० च्या सुमारास घडला. दीपक पांडुरंग सोनवणे (वय ३२, रा. पंचशील नगर, कुमठा नाका, सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. यातील चाकूने वार करून घेतल्याने त्याच्या गळ्यास व दोन्ही हाताला जखम झाली. त्याच्यावर उपचारांसाठी बहीण पल्लवी सोनवणे यांनी येथील शासकीय रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले आहे. तो शुद्धीवर असून, त्याच्यावर उपचार सुरू करून पहाटे साडेतीनच्या सुमारास घरी पाठविण्यात आले. सिव्हिल पोलिस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

**दुचाकीच्या धडकेत शेळ्या राखणारी महिला जखमी**

दुचाकीस्वाराने धडक दिल्याने शेळ्या राखणारी महिला जखमी झाली. रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास औराद रोड इंदिरा नगर येथे हा प्रकार घडला. कांताबाई गंगाराम भोई (वय ८०, रा. औराद ता. द. सोलापूर) असे जखमी वृद्धेचे नाव आहे.

यातील महिला शेळ्या राखून रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घराकडे निघाली होती. इंदिरानगर जवळ पाठिमागून येणाऱ्या दुचाकीस्वार धडक देऊन निघून गेला. यात तिच्या चेहऱ्यास खरचटले. पायास जखम झाली. जावई सच्छाराम भोई याने उपचारासाठी दाखल केले. सिव्हील पोलीस चौकीत याची नोंद आहे.

**तोल गेल्याने पायरीवरून पडून एकजण जखमी**

रात्रीच्या वेळी चालत जात असताना तोल गेल्याने पायरीवरून पडून एकजण जखमी झाली. विनायक नगरातील राम मंदिराजवळ ही घटना रविवारी रात्री पावणेनऊच्या सुमारास घडली. कृष्णा नामदेव बोबत्ती (वय ६५, रा. न्यू मल्लिकार्जुन नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. यात जखमी वृद्धाच्या डोळ्यावरील भुवईस मार लागला. रात्री पावणेअकराच्या सुमारास मुलगा महेश बोबत्ती याने त्यांना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करून उपचार करून घेतले. सिव्हिल पोलिस चौकीत या घटनेची नोंद आहे.

**मुकुंद नगरात चौघांकडून तरुणाला फायटरने मारहाण**

विनाकारण तरुणास चौघांनी मिळून फायटरने व लाकडी बांबूने बेदद मारहाण करून जखमी केले. रविवारी रात्री पावणेबाराच्या सुमारास मुकुंद नगरातील एस. बी. चौकात ही घटना घडली. कुणाल परमेश्वर शिंदे (वय २९, रा. राजीव गांधी नगर, भवानी पेठ, सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. या मारहाणीत तरुणास हनुवटीवर जखम झाली असून, सर्वांगास मुका मार लागला. तो स्वतः पहाटे पावणेचारच्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल झाला. उपचार करून डॉक्टरांनी घरी पाठवले. सिव्हिल पोलिस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

# परितेजवळ गुटख्यासह २५ लाखांचा ऐवज जप्त

## आयपीएस अंजना कृष्णा यांची कारवाई

**सोलापूर. दि. १४ एप्रिल -**

परिविक्षाधीन आय. पी. एस. अंजना कृष्णा व्ही. एस. यांची अवैधरित्या गुटखा वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करून गांजासह २५ लाख २३ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आय. पी.एस. अंजना कृष्णा यांना बेकायदेशीरपणे अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या वाहनाची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी ग्रामीण पोलीस ठाणे येथे पथक तयार करुन त्यांना रवाना करुन सदर गाडीचा पिराची कुरोली (ता. पंढरपूर) येथून पाटलाग करत टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिते गावाजवळ हॉटेल शेळके वाडा येथे सदर वाहन पकडले. सदर चालकास वाहनाची व त्यातील मालाबाबत चौकशी केली असता, सदर वाहनात सुगंधी गुटखा सुपारी व सुगंधी तंबाखू असल्याबाबत सांगीतले. सदर वाहनचालक संतोष मोहन नकाते (रा. वासूद अकोला, ता. सांगोला) याच्यासोबत असलेला अनिल सुखदेव बेहरे (रा. बेहरे चिंचोली, ता. सांगोला) यांच्याविरुध्द कारवाई करुन एक बोलेरो पीकअप (एमएच ४५ एएफ २३०७) व त्यातील सुगंधी गुटखा सुपारी व तंबाखू असा एकूण २५ लाख २३ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील संबंधितांवर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अधिक्षक अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधीक्षक कृष्णा, फौजदार विरसेन पाटील, पोलीस अंमलदार राहुल शिंदे, अजित मिसाळ, सुनील लोंढे यांनी केली.

# संतोष झगडे यांना समाज भूषण पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**



कोकण मराठी पत्रकार संस्था प्रथम वर्धापन दिनानिमित्त गणेश मंगल कार्यालय कालकाई मंदिराशेजारी, भरणे नाका (ता. खेड जिल्हा रत्नागिरी) येथे आयोजित समारंभात समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या कोकण रत्नाच्या सत्कार सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री, रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, गृह राज्य मंत्री म योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत संतोष विठोबा झगडे यांना सन्मानपूर्वक समजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. संतोष विठोबा झगडे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील सैतवडे गावचा. स्वतःच्या जन्म झालेल्या जिल्ह्यात या पुरस्कारासाठी संतोष विठोबा झगडे यांची निवड झाली हा त्यांचा मोठा गौरव आहे. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून सुकृत खांडेकर, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे कुलगुरू संजय भावे, शशिकांत सावंत, वसई विरार पत्रकार संघांचे अध्यक्ष अनिलराज रोकडे, महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट मुंबईचे अध्यक्ष अजय बिरवटकर फॉरवर्ड सीमेन्स युनियनचे अध्यक्ष नरेश बिरवाडकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कोकण मराठी पत्रकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ बिरवटकर यांनी केले होते.

# वैद्यकीय अधिकाऱ्याने केला हॉस्पिटलमध्ये ३७ लाखांचा अपहार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल -**

रामवाडी भागातील कॅन्सर सेंटरमध्ये काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने ३६ लाख ९७ हजार पाचशे रुपयांचा अपहार केल्याची बाब लेखापरीक्षणात उघडकीस आली आहे.

याबद्दल डॉ. प्रमोद कालिदास टिके (वय ४३, रा. अटलांटिक को-ऑप. सोसायटी, एमआयडीसी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चंद्रशेखर म्हेत्रे याच्याविरुध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संशयित आरोपी म्हेत्रे यांनी फिर्यादीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यावर असलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन डॉ. टिके यांच्या संस्थेची फसवणूक, विश्वासघात करण्याच्या उद्देशाने हिशोबामध्ये अफरातफर करून संस्थेमध्ये उपचार घेतलेल्या रुग्णांनी जमा केलेली रक्कम कंपनीच्या खात्यात न भरता स्वतःच्या खात्यात भरली व सदर अफरातफर कोणाच्या लक्षात येऊ नये, त्यासाठी खोटे व बनावट दस्त तयार करून ते खरे आहे असे भासवून आतापर्यंत केलेल्या लेखापरीक्षणानुसार सुमारे ३६ लाख ३७ हजार पाचशे रुपये इतक्या रकमेचा अपहार केला असल्याचा आरोप डॉ. टिके यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत केला आहे. अधिक तपास सहायक महिला पोलीस निरीक्षक जगताप या करित आहेत.

# लाडक्या बहिणींच्या सुरक्षेसाठी आता लालपरीत असणार तिसरा डोळा

## स्कूल बसमध्येही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे बंधन; आगामी शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ एप्रिल**

राज्य परिवहनकडील सध्याच्या १२ हजार बसगाड्यांसह नव्या अडीच हजार गाड्यांमध्ये जीपीएस, पॅनिक बटण (वैद्यकीय अलार्म) आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. याशिवाय आगामी शैक्षणिक वर्षापासून शाळांमधून विद्यार्थी ज्या स्कूलबसमधून घरापर्यंत ये-जा करतात, त्या गाड्यांमध्ये देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे लागणार आहेत. स्वारगेट दुर्घटनेनंतर आता महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी राज्याचा परिवहन विभाग सतर्क झालेले दिसत आहे.

राज्यातील शाळांची संख्या तीन लाखांवर असून त्यातील विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्कूल बस आहेत. आता प्रत्येक स्कूलबसमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी दर्जेदार सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बंधनकारक असणार आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून नव्या नियमावलीची अंमलबजावणी होणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला आरटीओ किंवा वाहतूक पोलिसांकडून १० हजारांहून अधिक दंड होऊ शकतो. स्कूल बसमधील सीसीटीव्हीचे फुटेज किमान ३० दिवस साठवून ठेवण्याचे बंधन शाळांना असेल. दुसरीकडे सध्या महामंडळाकडील १५ हजार बसगाड्यांपैकी तीन हजार बस पुढच्या वर्षापर्यंत स्क्रॅपमध्ये निघणार आहेत. त्यामुळे सुस्थितीतील १२ हजार बसगाड्यांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आगामी दोन महिन्यांत प्रत्येकी चार सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार असून त्याचा मॉनिटरिंग गाडीतच असणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडून देखील निधी मागण्यात आला आहे. मे महिन्यात निविदा प्रक्रिया राबविण्याचे नियोजन असून तया सर्व बसगाड्यांना 'जीपीएस' प्रणाली देखील असणार आहे. त्यामुळे बसगाड्यांचे नेमके लोकेशन समजायला मदत होणार आहे

### बसगाड्यांचे 'जीपीएस' बंद

परिवहन महामंडळाने यापूर्वी १४ हजार बसगाड्यांना 'जीपीएस' मशिन बसविल्या होत्या. त्यासाठी कोट्यवधींचा खर्च झाला. मात्र त्यातील सहा हजार गाड्यांमधील यंत्रणा बंदच होती. अधिकाऱ्यांच्या पडताळणीनंतर केवळ आठ हजार गाड्यांमधील जीपीएस मशिन सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे उर्वरित ६००० बसगाड्यांमध्ये पुन्हा नव्या जीपीएस मशिन बसवाव्या लागणार आहेत. त्यातही मध्यम, लांब पल्ल्याच्या व मुक्कामी गाड्यांचाच समावेश असणार आहे.

### परिवहनच्या नवीन बसगाड्यांमध्ये देखील सीसीटीव्ही

शाळांच्या प्रत्येक स्कूलबसमध्ये दर्जेदार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे बंधन असणार आहे. त्या त्या कॅमेऱ्यांचे मॉनिटरिंग संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक कार्यालयात राहील. तसेच स्कूल बसचे भाडे देखील राज्यभरात एकसमान राहील. केंद्र सरकारच्या नियमावलीचा आधार घेऊन एकसदस्यीय समितीचा अहवाल एप्रिलअखेर येईल. त्यानुसार त्याची अंमलबजावणी आगामी शैक्षणिक वर्षापासून केली जाईल. परिवहनच्या नवीन बसगाड्यांमध्ये देखील सीसीटीव्ही असतील.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पार्क चौकातील डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ सोमवारी सकाळी समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदनेच्या वेळेस एक दिव्यांग तीन चाकी सायकलवर जात होता. त्यास मदत करताना समता सैनिक दलाचे कार्यकर्ते.





सोलापूर : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना एका ज्येष्ठाचे टिपलेले छायाचित्र.(छाया : केवल तिवारी)

# प्रज्ञासूर्यास अभिवादनासाठी लोटला जनसागर

## नभांगणाहून नटले भुवन, पुनवेचेही गेले मी पण! चंद्र लाजला लपू लागला, असा भीम जन्माचा सोहळा भुमीवरी आजला

### शहरात भीमजयंती सप्ताहास उत्साहात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

नभांगणाहून नटले भुवन, पुनवेचेही गेले मी पण ! चंद्र लाजला लपु लागला, असा सोहळा भुमीवरी आजला ! दीप मंडपी झगझगणारे, या तेजाने दिपले सारे ! म्हणती खाली पाहू नका रे ! आड ढगाच्या लपले सारे

बिजली बाईला हेवा वाटला ! असा भीम जन्माचा सोहळा !! अगदी याच प्रमाणे सोलापूर शहरात भीम जयंती सप्ताहास उत्साही वातावरणात मध्यरात्रीपासून प्रारंभ झाला. यानिमित्ताने अवघे शहर नटले आहे. मध्यरात्रीपासूनच प्रज्ञासूर्यास अभिवादनासाठी जनसागर लोटला होता.

विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरात विविध





शेकडो मंडळांच्या वतीने मध्यरात्री १२ वाजता डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना सजवलेल्या आकर्षक अशा मंडपामध्ये करण्यात आली. त्रिशरण, पंचशील सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. शहरात विविध भागांमध्ये विद्युत रोषणाईचा लखलखाट दिसून आला. जय भीमच्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या.

महिलांसह अबाल वृद्ध अनुयायांचे जथेंच्या जथें पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी मध्यरात्रीपासूनच जनसागर लोटला होता.विविध संस्था, संघटना, राजकीय पक्षांच्या वतीने प्रज्ञासूर्यास अभिवादन करण्यात आले.

बोलो रे बोलो, जय भीम बोलो, ताकत से बोलो, जय भीम बोलो, हिम्मत से बोलो, जय भीम बोलो, जोर से बोलो, जय भीम बोलो असा नारा देत हातात निळा झेंडा घेऊन भीम अनुयायी डॉ. आंबेडकर चौकाकडे येत होते. डॉ. आंबेडकर चौक येथील त्यांच्या पुतळ्यास मनोभावे जनसागर नतमस्तक झाला. निळ व गुलालांची मुक्त उधळण करण्यात आली. उत्साही वातावरणात भीम जयंती सप्ताह प्रारंभ झाला.

यावर्षी दिनांक १४ ते २० एप्रिल दरम्यान आठ दिवसाचा भीम जयंती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. रविवार दि. २० एप्रिल रोजी भीम जयंती सप्ताहाची भव्य अशा विराट मिरवणुकीने सांगता होणार आहे. या जयंती सप्ताहास उत्साही वातावरणात मध्यरात्री १२ वाजल्यापासून प्रारंभ झाला. सुमारे ५०० मंडळांनी आकर्षक सजवलेल्या व विद्युत रोषणाईने नटलेल्या मंडपामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना मध्यरात्री केली. जयंतीनिमित्ताने अवघे सोलापूर शहर नटले आहे. दोन्ही म ध्यवर्ती महामंडळाच्या वतीने विश्वस्त समिती व पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने मध्यरात्री प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत सन १९५५ मध्ये रेखाटलेल्या प्रतिमेची या मंडपात प्रतिष्ठापना करण्यात येते. त्रिशरण पंचशील सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी सतीश सरवदे, ड. अश्विन बनसोडे, बौद्ध साहित्य संमेलनाचे कोषाध्यक्ष किरण बनसोडे, डॉ. सतीश खारवे, किरण जाधव,



रोहित खारवे, प्रशांत गायकवाड, राजेश सुरवसे, हरि तळभंडारे, रेवण मैंदर्गीकर चंद्रकांत बाबरे, सुरज आबुटे, सिद्धार्थ तळभंडारे , बाळू गायकवाड, मनीष तळभंडारे , विकास खरात यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**मिलिंद नगरात नेत्रदीपक अतिशबाजी कार्यक्रम**

मिलिंद नगर येथील भीमशक्ती सेना तरुण मंडळाच्या वतीने मध्यरात्री बारा वाजता सालाबाद प्रमाणे यंदाही अतिशबाजीचा कार्यक्रम पार पडला. हे शोभेचे दारू काम पाहण्यासाठी महिलांसह आबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती. गेल्या ३४ वर्षापासून हा आतिषबाजीचा सोहळा आयोजित करण्यात येतो. पूजन आणि साम ुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर आतिषबाजीचा कार्यक्रम पार पडला. विविध प्रकारचे शोभेचे दारू काम पाहून भीम अनुयायी मंत्रमुग्ध झाले. नेत्रदीपक मनोहारी आतिषबाजी पाहायला मिळाली. हलगीच्या कडकडाटात जय भीमचा जयघोष करत हा सोहळा पार पडला.

भीम जयंती निमित्त आज रविवारी सकाळपासूनच पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ. आंबेडकर यांचा पुतळा आणि मिलिंद नगर येथील भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी येथे अभिवादनासाठी अलोट गर्दी झाली होती. त्रिशरण - पंचशील सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अनुयायांनी अभिवादन केले. सकाळी समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. तसेच भारतीय बौद्ध महासभेअंतर्गत समता सैनिक दलाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

**विविध मान्यवरांचे अभिवादन**

रिपाइंचे राजाभाऊ सरवदे, भीमशक्ती संघटनेचे सुबोध वाघमोडे, बसपाचे एड. संजीव सदाफुले , शहराध्यक्ष देवा उघडे, माजी नगरसेवक सुभानजी बनसोडे, बबलू गायकवाड, कामगार नेते जनार्दन शिंदे, शिवसेना उबाठा गटाचे प्रताप चव्हाण, महेश धाराशिवकर, प्रा. अजय दासरी, लहुजी शक्ती सेनेचे सुरेश पाटोळे, परिवर्तनचे युवराज पवार ,रमेश लोंढे, ओम फाउंडेशनचे संस्थापक राजाभाऊ आलूरे , विकास कस्तुरे, विनय ढेपे, शिरीष सुरवसे, अमोल ढेपे, रतन क्षीरसागर, विकास माने, सुहास



माने यांनी अभिवादन केले.

महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांच्या हस्ते पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महासंघाचे राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, राज्य उपाध्यक्ष रमेश लोखंडे, जिल्हाध्यक्ष युवराज भोसले, रवी देवकर, दत्तात्रय शिंदे, प्रकाश साळवे, दाऊत आतार, संजयकुमार शिवशरण, नागेश सातपुते, विठ्ठल मोरे, यशपाल आकाडे, महानंदा शिंदे, निर्मला मौळे, राजेंद्र सोरटे, महिबूब तांबोळी, इनुस बाळगी, सिद्धेश्वर भुरले, प्रिया कदम, शिवानंद चौगुले, आगतराव बनसोडे, एकोराम चौगुले, पृथ्वी शिंदे, अभिजीत भंडारे आदी महासंघाचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

**पुस्तकांसह विविध स्टॉल्सवर गर्दी**

डॉ. आंबेडकर चौकात पुस्तक, तथागत बुद्ध डॉ. आंबेडकर यांची मूर्ती, कॅलेंडर , टोप्या व इतर चळवळीतील साहित्यांच्या विविध स्टॉल्सवर खरेदीसाठी मोठी गर्दी झाली होती. या स्टॉल्सवर मोठ्या प्रमाणात पुस्तक विक्री झाली असल्याचे दिसून आले. डॉ. द्वारकानाथ कोटणीस मेडिकल व सोशल फाउंडेशनच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

**समता सैनिक दलाचे अभिवादन**

समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूर आणि शाक्य संघ सोलापूर यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर मानवंदना देण्यात आली. समता सैनिक दलाचे जी ओ सी अंबादास कदम, ज्येष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर आणि शाक्य संघाचे अध्यक्ष अंगद मुके यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी समता सैनिक दलाचे अंगद जेटीथोर , अनिल जगझाप, विठ्ठल थोरे, प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, विठ्ठल मोरे, वसिष्ठ सोनकांबळे, महिला ब्रिगेडच्या प्रमुख सुमित्रा जाधव, प्रमोद जाधव, विनोद जाधव, रत्नदीप कांबळे, शांताराम वाघमारे, सिदनाक ब्रिगेडचे पदाधिकारी यांच्यासह पदाधिकारी व सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कपिल तरुण मंडळातर्फे रॅली**

शिक्षक सोसायटी येथील कपिल तरुण मंडळाच्या वतीने शिस्तबद्ध रॅली काढण्यात आली. निळी टोपी घालून पांढऱ्या वेशभूषेत महिला, मुले आणि अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जय भीमचा जयघोष करण्यात आला. यावेळी प्रदीप ताकपेरे, शेखर शिवशरण यांच्यासह भीम अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**बौद्ध साहित्य संमेलन समिती**

बौद्ध साहित्य संमेलन संयोजन समितीच्या वतीने स्वागत अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यवाह भालचंद्र साखरे, विठ्ठल मोरे, मारुती बेलभंडारे, चांगदेव सोनवणे, कमल सोनवणे, मीनाक्षी बनसोडे, धम्मरक्षिता कांबळे, फुलावती काटे , आशा शिवशरण, सिद्धेश्वर भुरले आदींचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भाजपच्या वतीने अभिवादन**

यावेळी भाजपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे आ. विजयकुमार देशमुख, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी गटनेते आनंद चंदनशिवे, माजी सभागृह नेते शिवानंद पाटील, श्रीनिवास करली, देवेंद्र भंडारे, माजी नगरसेवक प्रा. नारायण बनसोडे, रोहिणी तडवळकर, वंदना गायकवाड, अजित गायकवाड, राजा माने, दिलीप शिंदे, अंबादास करगुळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बोधगया महाविहारासाठी स्वाक्षरी मोहीम**

बोधगया महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे यासह विविध मागण्यांसाठी डॉ. आंबेडकर चौक येथे स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शहरात डॉ. बाबासाहेबांना अभिवादन



### हरिभाई देवकरण प्रशाला व क. महाविद्यालय

**सोलापूर :** हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी शिक्षणाधिकारी व ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. यावेळी प्राचार्या दीपा फाटक यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी केले. सूत्रसंचालन मल्लिकार्जुन गव्हाळे यांनी केले तर आसावरी देशमुख यांनी आभार मानले. यावेळी पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, गौतम कांबळे, रत्नाकर लोंढे, निखिल कांबळे यांनी बुद्ध वंदना सादर केली. यावेळी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने, औदुंबर सर्वगोड, लकण्णा कमळे, मारुती शहाणे, गणेश नेवरे, शांतप्पा कुंभार, भानुदास बनसोडे, अप्पासाहेब राऊत, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप फुटाणे उपस्थित होते.




### हिराचंद नेमचंद वाचनालय

**सोलापूर :** हिराचंद नेमचंद वाचनालयात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत कामतकर, कार्यकारणी सदस्य धनंजय माने यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच आपल्या वाचनालयात बालविभागातील चिन्मयी रवींद्र देशमुख हिने बाबासाहेब आंबेडकर आपलं सोलापूर हे उत्सवी शहर आहे. थोराचा आदर गौरव करण्यात सोलापूरकरांनी कधीच कंजुषी केली नाही. कार्यक्रमास कार्यकारणी सदस्य नितीन वैद्य ग्रंथपाल दत्ता मोरे व कर्मचारीवृंद व अभ्यासिकेतील विद्यार्थी उपस्थित होते .



### वि. मो. मेहता प्राथमिक शाळा

**सोलापूर :** कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती साजरी करण्यात आली. शाळासमिती अध्यक्ष राजेश्री पटवर्धन यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. सर्वप्रथम मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर, सेवाज्येष्ठ शिक्षक योगेश सरवदे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सहशिक्षिका संतोषी बिरादार व शीतल जालीमिंचे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे ज्ञान व माहिती होती. तसेच तुम्ही वाचन करा मोठे व्हा यश नक्की मिळणारच. इ.१ली ते ४थीच्या काही विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विषयी माहिती सांगितली. शीतल जालीमिंचे यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.



### रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालय

**सोलापूर :** विश्वभूषण, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे सचिव सुनील दावडा, अध्यक्ष डॉ. जानवी माखीजा, बळीराम पावडे, दौलत सिताफळे, मुख्याध्यापिका क्षितीजा गाताडे आदी उपस्थित होते.

# सोलापुरात डॉ. आंबेडकर यांच्या हयातीत साकारलेल्या तैलचित्राची जपणूक

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मंडळाने जपली विधायक जयंतीची परंपरा

### केवळ भीम गीतेच लावली जातात मंडपात !

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे हयात असताना १९५५ साली रेखाटलेल्या डॉ. आंबेडकर यांच्या तैलचित्राची जपणूक आजही छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाने केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, बस स्थानक जवळ असलेल्या येथील मंडळाचे नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ असे असून या मंडळाकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १९५५ साली हुबेहूब काढलेले तैलचित्र आहे. आजही या मंडळाकडे हे तैलचित्र सुरक्षित आहे. हे तैलचित्र त्याकाळचे सोलापूरचे सुप्रसिद्ध चित्रकार उमेश्वर पोरे यांनी साकारले होते. सोलापुरात उर्जादायी असे हे तैलचित्र आहे. भीम जयंती निमित्त येथील मंडपामध्ये याच तैलचित्राची प्रतिष्ठापना करण्यात येते. आजही सर्वांना हे तैलचित्र प्रेरणा आणि ऊर्जा देत आहे.

सोलापूर ही प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने क्रांतिप्रवण झालेली नगरी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनेकवेळा सोलापूर शहर आणि जिल्ह्यात आले होते. त्यांनी येथील जनतेत जागृती करण्याचे काम केले. त्यांनी समाजाला एक नवा संदेश देऊन ऊर्जा निर्माण केली होती. त्याकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजात स्वाभिमान जागृत करून त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि सोलापूर शहराचा एक वेगळा ऋणानुबंध आहे. त्याच अनुषंगाने सोलापूरचे त्याकाळचे प्रसिद्ध चित्रकार उमेश्वर पोरे यांनी १९५५ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हुबेहूब तैलचित्र रेखाटले होते. ते चित्र आजही जपून ठेवण्यात आले आहे.

**भीमगीताशिवाय दुसरी कोणतीच गाणी लावली जात नाहीत**

हे मंडळ जुने मानले जाते. आजही या मंडळाच्यावतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जयंती उत्सव साजरा केला जातो. या मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे या मंडळाने विधायक आणि प्रेरणादायी जयंती उत्सवाची परंपरा आजही कायम जपली आहे. येथे तथागत बुद्ध आणि भीमगीताशिवाय दुसरी कोणतीच गाणी लावली जात नाहीत. शिस्तबद्ध स्वरूपात मंडळाचे पावित्र्य राखले जाते. या मंडळाच्या वतीने विविध उपक्रमही राबविले जातात.



**मानाचे मंडळ म्हणून मिरवणुकीत शेवटी सहभागी होत असे**

पूर्वी काळी सोलापूर शहरात विविध मंडळांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढली जात असे. या मिरवणुकीत मानाचे मंडळ म्हणून सर्वात शेवटी हे मंडळ मिरवणुकीत सहभागी होत असे. सध्या या मंडळाकडून मिरवणूक काढण्यात येत नाही. या मंडळाच्या वतीने सुरुवातीच्या काळात लेझीम स्पर्धा,टिपरी स्पर्धा,त्याचबरोबर इतर स्पर्धा घेण्यात येत होत्या. लेझीम स्पर्धा आणि टिपरी स्पर्धा त्याकाळी प्रतिष्ठेची मानली जात होती. त्याकाळी या स्पर्धेत शहर आणि जिल्ह्यातून अनेक मंडळे सहभागी होत असत.

**नव्या पिढीतील कार्यकर्ते सांभाळत आहेत धुरा**

अलीकडच्या काळात नवे निर्बंध आणि काळानुरूप बदल झाले तरीही या मंडळाने जयंतीचा पारंपारिक वारसा जपला आहे. दिवंगत दऱ्याप्पा जाधव, दिवंगत भारतभाऊ सुतकर , दिवंगत ज्ञानेश्वर बागले, दिवंगत जनार्दन बनसोडे तसेच शांताराम रणशृगारे, भीमराव बनसोडे यांच्यासह जेष्ठ मंडळींनी या मंडळाच्या उभारणीसाठी मोठे योगदान दिले. सध्याच्या काळात या मंडळाची धुरा नव्या पिढीतील सतीश सरवदे, किरण जाधव, रवींद्र तळभंडारे, हरी तळभंडारे, सुधीर तळभंडारे, रेवण मैंदर्गीकर, बाळू गायकवाड, सिद्धार्थ तळभंडारे, मनीष तळभंडारे आणि कार्यकर्ते मोठ्या उमदीने सांभाळत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०८७

**मोकळे मन रसाळ वाणी। याचि गुणीं संपन्न।।**
**तुका म्हणे त्यांच्या नावें। घेतां व्हावें संतोसी।।**

आनंदी जीवनासाठी, तुका म्हणे जाण। व्हावें लहानाहूनि लहान।। हे जगद्गुरूंचे वचन लक्षात ठेवून याप्रमाणे वागले पाहीजे. मनाच्या विरूध्दच्या प्रसंगांना हसत खेळत तोंड दिले पाहिजे. न आवडलेल्या प्रसंगाचा, शब्दांचा सहजतेने विसर पाडता आला पाहिजे. मनात नको ते साठले जाणार नाही याकडे लक्ष दिले पाहीजे. मन आपले आहे, त्यामुळे त्यात काय साठवायचे आणि काय सोडून द्यायचे हे आपणच ठरवले पाहीजे. थोडक्यात, आपले मन सदैव प्रसन्न राहिल, असा प्रयत्न केला पाहिजे.



मन प्रसन्न ठेवून सकारात्मकतेने वागले तर, जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या,

**मन करा रे प्रसन्न। सर्व सिध्दीचे कारण।।**
**मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छा ते ।।**
**मन गुरू आणि शिष्य। करी आपुलेंचि दास्य।।**
**प्रसन्न आप आपणास। गति अथवा अधोगती।।**

या वचनांची अनुभेती येऊ शकेल. महाराजांच्या या म्हणण्याप्रमाणे मनाची प्रसन्नता जीवनाचा, दैनंदिन

कामकाजाचा आपणाला आणि आपल्याबरोबर इतरांना निश्चितच आनंद देते, यात शंका असण्याचे कारणच नसावे. खरे म्हणजे हा अनुभूतीचा विषय होय. मनाला प्रसन्न ठेवण्यासाठी पैसा खर्च करावा लागत नाही; तर केवळ मानसिकता बदलावी लागते. काही घटना किंवा परिस्थिती अशी असते की त्याबाबत कितीही ताण घेतला, चिडचिड केली तरी त्यात फरक पडणार नाही, हे आपणालाही कळते. तरीही आपण त्या घटनेचा, परिस्थितीचा, गोष्टीचा ताण घेतो. असा ताण घेणे, चिडचिड करणे हे योग्य आहे काय? याबाबत शांत चित्ताने, एकाग्र मनाने विचार केला, तर आपणच आपणाला मनावरील वाढत्या ओझ्यातून मुक्त करू शकतो. आपल्या मनावरील ताण घालवण्याची जादूची कांडी आपल्याशिवाय इतर कोणाच्या हाती नसते. म्हणून ही कांडी आपणच हसत खेळत फिरवयाची असते. अशी कांडी फिरवणारे बरेच लोक तुकाराम महाराजांच्या, मोकळे मन रसाळ वाणी। याचि गुणीं संपन्न।। तुका म्हणे त्यांच्या नावें। घेतां व्हावें संतोसी।। या अभंगाप्रमाणे अभ्यागतांना, घरी येणा-यांना, पाहुण्यांना, मित्रांना, गरजूंना स्मित हास्य करीत या बसा, म्हणतात. त्यांचे म्हणणे व्यवस्थितपणे ऐकून घेतात. घरी किंवा कामकाजाच्या ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्यांचा अजिबात ताण घेत नाहीत. कितीही लोक आले तरी त्यांना हसून खेळून बोलतात. वरिष्ठांच्या किंवा अन्य संबंधितांच्या चिडचिडीचा स्वतःवर विपरीत परीणाम होऊ देत नाहीत. अशांकडून गरजूंचे काम झाले नाही किंवा त्याला आवश्यकते सहकार्य झाले नाही तरीही लोक अशा लोकांबद्दल वाईट न बोलता किंवा अशांची तक्रार न करता चांगलेच बोलतात, त्यांच्या वर्तनाबद्दल समाधानी असतात. त्यामुळे शांत चित्ताने, सकारात्मकतेने वागणे हितावह असते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सोलापुरात 'महिनाभरात' विमानसेवा होईल का कार्यान्वित?

## केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मोहोळ यांनी करु नये दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

सोलापूरसाठी १५ ते ३० मे या कालवधीत कोणत्याही स्थितीत विमानसेवा सुरू होणार आहे. याची सुरुवात गोव्यापासून होईल. नंतर मुंबईलाही विमानसेवा सुरू होईल, असा ठाम विश्वास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गेल्याच आठवड्यात एका उद्योजकांच्या कार्यक्रमात व्यक्त केला आहे. मात्र भाजपा स्थानिक नेते, केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ मात्र सोलापूरच्या विमानसेवेबाबत तितके उत्सुक असल्याचे दिसून येत नसल्याची खंत सोलापूरच्या जाणकार नागरिकांनी व्यक्त केली.

गेल्या अनेक वर्षांपासून सोलापूरचे नागरिक विमानसेवेची वाट पाहत आहेत. तारीख पे तारीख पडत आहे. तरीही प्रशासकीय पातळीवर त्या दिशेने वेगवान हालचाली सुरू झाल्याचे दिसत आहे. येथील बोरामणी विमानतळाबरोबर जाहीर झालेली शिर्डी विमानसेवा जोरात सुरू असून, अमरावती येथे नव्याने बेलोरा विमानतळावरून प्रवासी वाहतूक सेवा सुरू झाली आहे. मग सोलापूरच मागे का पडत आहे? असा सवालही स्थानिक उद्योजक, जाणकार नागरिक विचारत आहेत.



सोलापूरच्या विमानसेनेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाल्यानंतर ही विमानसेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंच, माजी आ. संजयमामा शिंदे, आ. सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रचंड परिश्रम घेतले मात्र हायटेक नेत्यांनी यांची दाळ शिजू दिली नाही. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या विमानसेवेबाबत ६ जानेवारी २०२५ रोजी एक व्हिसीद्वारे बैठक घेवून संबंधित यंत्रणेला लवकर विमानसेवा सुरू करण्याबाबत निर्देश दिले होते. आता २ महिने उलटले तरी विमानसेवा सुरू झाली नाही.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्हिसीद्वारे घेतलेल्या बैठकीसाठी केंद्रीय विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय आणि राज्य एअरपोर्ट ॲथॉरिटीचे संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्यासह स्थानिक प्रशासनातील २ प्रांत व इतर अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीवेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूरच्या विमानसेवेतील अडचणी मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या होत्या. त्या ऐकून घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानसेवेच्या संबंधित यंत्रेणेशी आणि मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी संवाद साधून सोलापूरच्या विमानतळाबाबत असलेल्या आवश्यक त्या सर्व परवानगी देण्यासाठी तत्काळ पूर्तता करून लवकरात लवकर ही विमानसेवा चालू करावी, असे निर्देश दिले. राज्य एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या सर्व परवानग्या मिळाल्या असल्यामुळे आता महिनाभरात ही विमानसेवा सुरू होण्याचे संकेत मिळत आहेत.

निवडणुकीपूर्वी एका पत्रकार परिषदेत मंत्री मोहोळ यांनीही निवडणुका पार पडताच सोलापूरकरांना विमानसेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजतागायत ही विमानसेवा सुरू झाली नाही. गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या मागणीला यश येत नसल्याने सोलापूर विकास मंचचे सदस्य, चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी, स्थानिक उद्योजकांतूनही नाराजी निर्माण होत आहे.

# विजापूर रस्त्यावरील अतिक्रमणधारकांना नोटीस

## १० दिवसात स्वत:हून अतिक्रमणे पाडावीत, अन्यथा पाडून महापालिका दंड वसूल करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

शहरातील विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील सर्विस रोडवर उभारण्यात आलेली बांधकामे आणि अतिक्रमित खोकी व दुकाने येत्या १० दिवसात हटविण्यात यावीत अन्यथा महापालिका हे अतिक्रमण हटवून संबंधितांकडून दंडासह रक्कम वसूल करणार आहे.

या संदर्भात सर्वच अतिक्रमण धारकांना महापालिकेने नोटीसा बजावल्या असून याची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

या संदर्भात महापालिका प्रशासनाने जाहीर प्रसिद्धीकरण देखील केले आहे. विजापुर रोडवरील विजापुर नाका ते ए. जी. पाटील महाविद्यालय पर्यंतच्या सर्व्हिस रोडचे अतिक्रमण काढण्याची बाब महापालिका प्रशासनाकडून नियोजित आहे. यानुसार विजापूर नाका ते ए. जी. पाटील कॉलेज पर्यंत महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजूस प्रत्येकी १२ मी रुंद सर्व्हिस रोड आहे. जागेवर सोलापूर महानगरपालिके मार्फत हद्द निश्चितीही करण्यात आली आहे.

या सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात तात्पुरते स्ट्रक्चर, खोके, कपाउंड भिंत, गेट उभारण्यात आले आहे. हे अतिक्रमण पूर्णपणे हटविण्यात येऊन या महामार्गावरील सर्विस रोडची जागा पूर्णपणे खुली करण्यात येणार आहे. अशावेळी विजापुर रोडवरील विजापूर नाका ते ए. जी. पाटील कॉलेज पर्यंत महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजूकडील प्रत्येकी १२ मीटर रुंद सर्व्हिस रोडवरचे अतिक्रमण १० दिवसाच्या आत स्वतःहून काढून घ्यावे. अन्यथा मुदतीत अतिक्रमण निष्काशित न केल्यास महानगरपालिकेकडून अतिक्रमण निष्काशित करणेची कार्यवाही करण्यात येईल व त्याचा खर्च संबंधीत मिळकत धारकाकडून वसूल करण्यात येईल असा इशाराही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.



# हजच्या प्रशिक्षण शिबिराचा ६०० यात्रेकरुंनी घेतला लाभ

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

के.एम.सी चारिटेबल व वेल्फेअर ट्रस्ट व जिल्हा खादीमुलुहुजाज हज कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने हज २०२५ला जाणाऱ्या हाजी लोकांसाठी के.एम.सी गार्डन येथे एक दिवसीय हज प्रशिक्षण शिबिरात जिल्ह्यातून ६०० हजयात्रेकरुनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

या प्रशिक्षणात सोलापूर जिल्हा खादीमुलहूजाज हज कमिटीचे अध्यक्ष हाजी उस्मान जमादार यांनी अनुभव व हजप्रशिक्षण प्रस्तुत केले. त्यात उमराह कसा करावा, अहेराम कसे बांधावे, तवाफ कसा करावा, सफाह व मरवाहची सही कशी करावी, हलक कसे करावे व उमरामध्ये फर्ज वाजिबात, प्रात्यक्षिक करून दाखवले.

दुपारच्या सत्रात हाजी मुक्ती मोहम्मद गौस यांनी हजमध्ये येणारे संकटाबद्दल सखोल माहिती दिली. त्यानंतर हाजी उस्मान जमादार सरांनी हाजीचे पाच दिवस कसे पाळावे, धार्मिक विधी कशी करावी, प्रार्थना कुठे आणि कसे करावे, मीनामध्ये काय करावे, अरफातमध्ये काय करावे, मुजदलीफामध्ये कसे राहावे, परत मीना मध्ये हलक कसे करावे, कुर्बानी कशी करावी, रमी जमरात कशी करावी, परत मक्का येथे जाऊन तवा कसे करावे, सही कशी करावी,याबद्दल सखोल माहिती दिली.शेवटी सराने मदिना येथे जाऊन कसे राहावे व परत आपल्या गावी कसे यावे अशा पद्धतीने सखोल माहिती हाजी लोकांपर्यंत पोहोचविली. शेवटी अल्ताफ सिद्दिकी यांनी हाजी लोकांना आपल्या शहरवासीयांसाठी व आपल्या देशासाठी प्रार्थना करण्यास विनंती केली. प्रशिक्षणात के.एम. सी चारिटेबल मोबाईल फेअर ट्रस्ट च्या सर्व पदाधिकारी मोबीन सय्यद, डॉ. इलियास शेख, डॉ. उमर फारूक मुल्ला, माजी महापौर आरिफ शेख, युनुस डोणगावकर, युनुस शेख, अमानुल्ला याहीया जमादार व शफिक रजभरे आदींची उपस्थिती होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जावेद भाई, बबलू कुरेशी, हुसेन खराडी,परवेज अतरवाले, जहीर होटगी आदीनी परिश्रम घेतले.

# कुचन प्रशालेत डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागात भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती संपन्न झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. श्रीनिवास क्यातम यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रा. करुणा गायकवाड आणि सहशिक्षक विजय गायकवाड यांनी बुद्धवंदना



सादर केली.

अ‍ॅड. श्रीनिवास क्यातम म्हणाले, बाबासाहेबांनी उच्चारलेले शब्द केवळ भाषण नव्हते, तर प्रत्येक मानवाला स्वतःच्या हक्कासाठी, समाजहितासाठी लढण्याची त्यांनी दाखवलेली वाट होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उजाळा देणं हीच खरी आदरांजली ठरेल असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रशालेचे सहशिक्षक बसवराज हिटनळ्ळी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा कानमंत्र जगासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

# लोकमंगल महाविद्यालयात म. फुले जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. पी. एन. शेंडगे (संशोधन उपसंचालक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी) व प्रा. अनंत शेरखाने (विद्याप्रतिष्ठान कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय, बारामती) हे लाभले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सचिन फुगे, प्रा. स्वप्नील कदम, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. स्मिता धायगुडे तसेच महाविद्यालयातील सर्व विदयार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सायली सोनावणे व आभार आरती खूने यांनी व्यक्त केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १५ एप्रिल २०२५ | श्रीधर स्वामी पुण्यतिथी |
| विक्रम संवत् २०८१ | सज्जनगड |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वितीया (१०.५५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - विशाखा (२७.०९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्दी (२३.३१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२४.०७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ** : अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह** : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या** : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ** : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक** : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु** : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर** : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्कांने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल. महिलांना सौख्याच्या घटना घडतील.

# विकसीत सोलापूरला शासनाकडून सहकार्य करावे

## आ. देशमुख यांची प्रविणसिंह परदेशी यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसीत भारताचे तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विकसीत महाराष्ट्राचे स्वप्न आहे. त्याप्रमाणे आमचे विकसीत सोलापूर जिल्हा असे स्वप्न आहे. लोकमंगलच्या माध्यमातून आम्ही हे साकार करण्याचा प्रयत्न आहे. त्याला मित्र या शासन नियंत्रणाखाली असलेल्या संस्थेने साथ द्यावी, त्यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशी मागणी आ. सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्र्याचे आर्थिक सल्लागार प्रविणसिंह परदेशी यांच्याकडे केली.

पाथरी येथे लोकमंगलच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रविणसिंह परदेशी प्रमुख म्हणून उपस्थित होते. सुरूवातील मुख्यमंत्र्याचे आर्थिक सल्लागार म्हणून निवड झाल्याबद्दल आ. देशमुख यांनी परदेशी यांचा सत्कार केला. यावेळी आ. देशमुख यांनी दूध व्यावसाय वाढवणे, जिल्ह्यात वृक्षारोण करणे यासाठी शासनाकडून सहकार्य करावे आदी मागण्या केल्या.



> विकसित शहरात आयटी कपंनी आणण्यासाठी विजेची सर्वात जास्त गरज आहे. मित्र संस्थेच्या माध्यमातून आपण एक ट्रिलियन विजेचा वापी करून आय. टी. कंपनी आणण्याचे नियोजन सुरू आहे. याशिवाय आ. सुभाष देशमुख यांच्या मागण्यांवर निश्चितच विचार करू.
> **- प्रविणसिंह परदेशी,** आर्थिक सल्लागार

यावेळी लोकमंगल बँकेचे सीईओ राजेशसिंह बायस, संचालक देवानंद चिलवंत, प्रल्हाद कांबळे, जितेंद्र लाड, नरेंद्र काटीकर अनंत चव्हाण, सिद्धार्थ सर्जे, पतसंस्थेच्या सरव्यवस्थापिका अलका देवडकर, पाथरीचे सरपंच संजय वाघमोडे, अनिता ढोबळे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात पेरणीपूर्व मशागतीला वेग

- **सोयाबीन टोकण पध्दतीने लागणीचा नवीन प्रयोग राबविणार**
- **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचा अभिनव उपक्रम**
- **घरगुती बियाणे वापरल्याने गतवर्षी सोयाबीनचे २५ टक्के बियाणे गेले परत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**



खरिपाच्या पेरणीनंतर उत्पादन वाढावे यासाठी जिल्ह्यात पेरणीपूर्व मशागतीला वेग आला असून, शेतकरी बांधव आता याच कामात गुंतल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, जिल्ह्याच्या कृषी विभागाकडून यंदा सोयाबीन हे खरिपातील मुख्य पीक टोकण पध्दतीने लावण्यासाठी नवीन प्रयोग जिल्ह्यात राबविणार असल्याची माहिती जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले यांनी दिली तर गतवर्षीही घरगुती सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांनी वापरल्याने विविध कंपन्यांचे २५ टक्के बियाणे परत गेल्याचेही त्यांनी सांगितले.

### टोकन लागवडीमुळे उत्पन्न वाढणार

> यंदा गहू, हरभऱ्याप्रमाणे आता सोयाबीनचीही टोकण पध्दत नव्याचे चालू होणार असल्याने काही शेतकऱ्यांनी या कृषी विभागाच्या नवीन संकल्पाचे स्वागतच केले आहे. या लागण पध्दतीने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. या हंगामात उडीद, मूग याचीही लागवड करता येते; मात्र अनेक शेतकरी पेरणीच करताना दिसतात. यामुळे यंदा हा लागवडीचा नवा प्रयोग आम्ही शेतकऱ्यांना समजावून सांगणार आहोत.
> **- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

पेरणीपूर्व मशागती झाल्यानंतर जूनच्या पहिल्या आठवड्यात मृगाचा पाऊस पडताच खरिपाच्या पेरणीसाठी शेतकरी बांधवांच्या हालचाली सुरू होतात. बियाणे, खतांची जमवाजमव करणे, पेरणी करणाऱ्या ट्रॅक्टरचालकाला पेरणीसाठी सांगून ठेवणे वगैरे सुरू असते.

गतवर्षी अनेक शेतकऱ्यांनी घरातील सोयाबीन पेरणी केली आणि त्याचे उत्पादनही चांगले निघाले. घरगुती सोयाबीन बियाणे सलग ३ वर्षे पेरता येते; यानंतर मात्र बियाणे बदलावे लागते अशी माहिती कृषी खात्याकडून मिळाली.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्या समोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (१०८)

**श्रीराम जय राम जयजयराम**

आजसुद्धा प्रतिवर्षी विजया दशमीला ✻ठेवुनी चेहरा हसरा। दु:ख सगळे विसरु या.। या सोनियाचा दिनी ही शपथ घेऊ या।

वि:- विजय मिळवूनी षड्रिपूंवरी।
ज:- जय मिळवू या मनावरी ।।
या:- यातना कितीही झाल्या तरी।
द:- दररोज एक नियम पाळूया।
श:- शरणागत होऊ श्रीराम चरणी।
मी:- मी पणा दूर सारू या।।
श्रीराम जय राम जयजयराम ।।
भारत माता की जय ।।
।। वंदे मातरम् ।।

**समाप्त**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्ह्यात शबरी आवास योजनेतून ३२५ घरकुलांना मंजूरी

## 3 कोटी ९० लाखांचा निधी वितरित

> प्रकल्प कार्यालयाच्या वतीने आदिवासी घटकातील समूहांसाठी अनेक योजना राबवल्या जातात. पारधी, महादेव कोळी या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील लोकांनी विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे.
> **- सागर नन्नावरे, प्रकल्प संचालक आदिवासी कार्यालय**

| वर्ष | लक्षांक | मंजूर |
|---|---|---|
| २०१५-१६ | ५२ | ५० |
| २०१६-१७ | १०५ | ९० |
| २०१७-१८ | ४५ | २९ |
| २०१९- २० | ४४ | २१ |
| २०२१-२२ | ८४ | ४५ |
| २०२२-२३ | १०९ | ३० |
| २०२३-२४ | १०० | ३६ |

> प्रशासन स्तरावरून प्रवर्गातील समूहांच्या सर्वांगीण विकासासाठी या योजनांचा प्रचार आणि प्रसार कमी केला जात आहे. म्हणूनच याचा लाभ गरजू लाभार्थ्यांना मिळत नाही. गावस्तरापर्यंत याचा प्रचार व प्रसाराची गरज आहे.
> **- कौशिक कोळी, अध्यक्ष, महादेव कोळी समाज, मंद्रुप.**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**



जिल्ह्यातील पारधी, महादेव कोळी यासह अनुसूचित जमाती प्रवर्गातील अन्य घटकांसाठी शबरी आवास घरकुल योजनेतून ३२५ जणांना घरकुल मंजूर झाले आहे. त्यासाठी तीन कोटी ९० लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

सोलापूरसह धाराशिव या दोन जिल्ह्यासाठी येथील प्रकल्प संचालक कार्यालय कार्यरत आहे. या कार्यालयाकडून अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी घरकुलांसह अन्य योजना राबवली जाते. वास्तविक या कार्यालयाला आणि सोलापूर जिल्ह्याला उद्दिष्ट जास्त असते. मात्र, लाभार्थ्यांचे अर्जच कमी येतात. म्हणून कमी लाभार्थ्यांनाच याचा फायदा होतो. जेवढे परिपूर्ण अर्ज दाखल करतात, त्या सर्वच लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळाला आहे. वास्तविक पाहता उद्दिष्ट ५८४ चे होते. पण प्रत्यक्षात ३२५ जणांचेच अर्ज आल्याने त्या सर्वांच्याच घरकुलासाठी तीन कोटी ९० लाख रुपये निधीचीही तरतूद करत ती रक्कम संबंधित यंत्रणेकडे पाठवण्यात आली आहे. गेल्या नऊ आर्थिक वर्षात प्रत्येक योजनेसाठी अत्यंत कमी अर्ज आले. घरकुलाची योजनाही जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती कार्यालयाच्या माध्यमातून ग्राम पंचायत स्तरावरून राबवली जाते. मुळातच ग्रामपंचायत स्तरावरूनच शबरी आवास घरकूल योजनेसाठी जास्तीत जास्त लाभार्थ्यांचे प्रस्ताव सादर होणे अपेक्षित आहे. तसे झाल्यास जास्त लाभार्थ्यांना याचा फायदा होईल.

## महत्वाचे...



### चपळगाववाडीत नंदीध्वज मिरवणुकीने झाला यात्रेचा प्रारंभ

**अक्कलकोट दि.१४ एप्रिल-**

तालुक्यातील सुक्षेत्र चपळगाववाडी येथे सालाबादप्रमाणे यंदाही ग्रामदैवत श्री रेवणसिद्धेश्वर यात्रेची उत्साहात सुरुवात झाली. सोमवार दि १४ एप्रिल रोजी पालखी सोहळा व नंदीध्वजांची मिरवणूक काढण्यात आली. हा पालखी सोहळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडीच्या आवारातून नेण्याची प्रथा आहे. त्यानिमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडी ने पालखी सोहळ्याचे अतिशय उत्साहात स्वागत केले. यावेळी पालखी मार्गावर आकर्षक रांगोळी व फुलांच्या पायघड्या घालून, पालखीवर फुलांचा वर्षाव केला आकर्षक नंदीध्वजांची विधीवत पूजन करण्यात आले.यावेळी सरपंच सौ निर्मला परशेट्टी, उपसरपंच शबाना नदाफ, पंडीत परशेट्टी,ईलाई नदाफ, ग्राम पंचायतीचे सर्व सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अन्सर नदाफ, माजी अध्यक्ष गौरीशंकर दोड्याळे, सदस्य बापूराव गोविंदे, बसवराज बन्ने, पोलिस पाटील सिकंदर नदाफ, मुख्याध्यापक शिवशरण गोविंदे, सहशिक्षिका कडलासकर, सहशिक्षक तुकाराम जाधव उपस्थित होते.



### पालखी मिरवणुकीने श्री रामलिंगेश्वर यात्रेचा प्रारंभ

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

तीर्थ (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर यात्रेला सोमवारी भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. ढोल ताशे, सनईच्या मंगलमय सुराने आणि हलगीच्या कडकडाटात नंदिध्वज मिरवणूक संपन्न झाली. तरुण मंडळाचा सहभाग होता. राजेंद्र जाधव यांच्यावतीने महाप्रसाद देण्यात आला. सायंकाळी विद्युत रोशणाईने मंदिराचा परिसर उजळून निघाला होता. देवस्थानाचे पुजारी डॉ. सुभाष गुरव, पुण्याचे उद्योजक मारुती जाधव, प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, ॲड. शंकर जाधव, शिवराज बिराजदार, उल्हास पाटील, रामलिंग चितले, भीमाशंकर रोडगे, प्रा. प्रभुलिंग वळसंगे, विश्वनाथ पावले, श्रीशैल बिराजदार, राम पुजारी, विठ्ठल चितले, रामलिंग उदंडे, संगप्पा उदंडे,रेवणसिद्ध पाटील, मैनूद्दीन मुल्ला, उपसरपंच पैगंबर मुल्ला, राजकुमार गुरव उपस्थित होते.

### स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेत नव्याने सांगोला तालुक्यातील ६ गावांचा समावेश

**सांगोला, दि. १४ एप्रिल-**

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेमध्ये नव्याने सांगोला तालुक्यातील ६ गावांचा समावेश करून या गावातील शेतीसाठी पाणी देण्याची कार्यवाही करण्याचे आदेश कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांना दिले आहेत अशी माहिती माजी आ.शहाजी पाटील यांनी दिली. सांगोला तालुक्यातील नरळेवाडी, वाकी(शिवणे), शिवणे, एखतपुर, सांगोला, कमलापूर या गावांना स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेतून शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी शहाजी पाटील यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे नुकतीच पत्राद्वारे मागणी केली होती. या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून राधाकृष्ण विखे-पाटील यांनी स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेमध्ये नव्याने तालुक्यातील सहा गावांचा समावेश करून या गावातील शेतीसाठी पाणी देण्याची कार्यवाही करण्याचे आदेश कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांना दिले आहेत. यामुळे या गावातील शेतीला कायमस्वरूपी हक्काचे पाणी मिळणार असल्याने या गावातील शेतकरीवर्ग आनंदीत झाला आहे. भविष्यात या गावातील शेतीचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे, अशी माहिती शहाजी पाटील यांनी दिली.



### चोपडी येथे कृष्णा बाबर व्यासपीठ लोकार्पण सोहळा उत्साहात

**सांगोला, दि. १४ एप्रिल-**

सांगोला तालुक्यातील रानमळा, चोपडी येथे कुलदैवत भोजलिंग यात्रेचे औचित्य साधत कृष्णा संदिपान बाबर या व्यासपीठाचे उदघाटन व लोकार्पण सोहळा माजी आमदार शहाजी पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर भिकाजी बाबर, दगडू बाबर, वाय.एस.बाबर, आर.एस.बाबर, उद्योगपती सतीश पाटील, विनायक बाबर, राजू यादव, चंद्रकांत बाबर, अमोल बाबर उपस्थित होते. प्रा. डॉ. संजय बाबर यांनी प्रास्ताविकात कृष्णा बाबर हे कुलदैवत भोजलिंगाचे भक्त व श्री विठ्ठलाचे वारकरी होते असे सांगितले. प्रा. डॉ. नितीन बाबर, चंद्रकांत बाबर म्हणाले, असे व्यासपीठ शैक्षणिक संकुलात पाहायला मिळते परंतु बाबर कुटुंबीतील त्रिमूर्ती मुलांनी हे व्यासपीठ येथे उभारले. यावेळी कॉन्ट्रॅक्टर भारत टाकळे, इंजि. अजय बनसोडे, राजेंद्र मीना, शिव बाबर यांचा सन्मान करण्यात आला. इंजि.गणेश बाबर यांनी मनोगतात हा व्यासपीठ लोकार्पण सोहळा आमच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण आहे असे सांगितले. सूत्रसंचालन राहुल बाबर यांनी केले.

# नान्नज विद्यालयात ३० वर्षांनी माजी विद्यार्थी आले एकत्र

## विद्यार्थ्यांनी शाळेला 10 हजारांची पुस्तके दिली भेट

## जुन्या आठवणींना दिला उजाळा



**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

नान्नज (ता उत्तर सोलापूर) येथील जी.बी घोडके विद्यालयातील १९९५-१९९६ मधील माजी विद्यार्थी स्नेह मेळावा उत्साहात पार पडला.

यावेळी शाळेतील माजी विद्यार्थी तीस वर्षांनी एकत्र आले होते. शाळा गजबजली असल्याच चित्र या स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने पाहायला मिळाले. गुरुजनांना भेटावे, सोबत शिकत असलेल्या मित्र- मैत्रिणी यांच्याशी गप्पा माराव्यात. या संकल्पनेमधून १९९४-९५ या वर्षांमध्ये इयत्ता दहावी मध्ये शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते. या माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यात शाळेतील एकूण ४० विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते. उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेतील ग्रंथालयाला दहा हजार रुपये किमतीची पुस्तके भेट देण्यात आली. एकमेकांसोबत गप्पा मारत असताना प्रत्येक जण शाळा शिक्षक वर्गमित्र यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत होते. या समारंभासाठी शाळेचे तत्कालीन शिक्षक उद्धव गरड, सिद्धेश्वर गोफणे, पी.यू कुलकर्णी, काटे मॅडम, बी .एस गुंड, अविनाश कांबळे, तुकाराम गवळी, दगडू टोणपे, दत्तात्रय पाटील यांचे विद्यार्थ्यांकडून स्वागत आणि सत्कार करत आशीर्वाद घेतले. शाळेची घंटा वाजवून व राष्ट्रगीत म्हणत या एक दिवसीय शाळेची सुरुवात होत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना छडीचा प्रसाद ही दिला. तर शिक्षकांनी ही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

यावेळी मुख्याध्यापक रमेश अगले दिवटे, सिकंदर मुजावर, समीर मुजावर, प्रवीण विभुते, दत्तात्रय धनके, बाळासाहेब गोटे, समीर मुजावर, दत्तात्रय पडवकर, मूबीन शेख,बालाजी मुळे, महेश भोसले, रुपाली शिंदे, सुगंधा खुडे, सुषमा खोबरे, रंजना टोणपे, महादेवी बहिर्जे, बापू मुळे उपस्थित होते.

# अन्नछत्र मंडळाच्या खुराकामुळे कुस्तीला अच्छे दिन

- माजी आमदार सुनिल टिंगरे
- चांदीची गदा पटकावलेल्या कुस्तीगीराचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : १३ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने तालुक्यातील कुस्तीगीरांना होत असलेल्या स्वामींचा प्रसादरुपी खुराकामुळे कुस्त्यांना अच्छे दिन आल्याचे मत माजी आमदार सुनील टिंगरे यांनी व्यक्त केले.

पठाण (ता. आंबेगाव जि. पुणे) येथील भैरवनाथ उत्सव केसरी चांदीचा गदा पटकविलेल्या बादोला (ता.अक्कलकोट) येथील अमोलराजे ग्रुपचा पै.चंद्रकांत राम मदने यांचा सत्कार तसेच मार्च महिन्यातील ७७ कीटचे वाटप माजी आमदार टिंगरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी श्री. टिंगरे बोलत होते. अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून तालुक्यातील 'कुस्तीगरांसाठी स्वामींच्या प्रसादरुपी खुराकाचे कीट वाटप करण्याचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे माजी आमदार टिंगरे यांनी सांगितले. दरम्यान माजी आमदार टिंगरे यांचा न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, मनोज निकम, अमित थोरात, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाटगे, एस.के.स्वामी, सुमित कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते. अमोलराजे ग्रुपच्या कुस्तीगीरांना महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै.महेश कुलकर्णी अक्कलकोट, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभत आहे.

# भंडीशेगावच्या ड्रीम गार्डन प्लॉट सुशोभीकरणाची सुरुवात



- माजी अप्पर मुख्य सचिव उज्वल उके यांच्या हस्ते कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**भंडीशेगांव, दि. १४ एप्रिल-**

सोलापूर सोशल फाउंडेशनच्या समृद्ध गाव अभियान उपक्रमाअंतर्गत भंडीशेगाव (ता. पंढरपूर) येथील ४२ एकर माळरानावरील पर्यटन केंद्रातील ड्रीम गार्डनच्या प्लॉट सुशोभीकरणाची सुरूवात राज्याचे माजी अप्पर मुख्य सचिव उज्वल उके यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी जगदंबा उद्योग समूहाचे संतोष बागल, मुख्य समन्वयक विजय पाटील, बॉबी मेमन, संतोष बागल, माजी उपसरपंच संतोष ननवरे, मंगेश ननवरे, डॉ.अनिल कंडरे, कॅप्टन शामराव लोकरे, अभ्यासिकेचे अध्यक्ष डॉ. श्रीधर येलमार, आनंद यलमार, पुणे येथील सरकारी वकील नामदेव तरळगट्टी, बाळासाहेब यलमार, प्रदीप पाटील, विजय येलमार, सोनू लाडे आदी उपस्थित होते. ग्रामीण भागातील विकास साधण्यासाठी महिला सक्षमीकरण, ग्रामीण पर्यटन, पर्यावरण, रोजगार निर्मिती, शैक्षणिक सुविधा आणि डिजिटल इंडिया सारख्या आधुनिक गोष्टींना सोबत घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी श्री. उके यांनी व्यक्त केले.सोलापूर सोशल फाउंडेशन व ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून ड्रीम गार्डनचे शुशोभीकरण करण्यासाठी छोटे छोटे प्लॉट उपलब्ध करून वेगवेगळ्या संस्थांना सुशोभीकरण करण्यास दत्तक देण्याची योजना असून हे ड्रीम गार्डन राज्यात एक वेगळे मॉडेल बनवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज असल्याचे मत मुंबईतील उद्योजक अजित कंडरे यांनी यावेळी व्यक्त केले. उद्योजक, असोसिएशन, कंपनी, वैयक्तिक आई वडिलांच्या,मुला मुलींच्या नावाने असे सुशोभीकरण करू शकतो.

# नागणसूर जिल्हा परिषद शाळेत कलामंचाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ एप्रिल-**

नागणसुर येथील श्रीगुरू बसवलिंगेश्वर शिक्षण कला व क्रीडा बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत बांधलेल्या बसव कलामंचाचे नामकरण व लोकार्पण डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजींच्या हस्ते करण्यात आले.

सोसायटीचे चेअरमन बसनिंगप्पा थंब अध्यक्षस्थानी होते. यावेळी माजी उपसरपंच धनराज धनशेट्टी, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष मल्लिनाथ कल्याण, प्रसाद प्रचंडे, बसवराज नागलगांव, शशिकांत कळसगोंडा, बसवराज मंटगी, विश्वनाथ प्रचंडे, बसवराज खिलारी, धरेप्पा तोळणूरे, सिद्धाराम शिवमूर्ती आदी उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गंगाधर भोसगी, बसनिंगय्या स्थावरमठ यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. बसव कलामंचाचे पूजन गुरुराज विभुते, प्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजींच्या हस्ते नामकरण व लोकार्पण करण्यात आले. कला मंचाच्या बांधकामासाठी गुरुराज विभूते यांनी वडील कै. बसलिंगप्पा विभूते यांच्या स्मरणार्थ साहित्य दिले. प्रकाश पाटील यांनी देणगीसह फरशीकरण केले. यावेळी मल्लिनाथ कल्याण, राजू नाविंदगी, राजकुमार गुरव, गुरुबाई प्रचंडे आदींनी मनोगत व्यक्त केले. शरणप्पा फुलारी यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा.धरेप्पा नागणसुरे यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सचिव प्रा. बसवराज विभूते यांनी आभार मानले. कन्नड शाळेतील विद्यार्थिनींनी स्वागतगीत आणि ईशस्तवन सादर केले. दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम करून कलामंचाचे औपचारिक उद्घाटन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव, श्रीशैल दोडमनी, बसवराज स्वामी, राजकुमार खानापुरे, राजकुमार नरूणे, लक्ष्मीकांत तळवार, शिवशरण म्हेत्रे, खाजप्पा कीणगी, शरणप्पा फुलारी, राजशेखर कुर्ले, शांता तोळणूरे, विजयश्री एंटमन, चन्नम्मा बिराजदार यांनी परिश्रम घेतले.



# अपेक्षेशिवाय कर्तव्याप्रती समर्पणच देईल भगवंत अनुभूती

## हभप कृष्णाबुवा माळकर; अक्कलकोटमध्ये धर्मसंकीर्तन महोत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ एप्रिल-**

मनुष्यजन्म सार्थकी लावण्याकरीता मनुष्याने भगवंताचे स्मरण ठेवून कोणत्याही अपेक्षेशिवाय कर्तव्याप्रती जीवन समर्पण केल्यास भगवंताच्या प्रचितीची व्यापक अनुभूती नक्कीच येते असे निरूपण डोंबीवली येथील ह.भ.प.कृष्णा बुवा माळकर यांनी केले.



श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी निमीत्त आयोजीत धर्मसंकीर्तन महोत्सवाची सुरुवात येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या कै.कल्याणराव इंगळे सभामंडपात झाली. या धर्मसंकीर्तन महोत्सवात श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व डोंबिवली बदलापूर स्वामीभक्त मंडळी यांच्या वतीने आयोजीत नारदीय कीर्तन सेवेच्या माध्यमातून आज पहिले पुष्प गुंफले. प्रारंभी ह.भ.प.कृष्णा बुवा माळकर व साथीदारांचा तसेच सोमदत्त आसोलकर दांम्पत्याचा प्रथमेश इंगळे यांच्या उपस्थितीत दिंडोरी प्रणित श्री.स्वामी समर्थ आध्यात्मिक सेवाकेंद्राचे प्रमुख गुरुमाऊली प.पु.अण्णासाहेब मोरे यांचे चिरंजीव तथा त्र्यंबकेश्वर येथील अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठाचे प्रमुख चंद्रकांत मोरे व मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

कीर्तनसेवेच्या पुर्व रंगात कब स्मरोगे राम या ओवीतून भक्तीमय उदाहरण देताना आपण राम नाम केव्हा घेणार. लहाणपण खेळण्यात गेले. तारुण्य हौसमौज करण्यात गेले. म्हतारपण सुरु झाले नामस्मरण करू शकत नाही. मग केव्हा घेणार राम नाम. जेव्हा सर्व गोष्टी अनुकूल आहेत तेव्हा राम नाम घ्यायला सुरुवात करा. कारण हा देह केव्हा संपेल याची कोणास खात्री नाही. कर्तव्याप्रती अपेक्षा म्हणजे स्वार्थ आहे. निस्वार्थ भावनेने हाताने टाळी मुखाने नाम म्हणजे कर्तव्याप्रती प्रेम आहे. भगवंत चिंतनासाठी नाम जपाचा ध्यास अंगी असावा लागतो मग या प्रेमाची उत्पत्ती आपोआप होते असे उतररंगात निरूपण केले. ओंकार पाठक यांनी धर्मसंकीर्तन महोत्सवाचा संक्षीप्त इतिहास सागून पारंपारीक सुत्रसंचालन केले. यावेळी बोलताना त्र्यंबकेश्वर गुरुपीठाचे पीठाधीश चंद्रकांत दादा मोरे यांनी सद्गुरु चैतन्यस्वरूप अण्णा लिमये यांच्या श्री स्वामी समर्थ नामाचा प्रचार आणि प्रसार या कार्याअंतर्गत पदयात्रा, जप, नामस्मरण, मानसपुजा, कीर्तन, भजन, गायन या सेवेत, अध्यात्मिक उन्नती सोबत स्वामीसेवकांसाठी भक्ती सहवासाचे हक्काचे व्यासपीठ हे ध्येय समोर ठेवून अक्कलकोट मासिक कीर्तन सेवेचे आयोजन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी हो गृप आणि डोंबिवली-बदलापूर स्वामीभक्त मंडळीचे सोमदत्त आसोलकर करत आलेले आहेत. सर्वांच्या उस्फूर्त प्रतिसादामुळे हे सेवा यज्ञकुंड गेले १२३ महिने सतत धगधगत आहे ही बाब राज्यभरातील स्वामी भक्तांसाठी उल्लेखनीय असल्याचे मनोगत व्यक्त केले. या कीर्तन सेवेत ह.भ.प.कृष्णा बुवा माळकर यांना तबल्यावर सुनिल शेलार यांनी तर हार्मोनियमवर मयूर स्वामी उत्तम साथसंगत केली. या सर्व कार्यक्रमंसह या कीर्तन सेवेस श्रोत्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, डॉ.मल्लीनाथ बोधले, प्रकाश कासेगांवकर, ओंकार पाठक, मनोज जाधव, ज्ञानेश्वर भोसले, सोमदत्त आसोलकर, स्वामीनाथ लोणारी, काशिनाथ इंडे, सागर गोंडाळ, लखन गवळी, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, रवीराव महिंद्रकर यांच्यासह भाविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पंढरपुरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. १४ एप्रिल -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास प्रशासनाच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी आमदार राजू खरे, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी डॉ. प्रशाश्वजीत घोडके, उपमुख्याधिकारी अँड .सुनिल वाळुजकर,आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, नेताजी पवार, राजकुमार काळे, कृष्णात जगताप यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित हो



## बाबासाहेबांना अभिवादन



### सोजर इंग्लिश स्कूल, बार्शी

सोजर इंग्लिश स्कूलच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक संदीप पोळ आणि मुख्याध्यापिका रिटा नेटके यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.



### वखारिया विद्यालय, बार्शी

वखारिया विद्यालयात भारतीय संविधानाचे शिल्पकार, प्रज्ञा सूर्य, बोधिसत्व, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती तवले यांनी केले होते.



### यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, उपप्राचार्य संभाजी किर्दाक उपस्थित होते.



### आर्या महाविद्यालय, माढा

आर्या कृषी महाविद्यालय, माढा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनी साक्षी शिवशरण व प्रा. खंडेराव वाघे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तृप्ती राठोड यांनी तर आभार प्रा. अमोल माळी यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. संदीप मुरूमकर, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, प्रा. खंडेराव वाघे, प्रा. हनुमंत निगुडे आणि रोहित घळके यांची उपस्थिती लाभली.



### शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. ज्येष्ठ शिक्षिका विजयालक्ष्मी थळंगे यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षक शिवानंद घोडके, संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, नीलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, विरेश थळंगे, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, प्राध्यापक संतोष शिंदे, शिवराज अष्टगी, अजय माणकोजी, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार श्रीमंत भोसले यांनी मानले.

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, करकंब



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सूचनेनुसार आम्ही बाबासाहेबांचे पाईक या अभियानात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पंढरपूर शहर व ग्रामीण यांच्यावतीने पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदवला. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी प्रदेश सरचिटणीस महेश बोचरे, पंढरपूर तालुकाध्यक्ष साहिल शेख, जिल्हा उपाध्यक्ष सचिन देठे, हर्षवर्धन रानगर उपस्थित होते.

# जिल्ह्यात विविध उपक्रमांनी महामानवास अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

**जिल्ह्यात विविध शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटनांच्या वतीने भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. भीम जयंती दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचनही यावेळी करण्यात आले.**

### वैराग येथे रॅली अन् रक्तदान शिबिर



वैराग येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी गौतम बुद्ध तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच पुष्पहार अर्पण उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार व सन्मान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले.

त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वैराग शहरामधून रॅली काढण्यात आली सिद्धार्थ नगर मधून सुरुवात केली गांधी चौक, आझाद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक या चौकामधून धम्म रॅली काढण्यात आली.

यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये १५० रक्तदात्यांनी रक्तदान केले या कार्यक्रमासाठी वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, वैराग नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, संतोष निंबाळकर, मकरंद निंबाळकर, संगमेश्वर डोळसे, विनय गोवर्धन, अजय काळोखे, नगरसेवक श्रीशैल भालशंकर, विजय बापू वाघमारे, अमोल वाघमारे, बाबासाहेब बाबर, मनोज वाघमारे, दलित मित्र प्रशांत भालशंकर, नाना क्षीरसागर, विजय दत्तात्रय वाघमारे, जीवन चौधरी, साहेबराव सावळे, प्रफुल्ल भालशंकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रास्ताविक तसेच आभार दलित मित्र प्रशांत भालशंकर यांनी मानले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



### पंढरीत महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन

महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार प्राप्त विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पंढरपूर यांच्यावतीने जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. भीम जयंती दिनी विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्षा साधना भोसले, माजी नगराध्यक्षा उज्वला भालेराव, समाजसेविका शैलाताई सावंत उपस्थित होत्या. यावेळी श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती महिला कर्मचाऱ्यांचा पंचशील, पुष्पहार घालून व साडी देऊन सन्मान करण्यात आला तसेच उपस्थित प्रमुख मान्यवरांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती कर्मचारी मंदा शिंदे, मंगल गायकवाड, अनुसया कराड, संगीता मुळे, मंगल राऊत उपस्थित होते.

### पिलीव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.१४ एप्रिल-**



पिलीव (ता.माळशिरस) येथे विश्वरत्न महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागरी आघाडीसह साठेनगर, ग्राम पंचायत, कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय, सर्व जिल्हा परिषद शाळा तसेच विविध सामाजिक संघटनांच्यावतीने अभिवादन करण्यात आले.

येथील बसस्थानकावर नागरी आघाडी पार्टीच्यावतीने कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी माजी सरपंच अमोल मदने, नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल मदने, ठेकेदार उमेशभाऊ सरवदे, भाजपचे जिल्हा अध्यक्ष शिवराज पुकळे, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, रणजित सातपुते, कुमार लोखंडे, जीवन गुरव, राजेंद्र जामदार, कुमार भैस, अजय खुर्द, नितीन कपने, दादा वगरे, दत्तुसिंग भैस, राहुल खलीपे, नागेश सरवदे, सागर लोखंडे, विजय पिसे, तुषार लवटे, केशव वाघमारे, अजय सातपुते, किसन सातपुते, अमिनखान पठाण, केशव लोखंडे, प्रणीत सरवदे, वैभव पिसे, दिलीप लोखंडे, अप्पा लोखंडे, अरुण करडे, वैभव सरवदे, भारत सरतापे, अरविंद वाघमारे, सुशिल करडे, दादा करडे, अजित माने, प्रफुल्ल वाघमारे, आदित्य तिकुटे, दामोदर लोखंडे, तानाजी शिंदे, सुखदेव वाघमारे, मुकींदा वाघमारे, प्रणय वाघमारे, शयामराव गलांडे उपस्थित होते.

सूत्रसंचालन बौद्धाचार्य हर्षद वाघमारे यांनी केले.



### अक्कलकोट टायगर ग्रुपवतीने सायकल वाटप

टायगर ग्रुप यांच्या वतीने आंबेडकर जयंती निमित्त गरजू शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटपाचा कार्यक्रम अक्कलकोट तालुक्याचे लोकप्रिय आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त टायगर ग्रुपच्या वतीने यंदाच्या वर्षीचा मिरवणुकीचा खर्च टाळून एक सामाजिक उपक्रम राबविण्यात आला याचे सर्वत्र कौतुक व्यक्त केले जात आहे. यावेळी रॉयल नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, शिवशरण जोजन, अविनाश मडीखांबे, अमर शिरसाट, सागर शिरसाट, निशांत निंबाळकर,राजु विभुते,वैजुनाथ मुकडे, राजेसाहेब शेळके,बिरू सरवदे, अंजली शिरसाट, सुजाता बिराजदार,आकाश जाधव, शरणू किणीकर, गणेश पवार, सिद्धाराम माळी, रमेश कापसे, दयानंद बिडवे, राहुल ढोबळे, संजय जमादार, शुभम बहिरेवार, तुकाराम पुजारी, नागराज कुंभार, आकाश माने उपस्थित होते.

## अकलूज परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात



भारतीय घटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंती अकलूजसह परीसरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पहार घालुन व पंचशील ध्वजारोहन करून अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त १३ एप्रिलच्या रात्री १२ वाजता आंबेडकर चौक येथे फटक्याची आतिषबाजी करत अभिवादन करण्यात आले. १३ एप्रिल रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालुन अभिवादन केले.यावेळी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सामुदायिक त्रिशरण,पंचशील ग्रहन करुन भिम स्तुती भिम वंदना पठण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील,पांडुरंग देशमुख, सयाजीराजे मोहिते-पाटील,अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरी, माजी सरपंच विठ्ठलराव गायकवाड, दादासाहेब मोरे, नंदकुमार केंगार, किरण धाईंजे,विज्ञान लोंढे,उत्तमराव माने शेडगे, प्रविण लोंढे, बाळासाहेब गायकवाड,नागेश लोंढे, विशाल जगताप, विशाल मोरे, विशाल फुले, प्रविण साळवे उपस्थित होते. अकलूज बरोबरच परीसरातील माळीनगर, शंकरनगर, उदयनगर, आनंदनगर, संग्रामनगर कोंडबावी आदी ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करुन जयंती साजरी केली. अकलूज मध्ये जयंतीनिमित्त भोजनदान, फळे वाटप, रक्तदान यासह प्रबोधत्मक व्याख्याने व भिमगीताचेही आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी अकलूज शहरातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली होती यामध्ये आंबेडकर नगर मित्र परीवार, रमामाता तरुण मंडळ, पंचशील जयंती उत्सव मंडळ, समतानगर जयंती मंडळ,भिमज्योत तरुण मंडळ, योध्दा फाउंडेशन आदी मंडळांनी आपले भिमरथ सहभागी केले होते.



### श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, सांगोला

श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासुद, (ता.सांगोला) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माजी नगरसेवक किशोर बनसोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येवून त्यांनी भीमवंदना केली. यावेळी सदानंद सावंत, दादासाहेब ऐवळे, बापूसाहेब चंदनशिवे, भास्कर ऐवळे, मारूती ऐवळे, सागर चंदनशिवे, पिंटू चंदनशिवे, दिगंबर ऐवळे, विठ्ठल जावीर, दत्तात्रय ऐवळे, सागर ऐवळे, वैभव ऐवळे, प्रमोद ऐवळे, आकाश सातपुते, ग्रंथपाल अनिकेत शिंदे, दिपक केदार, संतोष मोरे, सारिका केदार, वासुद परिसरातील असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक अनिकेत शिंदे यांनी केले. किशोर बनसोडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील अनेक प्रसंग सर्वांच्या डोळ्यासमोर ठेवून वाचनालयाचे अध्यक्ष तात्यासाहेब केदार-सावंत यांच्याही सामाजीक कार्याचा गौरव केला. अध्यक्षीय भाषण सदानंद सावंत यांनी केले. आभार संतोष मोरे यांनी मानले.

## श्रीपूरमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



श्रीपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समिती तसेच आरपीआय प्रणित व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

प्रथम स. म. कारखान्याचे संचालक अॅड. प्रकाशराव पाटील, भाजपाचे राजकुमार पाटील, महाळुंग-श्रीपूरचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे पाटील, प्रतापराव पाटील, नगरसेवक प्रकाश नवगिरे, नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, नगरसेवक रतन रजपूत, मौला पठाण, एपीआय विक्रम साळुंखे, विक्रम लाटे, मोहसीन पठाण, ब्रिमा सागर महाराष्ट्र डिसटलरी लिमिटेड चे उत्पादन मॅनेजर नरेश पाठक, सुरक्षधिकारी भागवत पारसे, जगदीश इंगळे, आरपीआयचे नेते शामराव भोसले, जागृती तरुण मंडळाचे संस्थापक मिलिंद कुलकर्णी, डॉ. सुहास बनसोडे उपस्थित होते. यावेळी मौला पठाण, राजकुमार पाटील, अॅड. प्रकाशराव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. जयंती निमित्ताने अक्षय ब्लड सेंटर सोलापूर यांचे विद्यमाने श्रीपूर येथील डॉ. सुहास बनसोडे यांच्या श्री सेवा रुग्णालयात रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ५५ जणांनी रक्तदान केले. आराध्या ट्रान्सपोर्टचे आल्हाट बंधू यांनी दोन हजार नागरिकांना अन्नदान केले. तसेच मिलिंद नगर येथे बुध्द स्मारक परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

तसेच संध्याकाळी पाच वाजता मिलिंद नगर येथे बुध्द विहार समोर महिलांच्या विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बापूसाहेब पोळके स्मारक समितीचे अध्यक्ष राजू सुरवसे, समाधान लांडगे, सचिन ताकतोडे, अनिल आठवले, ज्ञानेश्वर काटे, किरण खंडागळे, संदीप घाडगे, दावल शिवशरण, राजू शेंडगे, राजू नवगिरे, नितीन आठवले, गौतम लोंढे, नागेश काटे, गणेश सावंत, संजय खरे, शैलेश शेंडगे तसेच त्यांना मार्गदर्शन तुकाराम बाबर, भारत आठवले, बी.टी. शिवशरण, गौतम आठवले, गुडुलाल शेख, नितीन मोटे यांनी केले. सूत्रसंचालन दत्ता नाईकनवरे यांनी केले आभार भारत आठवले यांनी मानले.



### महिला आघाडी शिवसेना जिल्हा प्रमुख रविना राठोड हस्ते प्रतिमा पूजन

**अक्कलकोट, दि. १४ एप्रिल-**

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विजयनगर अक्कलकोट येथे साजरी करण्यात आली शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख रविना राठोड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शिवसेना बांधकाम कामगार महिला आघाडी जिल्हा संघटक वैशाली हावनूर व शिवसेना बांधकाम कामगार जिल्हा उपप्रमुख स्वामीनाथ हेगडे शिवसेना महिला आघाडी तालुका उपप्रमुख अनिता घोडके शिवसेना महिला आघाडी विभाग प्रमुख लता गायकवाड शिवसेना शहर महिला आघाडी उपप्रमुख वर्षा मेत्रे, माहिती अधिकार शहर संघटक विजयकुमार कोटणीस, शिवसेना बांधकाम कामगार शहर उपाध्यक्ष आकाश बबलाद व प्रदीप वाघमारे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.